

◀◀ मार्च महिन्यात ३४ हजार प्रवाशांची हवाई सफर ◀◀ नाशिक आज


उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी




◀◀ चार महिन्यांत रोखले अकरा बालविवाह ◀◀ नाशिक आज


■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : २११ ■ नाशिक, सोमवार, दि. २८ एप्रिल २०२५ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा


## महत्त्वाचे ▶▶▶▶

### मुंबईतील ईडी कार्यालयाला आग

**मुंबई :** मुंबईतील बॅलार्ड पिअर येथील ईडी कार्यालयात रविवारी (२७ एप्रिल) पहाटे अडीचच्या सुमारास भीषण आग लागली. यानंतर अग्निशमन दलाच्या १२ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. आगीचं कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही, अशी माहिती मुंबई अग्निशमन विभागाने दिली. ही आग नेमकी कशामुळे लागली याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसल्याची माहिती अग्निशमन विभागाने दिली.

### जम्मू-काश्मीरमध्ये ट्रेकिंगला स्थगिती!

**नवी दिल्ली :** पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर जम्मू आणि काश्मीरमधील ट्रेकिंग मोहिमांना पुढील आदेशापर्यंत स्थगित करण्यात आले आहेत. स्थानिक अधिकाऱ्यांनी पहलगामच्या वरच्या भागात, चंदनवारी, अरू, बेताब व्हॅली आणि बैसरन व्हॅलीसह पर्यटक आणि ट्रेकर्स मोहीम आधीच थांबवली आहे. पहलगामच्या सर्व वरच्या भागात कोणत्याही प्रकारच्या पर्यटन मोहिमा, ट्रेकिंगवर सध्या पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

### आयपीएलच्या सुरक्षेत पहलगाममुळे वाढ

**मुंबई :** पहलगाम हल्ल्यानंतर भारत- पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढतच चालला आहे. अशातच आता भारतात सुरू असलेल्या आयपीएल २०२५ टूर्नामेंटची सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे. सध्या आयपीएलचा १८ वा हंगाम सुरू आहे. ही स्पर्धा आता अंतिम टप्प्यात आली असून, प्रेक्षक आणि खेळाडूंच्या सुरक्षेसाठी स्वदेशी अँटी ड्रोन सिस्टिम कार्यान्वित करण्यात आली आहे. बिग बॅग सोल्यूशन्स प्रायव्हेट लिमिटेडने (बीबीबीएस) देशभरात जिथे इंडियन प्रीमियर लिगचे सामने खेळण्यात येत आहे, तिथे स्वदेशी अँटी ड्रोन सिस्टिम कार्यान्वीत केली आहे. त्याचसोबत वज्र सुपर शॉट सुद्धा तैनात करण्याची घोषणा करण्यात आली आहे.

### नंदुरबार जिल्ह्यात अलर्ट जारी

**नंदुरबार :** मागील काही दिवसांपासून तापमानात प्रचंड वाढ होत असल्याचे पाहण्यास मिळत आहे. यात नंदुरबार जिल्ह्यात तापमानाचा पारा हा ४३ अंश सेल्सिअस पर्यंत पोहोचलेला आहे. पारा आणखी वाढण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या वाढत्या तापमानाचा नागरिकांच्या जनजीवनावर परिणाम होताना पाहावयास मिळत आहे. नंदुरबारसह धुळे आणि जळगाव जिल्ह्यांत तापमान ४२ अंशांच्या वर कायम आहे.

### मधमाशांचा पवारांच्या ताफ्यावर हल्ला

**रत्नागिरी :** रत्नागिरी दौऱ्यावर असलेल्या अजित पवार यांच्या ताफ्यावर मधमाशांनी हल्ला केला असून, अनेक पोलिस आणि अधिकारी जखमी झाल्याची माहिती आहे. संगमेश्वर दौऱ्यावर सरदेसाई यांच्या वाड्याची पाहणी करताना ही घटना घडली. अजित पवार मात्र या हल्ल्यातून बचावले आहेत. अजित पवार सरदेसाई वाड्याची पाहणी करण्यासाठी गेले होते. यावेळी अचानक मधमाशांनी त्यांच्या ताफ्यावर हल्ला केला. त्यामुळे एकच धांदल उडाली, पळापळ सुरू झाली. कोणी कारमध्ये बसण्यासाठी पळत होतं. तर कोणी तोंड लपवण्याचा प्रयत्न करत होतं. याचा व्हिडिओ सध्या व्हायरल झाला आहे.







### सीमेवरील भावनिक दृश्य

पंजाब पोलिस प्रोटोकॉल अधिकारी अरुण कुमार यांच्या मते, शनिवारी सुमारे ७५ पाकिस्तानी नागरिक परतले. तर आतापर्यंत सुमारे २९४ पाकिस्तानी नागरिक परतले आहेत आणि सुमारे ७२७ भारतीय नागरिकही परतले आहेत.

# दहशतवाद्यांच्या आकांना वाटतं काश्मीर जळत रहावे

## नरेंद्र मोदी : पीडित कुटुंबांना न्याय मिळवून देणार

**नवी दिल्ली : पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याने प्रत्येक नागरिकाला दुःख झाले आहे. प्रत्येक भारतीयाची शोकग्रस्त कुटुंबांबद्दल तीव्र सहानुभूती आहे. दहशतवादी आणि त्यांचे आका काश्मीर पुन्हा उद्ध्वस्त करू इच्छितात आणि म्हणूनच त्यांनी एवढा मोठा कट रचला. दहशतवादाविरुद्धच्या या युद्धात देशाची एकता, १४० कोटी भारतीयांची एकता ही आपली सर्वांत मोठी ताकद आहे. ही एकता दहशतवादाविरुद्धच्या आपल्या निर्णायक लढाईचा आधार आहे, पीडित कुटुंबांना न्याय देण्याचे काम आपण करू, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले.**

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर, आज (२७ एप्रिल) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या 'मन की बात' कार्यक्रमात पुन्हा एकदा दहशतवादाचा मुद्दा उपस्थित केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पहलगाममधील पीडित कुटुंबांना न्याय देण्याचे आश्वासन दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या 'मन की बात'च्या भाषणात पहलगाम दहशतवादी हल्ल्यावरती भाष्य केले आहे. मोदी म्हणाले, जेव्हा मी तुमच्याशी मनापासून बोलतो. तेव्हा माझ्या मनात खूप वेदना होतात, असे ते म्हणाले.

आज मन की बात करताना मनात खूप पीडा झाली आहे. हल्ल्यात मरण पावलेल्यांच्या वेदना मी समजू शकतो. पहलगामचा हल्ला दहशतवाद्यांचा हताशपणा



दाखवणारा आहे. काश्मीरमध्ये शांतता प्रस्थापित होत होती. शाळा-कॉलेजेस सुरू होते, पर्यटक वाढत होते. रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होत असताना हल्ला झाला. देशाच्या दुश्मनांना काश्मीर पूर्वपदावर येऊ नये वाटतं. काश्मीर जळत राहावं असं दहशतवाद्यांच्या आकांना वाटतं. जम्मू-काश्मीरच्या लोकांना दहशतवाद्यांचं हे कृत्य आवडलं नाही. दहशतवादाविरुद्धच्या या युद्धात १४० कोटी भारतीय एक झाले, मी पुन्हा एकदा पीडित कुटुंबांना आश्वासन देतो की, त्यांना न्याय मिळेल, न्याय नक्की मिळेल. या हल्ल्यातील दोषी आणि कट रचणाऱ्यांना सर्वांत कठोर उत्तर दिले जाईल, असे मोदी म्हणाले.

### जागतिक नेत्यांनीही मला फोन केले आहेत

देशासमोरील या आव्हानाला तोंड देण्यासाठी आपल्याला आपला संकल्प बळकट करायचा आहे. दहशतवादी हल्ल्यानंतर जगभरातून शोक व्यक्त केला जात आहे. जागतिक नेत्यांनीही मला फोन केले आहेत, पत्रे लिहिली आहेत आणि संदेश पाठवले आहेत.

### एकही पाकिस्तानी नागरिक राहणार नाही : फडणवीस

राज्यात एकही पाकिस्तानी नागरिक हरवला नाही. जेवढे पाकिस्तानी आहेत ते सर्व सापडले आहेत. सर्व बाहेर चालले आहेत. सगळ्यांची बाहेर घालवायची व्यवस्था केली आहे. राज्यात एकही पाकिस्तानी नागरिक राहणार नाही. उद्यापर्यंत सर्वांना परत पाठवण्यात येणार, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. पुण्यातील एका कार्यक्रमात देवेंद्र फडणवीस सहभागी झाले होते. यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

### लपून बसलेल्यांना तिथेच ठोकतील : शिंदे

बुलढाणा : मुख्यमंत्र्यांनी स्पष्टीकरण दिल्यानंतर आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील स्पष्ट शब्दात इशारा दिला आहे. देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी सांगितलं आहे की, पाकिस्तानी नागरिकांनी तत्काळ देश सोडावा. महाराष्ट्रातदेखील ज्यांची नोंद झाली त्यांनी देश सोडावा, असे फर्मान सरकारने काढले आहे. मुख्यमंत्र्यांनीदेखील इशारा दिलेला आहे. १०७ लोकं जे कुठे लपले असतील त्यांना पोलीस शोधतील आणि तिथेच ठोकतील, अशा शब्दांत शिंदे यांनी थेट इशाराच दिला आहे.

# व्हिसा मुदत संपलेल्या पाकिस्तानींची पाठवणी

## २९४ पाकिस्तानी, ७२७ भारतीय परतले

- वैद्यकीय व्हिसाधारकांना उद्यापर्यंत मुदत
- अटारी बॉर्डरवर गर्दी वाढली
- लहान मुले, वृद्धांच्या परतण्यासाठी रांगा

**नवी दिल्ली :** व्हिसा घेऊन भारतात आलेल्या पाकिस्तानी नागरिकांसाठी देश सोडण्याची आज (२७ एप्रिल) शेवटची तारीख आहे. केंद्र सरकारने अलीकडेच जारी केलेल्या सूचनांनुसार, ज्या पाकिस्तानी नागरिकांना व्हिसाची मुदत संपली आहे किंवा ज्यांचा दीर्घकालीन व्हिसा अद्याप मंजूर झालेला नाही, त्यांना तत्काळ भारत सोडून पाकिस्तानात परतण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

वैद्यकीय व्हिसावर भारतात आलेल्या पाकिस्तानी नागरिकांना परतण्यासाठी २९ एप्रिलपर्यंत मुदत देण्यात आली आहे. यामुळे पाकिस्तानी नागरिक भारत-पाकिस्तान सीमेवरील अटारी-वाघा गेटवर पोहोचत आहेत. अनेक कुटुंबे त्यांचे साहित्य घेऊन रांगेत उभे असलेले दिसले. यामध्ये महिला, वृद्ध आणि लहान मुलांची संख्याही मोठी आहे. अनेक लोक त्यांच्या भारतीय नातेवाइकांना भावनिक निरोप देत आहेत.

**आदेशानुसार कारवाई सुरू**

गृह मंत्रालयाने जारी केलेल्या सूचनांनुसार, जे पाकिस्तानी नागरिक भारतात व्हिसा अटींचे उल्लंघन करत आहेत किंवा ज्यांची व्हिसा मुदतवाढ प्रक्रिया पूर्ण झालेली नाही, त्यांना /-...४

### मुदत संपल्यानंतर कारवाई होणार

भारत सरकारची अंतिम मुदत संपल्यानंतर भारतात राहणाऱ्या पाकिस्तानी लोकांचे वास्तव्य बेकायदेशीर मानले जाईल आणि त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल.

# लष्करप्रमुखांनंतर भुट्टोंच्या कुटुंबीयांचेही कॅनडात पलायन

## पाकिस्तानात भीतीचे वातावरण

**कराची :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने सिंधू पाणी करार रद्द करण्यासह पाकिस्तानविरुद्ध इतर अनेक मोठी पावले उचलली आहेत. तसेच, दोन्ही देशांमधील वाढता तणाव पाहता, कधीही युद्ध पेटण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे पाकिस्तानात भीतीचे वातावरण असून, लोक देश सोडून पळून जात आहेत. कालच पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांचे कुटुंब देश सोडून पळाल्याचे वृत्त आले होते. त्यानंतर आता पीपीपीचे प्रमुख बिलावल भुट्टो यांचे कुटुंबदेखील पाकिस्तान सोडून कॅनडाला पळाल्याची माहिती समोर आली आहे.

भारताने सिंधू पाणी करार स्थगित केल्यानंतर बिलावल भुट्टोंनी धमकी दिली होती की,



जर पाकिस्तानचे पाणी थांबवले, तर रक्ताच्या नद्या वाहतील. या धमकीच्या एका दिवसानंतर, म्हणजेच आज त्याच्या कुटुंबातील सदस्य बख्तावर भुट्टो आणि आसिफा भुट्टो पाकिस्तान सोडून कॅनडाला गेल्याची बातमी येत आहे.

भारत कधीही हल्ला करू शकतो, अशी भीती सध्या पाकिस्तानमध्ये आहे. अशा परिस्थितीत त्यांच्या सैन्याचे मनोबलही घसरले असून, अनेक अधिकाऱ्यांनी त्यांच्या कुटुंबीयांना परदेशात पाठवले आहे. यामध्ये पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांचाही समावेश आहे. या लोकांनी त्यांच्या कुटुंबीयांना खासगी जेटने ब्रिटन आणि न्यू जर्सीला पाठवल्याचे वृत्त आहे.

### मध्य प्रदेशात अपघातात १० जणांचा मृत्यू

**मंदसौर (भोपाळ) :** मध्य प्रदेशातील मंदसौर जिल्ह्यातील नारायणगड पोलीस स्टेशन परिसरातील कचरिया गावात काल भीषण रस्ता अपघात झाला. कार दुचाकीला धडकल्यानंतर अनियंत्रित झालेली कार विहिरीत पडली. या अपघातात कारमध्ये प्रवास करणाऱ्या ८ जणांचा आणि दुचाकीवरून प्रवास करणाऱ्या एकाचा मृत्यू झाला. विहिरीत पडलेल्या व्यक्तीला वाचवण्यासाठी गेलेल्या स्थानिक रहिवाशाचाही मृत्यू झाला. या घटनेत आतापर्यंत एकूण १० जणांचा मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार, कारमधील सर्व लोक रतलाम जिल्ह्यातील ताल येथून मंदसौर जिल्ह्यातील अंतरी माताजी गावातील माता मंदिराचे दर्शन घेण्यासाठी जात होते. याचदरम्यान खाचरिया चौपाटी येथे अपघात झाला. या घटनेनंतर मल्हारगडचे एसडीओपी नरेंद्र सोलंकी आणि अतिरिक्त एसपी गौतम सोलंकी तत्काळ घटनास्थळी पोहोचले. त्यांनी पोलीस दलासह बचावकार्य सुरू केले.

# २१०० रुपयांवरून झिरवाळ यांचेही घूमजाव

## आश्वासन कुणी दिलेच नसल्याचा केला दावा

**जळगाव :** राज्यात यंदाच्या



विधानसभा निवडणुकांपूर्वी सुरू करण्यात आलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना गेमचेंजर ठरली. या योजनेतून महिलांना दरमहा १५०० रुपये देण्यात येत असून, निवडणुकांच्या जाहीरनाम्यात पुन्हा महायुतीचं सरकार आल्यास लाभार्थी महिलांना २१०० रुपये देण्याचं आश्वासन सरकारने दिलं होतं. मात्र, अद्यापही महिलांना १५०० रुपयेच दिले जातात. तर, २१०० रुपये कधी द्यायचे ते आर्थिक बजेट पाहून निर्णय घेऊ, असे अर्थमंत्री अजित पवार यांनी यापूर्वी म्हटलं होतं. तर, आता राज्याचे कॅबिनेटमंत्री नरहरी झिरवाळ यांनी २१०० रुपये देण्यासंदर्भात मोठं वक्तव्य केलं आहे. 'लाडक्या बहिणींना २१०० रुपये देऊ असं कुणीच म्हंटलं नाही', असे म्हणत झिरवाळ यांनी चक्क २१०० रुपये देण्यावरून घूमजाव केला आहे.

लाडकी बहीण योजनेचा एप्रिल महिन्यातील हप्ता कधी जमा होणार, याची प्रतीक्षा सध्या लाडक्या बहिणींना आहे. तसेच, १५०० रुपयांचे २१०० कधी होणार याची देखील उत्सुकता आहे. मात्र, लाडक्या बहिणींच्या हप्त्यावरून सत्ताधाऱ्यांची टोलवाटोलवी सुरूच असल्याचं पाहायला मिळत आहे. 'लाडक्या बहिणींना २१०० रुपये देऊ असं कुणीच म्हटलं नाही', असे अन्न आणि औषध प्रशासनमंत्री नरहरी झिरवाळ यांनी म्हटलंय. विरोधकांनीच २१०० रुपयांवर जोर लावलाय. लाडक्या बहिणींना १५०० रुपयेही पुरेसे आहेत, त्या खूश आहेत, असे म्हणत झिरवाळ यांनी २१०० रुपये देण्यावरून पलटी मारल्याचं दिसून येत आहे.

लाडकी बहीण योजना विधानसभा निवडणुकीत महायुतीसाठी गेमचेंजर ठरली. महायुतीचे घटकपक्ष भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या विजयामध्ये या योजनेचा वाटा महत्त्वाचा ठरला. कारण, महायुतीचं सरकार आल्यास लाडक्या बहिणींना दरमहा २१०० रुपये देऊ, असं आश्वासन देण्यात आलं होतं. मात्र, /-...४

### महिना संपायच्या आत हप्ता जमा होणार

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा एप्रिल महिन्याचा हप्ता महिना संपायच्या अगोदर प्राप्त होईल, अशी माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली. पुणे येथे पत्रकारांसोबत बोलताना त्यांनी याबाबत सांगितले. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत कोणताही बदल करण्यात आलेला नाही. ज्या महिलांच्या कुटुंबाचं उत्पन्न अडीच लाखांपेक्षा कमी असेल, त्यांनाच पहिल्यापासून निधी दिला जातो, असं आदिती तटकरे यांनी सांगितलं. नमो शेतकरी योजनेतून ज्या महिलांना एक हजार रुपये मिळतात, त्यांना ५०० रुपये मिळतील हे योजनेचे दोन शासन निर्णय होते. त्यामध्येच निश्चित करण्यात आलं होतं, असंदेखील त्यांनी सांगितलं.

# नाशिक- शिर्डी रेल्वेमार्गाचे सर्वेक्षण पाडले बंद

## अधिकाऱ्यांना पिटाळले; बागायती जमीन देण्यास विरोध

**नाशिकरोड : विशेष प्रतिनिधी**

प्रस्तावित नाशिक-शिर्डी रेल्वेमार्गासाठी बारमाही शेतजमिनी अधिग्रहित केली जाणार असून, शेतीपूरक व्यवसाय धोक्यात येणार असल्याचा आरोप करत चाडेगावच्या शेतकऱ्यांनी प्रकल्पाचे सर्वेक्षण काल बंद पाडत रेल्वेच्या अधिकाऱ्यांना परत पाठवले.

रेल्वेचे सर्वेक्षक काल सकाळी चाडेगाव परिसरात सर्वेक्षणासाठी गेले असता शेतकरी व साई प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय जाधव-पाटील, राजाभाऊ जाधव, खंडेराव जाधव, निशांत वाघ, बाळू वाघ, लखन टिळे आदींनी विरोध करत सर्वेक्षण थांबवले. माजी नगरसेवक पंडित आवारे, बाजीराव भागवत,




नितीन खर्जुल, गोकुळ नागरे आदींना त्यांनी पाचारण केले.

या नेत्यांनी रेल्वेच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून वस्तुस्थिती आणि शेतकऱ्यांच्या भावना समजावून सांगितली. शेती व शेतीपूरक व्यवसाय धोक्यात न आणता नापीक जमीन, सिन्नर तालुक्यातील जमिनी ताब्यात घ्याव्यात, असा पर्याय सुचविण्यात आला.

या प्रकल्पाविरोधात या आधीही निदर्शने झाली. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, मुंबई, जळगाव येथील रेल्वे अधिकारी तसेच माजी खासदार हेमंत गोडसे, खासदार राजाभाऊ वाजे यांनाही निवेदने देण्यात आली. या सर्वांनी शेतकऱ्यांची बाजू घेतली. तरीही पुन्हा सर्वेक्षण सुरू झाल्याने शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली.

शेतकऱ्यांचे म्हणणे असे की, प्रस्तावित नाशिक-शिर्डी रेल्वेमार्ग मंजूर झाला आहे. प्रशासनाने त्याचे दोन-तीन वेळा सर्वेक्षण वेळा केले आहे. नाशिक रोड, सिन्नर फाटा, आरपीएफ प्रशिक्षण केंद्र, चाडेगाव, सामनगाव, जाखोरी आदी गावांतून हा मार्ग शिर्डीला जाणार आहे. या भागाचे सर्वेक्षण करताना प्रकल्पाने बाधित होणारे /-...४

❛ शेतकऱ्यांनी रेल्वेमंत्री, रेल्वेचे



अधिकारी, आजी-माजी खासदार यांना निवेदन देऊन या प्रस्तावित रेल्वे मार्गाला विरोध दर्शविला. शेतकरी अगोदरच नैसर्गिक आपत्तींना सामोरे जात आहे. यापूर्वी नाशिक-पुणे रेल्वेमार्गाचे सर्वेक्षण झाले आहे. त्यासाठी जमिनी अधिग्रहित करण्यात आल्या आहेत. नाशिक-शिर्डी मार्गे सिन्नर, नांदूरशिंगोटेमार्गे सुरू केल्यास बागायती शेती वाचेल आणि शासनाचे पैसे देखील वाचतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्र्यांनी न्याय द्यावा.

**- विजय जाधव पाटील,**
शेतकरी

# प्रेमविवाह केल्याच्या रागातून मुलीची हत्या

## सैराटची पुनरावृत्ती, जावई जखमी

**जळगाव :** सैराट चित्रपटात जसा पळून जाऊन प्रेमविवाह केलेल्या तरुणांवर प्राणघातक हल्ला होतो, तशीच घटना जळगावमध्ये घडल्याचे समोर आले आहे. मुलीने प्रेमविवाह केल्याच्या रागात जन्मदाता मुलगी आणि जावयाच्या जीवावर उठला. प्रेमविवाहाच्या रागात आरोपी जन्मदात्याने बंदुकीने गोळ्या झाडून मुलीची हत्या केली असून, जावयाला गंभीर जखमी केले आहे. या घटनेमुळे सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दोन वर्षांपूर्वी तृप्ती (२४) आणि अविनाश यांनी प्रेमविवाह केला होता. हा विवाह तृप्तीचे वडील किरण मंगले यांना मान्य नव्हता. परंतु मुलीने प्रेमविवाह केल्याचा राग आरोपी बापाच्या मनात होता. दरम्यान, अविनाशच्या बहिणीच्या हळदी समारंभात या दोघांनी हजेरी लावली होती. आरोपी किरण मंगले हे देखील आले होते. त्यावेळी आरोपीला त्याची मुलगी आणि जावई दिसताच रागाच्या भरात त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. या घटनेमध्ये मुलीचा जागीच मृत्यू झाला असून, तिच्या पतीच्या पाठीत गोळी घुसल्याने तो /-...४

## महत्वाचे



### सटाण्यात पहलगाम हल्ल्याच्या निषेधार्थ रॅली

**सटाणा :** जम्मू-काश्मिरातील पहलगाम येथे झालेल्या आतंकी हल्ल्यात निर्दोष आणि निष्पाप हिंदूंचे जीव घेण्यात आले. अतिरेक्यांनी धर्म विचारून जीव घेतले. या क्रूर घटनेचा निषेध नोंदवण्याकरिता आज रविवारी सटाणा शहर स्वयंस्फूर्तीने बंद करीत सर्व सामाजिक, धार्मिक संघटना व राजकीय पक्षांच्या वतीने शहरात रॅली काढत निषेध नोंदवण्यात आला. शहरातील शिवतीर्थ येथे सर्व नागरिकांनी जमत मुख्य बाजारपेठेतून मोर्चाला सुरुवात करताच पोलीस प्रशासनाने मोर्चा अडवत ज्या मार्गाची परवानगी आहे, त्याच मार्गाने जाण्यास सांगत मोर्चा थांबला. परंतु, मोर्चेकरी मुख्य बाजारपेठेतून जाण्यावर ठाम होते, परंतु पोलीस प्रशासन त्याला नकार देत असल्याने काही काळ तणाव निर्माण झाला होता. उपविभागीय पोलीस अधिकारी घटनास्थळी दाखल होत मोर्चेकरी व पोलीस प्रशासन यांच्यात चर्चा होऊन अखेर मोर्चाला शिवतीर्थ येथून सुरुवात झाली. हजारो हिंदूंनी रस्त्यावर उतरत जोरदार घोषणा दिल्या. 'भारत माता की जय', 'पाकिस्तान मुर्दाबाद', 'हिंदुस्थान जिंदाबाद' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. मोर्चा शहरातील मुख्य बाजारपेठेतून निघत टिळक रोड, मल्हार रोड, बसस्टॅण्ड, ताहाराबाद रोड मार्गे तहसीलदार कार्यालयाच्या आवारात दाखल झाला. मोर्चाचे सभेत रूपांतर झाले. यावेळी पाकिस्तानचा तीव्र निषेध करण्यात आला. या मोर्चात हजारो हिंदू बांधव सहभागी झाले होते. बागलाण तहसीलदार यांना निवेदन देत मोर्चा समारोपाच्या वेळी पहलगाम हल्ल्यात शहीद झालेल्या नागरिकांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली व राष्ट्रगीताने मोर्चाची सांगता करण्यात आली.

### अल्टो कारची दुचाकीला धडक

**चांदवड :** चांदवड तालुक्यातील दिघवद ते हिवरखेडे मार्गावर गांगुर्डे वस्तीजवळ दिनांक २१ एप्रिल रोजी रात्री साडेआठ वाजेच्या सुमारास एका अल्टो कारने दुचाकीला धडक दिल्याने पती-पत्नी गंभीर जखमी झाले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अल्टो कार क्रमांक एम.एच. ०२/सी.डब्ल्यू. ९११२ चा चालक (नाव व गाव अज्ञात) दिघवदकडून हिवरखेडेकडे जात होता. गांगुर्डे वस्तीजवळ त्याने निष्काळजीपणे आणि भरधाव वेगात गाडी चालवत रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष केले आणि चुकीच्या बाजूने लासलगावकडून चांदवडकडे येत असलेल्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील गोटीराम बाळू पवार (वय अंदाजे ४०, रा. कोलटेक) आणि त्यांची पत्नी शैला गोटीराम पवार हे दोघेही खाली पडून गंभीर जखमी झाले. गोटीराम पवार यांच्या उजव्या पायाला गुडघ्याजवळ, मांडीजवळ आणि कमरेला गंभीर मार लागला आहे, तर त्यांच्या पत्नीलाही गंभीर दुखापत झाली आहे. या घटनेबाबत गोटीराम पवार यांनी चांदवड पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दाखल केली आहे. पोलिसांनी अल्टो कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पोलीस निरीक्षक कैलास वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार राजू गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

### चांदवडला आज 'सेवा हक्क दिन'

**चांदवड :** महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने २८ एप्रिल हा दिवस 'सेवा हक्क दिन' म्हणून साजरा करण्यास मान्यता दिली आहे. यानिमित्त चांदवड तहसील कार्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. आज सोमवारी दि.२८ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता नवीन प्रशासकीय इमारत, तहसील कार्यालय, चांदवड येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात नागरिकांमध्ये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५, राज्य सेवा हक्क आयोग आणि आपले सरकार पोर्टलच्या माध्यमातून उपलब्ध सेवांबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. या विशेष कार्यक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन चांदवडचे तहसीलदार मंदार कुलकर्णी यांनी केले आहे.

### ७३ ग्रामपंचायतींसाठी आरक्षण सोडत

**पेठ-दिंडोरी :** सन २०२५ ते २०३० या कालावधीतील सार्वत्रिक निवडणुका होणाऱ्या पेठ तालुक्यातील ७३ ग्रामपंचायतींचे महिला सरपंचपदाची आरक्षण सोडत उपविभागीय अधिकारी आप्पासाहेब शिंदे व निवासी नायब तहसीलदार मधुकर गवांदे यांच्या मार्गदर्शनाखाली पेठ तहसीलदार कार्यालयात जाहीर झाली. अनु. जमातीसाठी महिलांसाठी ३७ आरक्षित तर ३६ ग्रामपंचायत सरपंचपदे पुरुषांसाठी खुली झाली आहेत. सन २०२५ ते २०३० या कालाधीकरिता अनु. जमाती महिला सरपंचपदाकरिता आरक्षित ३७ पदे आहेत. आंबे, माळेगाव, जळे, सुरगाणे, राजवारी, जोगमोडी, करंजाळी, धोंडमाळ, पाहुचीबारी, आड बु., रुईपेठा, गाबंध, जांभूळमाळ, बाडगी, जुनोठी, कुंभाळे, तोंडवळ, कहांडोळपाडा, उम्रद, भुवन, गांगोडचारी, जांभविहीर, सावळघाट, कळमबारी, तिर्डे, करंजखेड, कोटंबी, बोरवठ, मांगोणे, निरगुडे, देवगाव, हनुमाननगर, गोंद, देवीचा माळ, शिंगदरी, हातरुंडी, म्हसगण या ग्रामपंचायती आहेत.

### मौजे सुकेणेतील विद्यार्थी शिष्यवृत्ती पात्र

**कसबे-सुकेणे :** येथील कर्मवीर रावसाहेब थोरात माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता पाचवी व इयत्ता आठवीचे विद्यार्थी शासकीय शिष्यवृत्ती पात्र ठरले आहेत. त्यात पाचवीसाठी अनुक्रमे कु. आयुष किशोर चव्हाण, कु. दर्श संदीप भोजने, कु. पायल अंबादास भंडारे, कु. प्रतीक कैलास भोईर तर आठवीमधून कु. अनन्या गणेश विधाते व कु. प्राची योगेश भंडारे हे विद्यार्थी शिष्यवृत्ती पात्र ठरले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांना पूनम वाघ, सविता नागरे, रेखा पाटील, योगिता चव्हाण, वैशाली करंजे, पंकज खालकर, दर्शना तागड, श्रीमती जे. पी. सोनवणे, सुभाष देशमुख, महेंद्र हुजरे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे उपसभापती डी. बी. अण्णा मोगल, संचालक शिवाजी आप्पा गडाख, प्राचार्य रायभान दवंगे, उपमुख्याध्यापक अनिल परदेशी, पर्यवेक्षक राजेश खताळ, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले.

### जैन समाजातर्फे कार्यक्रम रद्द

**कसबे-सुकेणे :** 'पहलगाम येथे झालेल्या आतंकी हल्ल्यात निष्पाप लोकांचा बळी घेतला गेला. संपूर्ण देशात दु:खाचे सावट पसरले. सर्वांनीच शोक व्यक्त केला आहे. सर्वांकडूनच मृतांसाठी न्याय मिळावा ही अपेक्षा व्यक्त केली आहे. सर्वांनीच श्रद्धांजली अर्पण केली आहे. दरवर्षी अक्षयतृतीयेच्या दिवशी वर्षभर उपवास जे जैन लोक करतात त्याची सांगता अत्यंत उत्साहात मुंबईमध्ये फार मोठ्या कार्यक्रमात होते. वरघोडा निघणार होता. हजारो लोकांची जेवणाची व्यवस्था केली जाते. यावेळी मुलुंड, वाशी, घाटकोपर, दहिसर, डोंबिवली, ठाणे, मरोळ, परळ या सर्वांनी हा भव्य उत्सव यावेळी साजरा नाही करायचा असा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या अक्षयतृतीयेनिमित्त या कहाण्या, सांस्कृतिक कार्यक्रम सर्व रद्द करण्यात आले व पहलगाम हल्ल्यातील मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे, अशी माहिती कसबे-सुकेणे येथील जैन समाजाचे दिलीपकुमार पूनमचंद बोरा यांनी दिली आहे.

# चांदवड वनविभागाची वन्यजीवांसाठी पाणी व्यवस्था

## कृत्रिम पाणवठ्यांमुळे भटकंती टळली

**चांदवड : वार्ताहर**

चांदवड तालुक्यात उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे जंगलातील नैसर्गिक जलस्रोत आटल्याने वन्यजीवांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत होती. मात्र, वन विभागाने वेळीच दखल घेत तालुक्यात विविध ठिकाणी कृत्रिम पाणवठ्यांची सोय केल्यामुळे वन्यजीवांची पाण्यासाठी होणारी भटकंती टळली आहे. यामुळे मानव आणि वन्यजीव यांच्यातील संभाव्य संघर्षही टळला आहे.

चांदवडचे वनपाल अधिकारी बी. पी. सोमवंशी यांनी दिलेल्या माहितीनुसार, चांदवड वनविभागाने रायपूर, परसूल, एरंडगाव, वडनेरभैरव, गौहरण, कानमंडळे, चिंचबारी यांसारख्या ठिकाणी वन्यजीवांसाठी विशेष कृत्रिम पाणवठे तयार केले आहेत. या पाणवठ्यांमध्ये नियमितपणे पाण्याची व्यवस्था केली जात असल्याने वन्यजीवांना आता पाण्याच्या शोधात दूरवर भटकण्याची गरज राहिलेली नाही.



चांदवडचे वन्यजीव अभयारण्य हे विविध प्रकारच्या प्राणी-पक्ष्यांनी समृद्ध आहे. येथे बिबट्या, हरीण, मोर, ससे यांसारखे अनेक वन्यजीव आढळतात. उन्हाळ्यात पाण्याची कमतरता जाणवल्याने हे प्राणी पाण्याच्या शोधात मानवी वस्तीजवळ येण्याची शक्यता वाढते. यामुळे मानव आणि वन्यजीव यांच्यात संघर्ष निर्माण होऊ शकतो. ही बाब लक्षात घेऊन वनविभागाने उचललेले कृत्रिम पाणवठ्यांचे पाऊल अत्यंत महत्त्वाचे आणि दूरदृष्टीचे ठरले आहे. तालुक्यातील काही ठिकाणी प्लास्टिकचे अर्धे डबे कापून आणि सिमेंटच्या कुंड्या तयार करून कृत्रिम पाणवठ्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. वनविभागाच्या या प्रयत्नांमुळे वन्यजीवांना त्यांच्या अधिवासातच पाणी उपलब्ध झाले असून, सध्या तरी वन्यप्राण्यांनी मानवी वस्त्यांकडे पाठ फिरवल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे मानव आणि वन्यजीव यांच्यातील संभाव्य संघर्ष टळला आहे, असे वनपाल अधिकारी सोमवंशी यांनी सांगितले.

वन विभागाच्या या कार्यामुळे वन्यजीवप्रेमींकडून समाधान व्यक्त होत आहे. नैसर्गिक जलस्रोतांचे संरक्षण आणि वन्यजीवांसाठी पाण्याची सोय करणे ही काळाची गरज आहे आणि चांदवड वन विभागाने या दिशेने योग्य पाऊल उचलले आहे, असे मत पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केले.




# उगावला हल्ल्याचा निषेध

**लासलगाव : वार्ताहर**

पहलगाम येथील हल्ल्याचा उगाव येथील केजीएन ग्रुपतर्फे जाहीर निषेध करण्यात आला.काश्मीरमधील पहलगाम येथे मंगळवारी भ्याड दहशतवादी हल्ल्यात २७ भारतीय निरापराध पर्यटक व स्थानिक नागरिकांचा बळी गेला. या हल्ल्याचा निषेध करण्यासाठी उगावच्या मुस्लिम बांधवांनी हाताला काळी पट्टी बांधून निषेध केला व नमाजनंतर एकत्रित येऊन पाकिस्तान व दहशतवादी मुर्दाबाद अशा घोषणा देण्यात आल्या.

केंद्र सरकारने पाकिस्तानला अद्दल घडवावी व निरापराध लोकांच्या हत्येचा बदला घ्यावा तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर पाकिस्तानला एकटे पाडून सर्व प्रकारचे करार रद्द करावे. व्यापार संपुष्टात आणावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. जम्मू-काश्मीरच्या स्थानिक नागरिकांनी पर्यटकांना खूप मदत केली. जखमींना दवाखान्यात नेले. त्यांना सुरक्षा दिली. जेवण दिले व पूर्णपणे अतिरेक्यांचा विरोध केला व पर्यटकांसाठी प्रार्थना करून संकटाच्या काळात आम्ही भारतीय एक आहोत हा संदेश जगाला दिला.

यावेळी केजीएन ग्रुपचे अध्यक्ष नौशाद सय्यद, हाजी शरीफ शेख, हाजी रशीद शेख, कासम शेख, युनूस तांबोळी, दस्तगीर पिंजारी, अश्फाक तांबोळी, अब्दुल शेख, अमजद शेख, जहांगीर शेख, अमन तांबोळी, सुभान तांबोळी, अर्शद तांबोळी, सत्तार शेख, बिलाल सय्यद, सांडू तांबोळी आदी उपस्थित होते



# अंदरसूल सकल हिंदू समाजातर्फे मोर्चा

**येवला : प्रतिनिधी**

पहलगाम येथे दहशतवाद्यांनी पर्यटकांवर केलेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ येवला तालुक्यातील अंदरसूल येथे सकल हिंदू समाजाच्या वतीने मोर्चा काढण्यात येऊन दहशतवाद्यांचा तसेच पाकिस्तानचा तीव्र निषेध करण्यात आला.

दरम्यान, या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ हिंदुत्ववादी संघटनांच्या वतीने अंदरसूल येथील संभाजीनगर महामार्गावर पाकिस्तान मुर्दाबादच्या घोषणा देण्यात येऊन पाकिस्तानचा झेंडा जाळण्यात आला तसेच अंदरसूल शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला. सकाळी ११ वाजता सकल हिंदू समाजबांधव तसेच हिंदुत्ववादी संघटनांच्या पदाधिकारी, कार्यकर्ते एकत्र येऊन शहरातून भव्य निषेध मोर्चा काढण्यात आला. शहरातील विविध मार्गांनी मोर्चा काढण्यात येऊन सदर मोर्चाचा समारोप करण्यात आला. पहलगाम या ठिकाणी अतिरेक्यांनी २८ निष्पाप लोकांचा बळी घेतला असून, यात महाराष्ट्रातील सहा पर्यटकांचा समावेश आहे. या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ हिंदुत्ववादी संघटना तसेच सकल हिंदू समाजाच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला.

# इगतपुरीत अभ्यासिकेसाठी २५ लाखांचा निधी

**इगतपुरी : प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना वकील, डॉक्टर, इंजिनिअर, तहसीलदार, जिल्हाधिकारी यांसारख्या क्षेत्रात यशस्वी होण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी योग्य शैक्षणिक सुविधा उपलब्ध होणे आवश्यक आहे. या गरजेला ओळखून भाजप युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस योगेश चांदवडकर यांनी इगतपुरी शहरात एक सुसज्ज अभ्यासिका उभारण्यासाठी प्रयत्न सुरू केले होते.

त्यांनी सातत्याने आमदार हिरामण खोसकर यांच्याकडे याबाबत मागणी केली होती. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत आमदार हिरामण खोसकर यांनी आपल्या गौण खनिज निधीतून २५ लाख रुपये मंजूर केले आहेत. या निधीतून अभ्यासिका इमारत उभारली जाणार असून, याचा लाभ हजारो विद्यार्थ्यांना होणार आहे.

शनिवारी झालेल्या भूमिपूजन सोहळ्यात खासदार राजाभाऊ वाजे व आमदार हिरामण खोसकर यांच्या प्रमुख उपस्थितीत विधिवत पूजन करण्यात आले. अभ्यासिकेच्या उभारणीतून इगतपुरीतील विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी एक उत्तम आणि आधुनिक सुविधा मिळणार आहे. ही बाब शिक्षणप्रेमी नागरिकांत समाधान व्यक्त करत आहे. यावेळी भाजप युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस योगेश चांदवडकर, किरण फलटणकर, अण्णासाहेब पवार, निखिल हांडोरे, महेश श्रीश्रीमाळ, राष्ट्रवादी काँग्रेसचे महेश शिरोळे, वसीम सय्यद, योगेश मालपाणी, आकाश पारख, उमेश खातळे, वैशालीताई आडके, चारुलता ठाकुर, अंजुम पराडे, ज्येष्ठ नागरिक संघाचे पूनमचंद लुणावत, आर. जी. परदेशी, सोमनाथ भुतडा, बन्सी चांडक, सत्तार मणियार, गौरव गायकवाड, लताताई शिंदे यांच्यासह ज्येष्ठ नागरिक संघाचे सदस्य, स्वामी समर्थ मंडळाचे सदस्य, व्यापारी असोसिएशनचे पदाधिकारी यांच्यासह स्थानिक पदाधिकारी, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# आत्ताच अलविदा म्हणू नका दोस्तांनो

**निफाड : विशेष प्रतिनिधी**

आत्ताच अलविदा म्हणू नका दोस्तांनो; १ मे रोजी आपणा सर्वांना आपल्याला परीक्षेत किती गुण मिळाले आहे ते बघायचे आहे. शिवाय, कामगार दिनानिमित्ताने ध्वजारोहण करायचे आहे. पुन्हा पुढच्या वर्गात भेट होणार आहे. ऋणानुबंधनाची अशीच भेट होणार आहे म्हणत शाळेच्या शेवटच्या दिवशी शुक्रवारी विद्यार्थ्यांनी शिक्षकांचा निरोप घेतला. शिक्षकांनीही आपुलकीचे दोन शब्द विद्यार्थ्यांच्या कानावर घालून अलविदा म्हटले.

शेवटचा पेपर संपताच शुक्रवारी पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांनी उन्हाळ्याच्या सुट्यांचा आनंद घेतला. मात्र, या आनंदातही एक वेगळीच भावना दडलेली होती. पेपर संपल्यानंतर वर्गामधून हास्य-विनोद, निरोपाचे संदेश आणि फोटोसेशन सुरू झाले. एकमेकांना गुडबाय करताना पुन्हा लवकर भेटूया असं म्हणताना अनेकांचे डोळे पाणावले होते. शाळेचा शेवटचा दिवस नेहमीच खास असतो.



दिवसभर अभ्यास, शिस्त, शिक्षकांचे मार्गदर्शन यामध्ये वेळ घालवणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सुटी म्हणजे आनंदाचा क्षण. पण, या आनंदातही जिव्हाळ्याची एक ओल दडलेली असते. वर्षभर एकत्र खेळणं, अभ्यास करणं, गप्पा मारणं याने निर्माण झालेली मैत्री दीड महिन्याच्या सुटीसाठी थांबणार असल्याने विद्यार्थ्यांमध्ये भावनिक वातावरण तयार होते.

शेवटच्या दिवशी शाळा सुटताच अनेक विद्यार्थ्यांनी आपले आवडते शिक्षक व मित्र-मैत्रिणींना घट्ट मिठी मारत निरोप दिला. यावेळी शिक्षकांनाही अश्रू अनावर झाले होते.

'सुटीनंतर भेटू', फोनवर बोलू अशा गोंडस वाक्यांनी एकमेकांशी संवाद साधत अनेकांनी आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. काही विद्यार्थ्यांनी शाळेच्या प्रांगणात फोटो काढून आठवणी जपण्याचा प्रयत्न केला. तर, काहींनी आपल्या आवडत्या खाद्यपदार्थांवर मित्रांसोबत ताव मारला. शिक्षकांनी विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळे खाद्यपदार्थ देऊन निरोप दिला. वाचन, छंद जोपासणे, शरीर आणि मन आरोग्यपूर्ण ठेवणे यावर भर द्यावा, असे शेवटी सांगितले.

# लासलगावला आठवडे बाजारात 'आंबा' दाखल

**लासलगाव : वार्ताहर**

लासलगाव येथील रविवारच्या आठवडे बाजारात फळांचा राजा अर्थात 'आंबा' दाखल झाला आहे. हापूस, केशर, बदाम, लालबाग आणि इतर अनेक प्रकारच्या आंब्यांची आवक सुरू झाली असून, बाजारात हापूस ३०० ते ४०० रुपये किलो, केशर १५० ते १८० रुपये किलो, बदाम १०० ते १५० रुपये किलो तर लालबागदेखील १०० ते १५० रुपये किलो दराने विकला जात आहे.

अवकाळी पावसाचा फटका व वातावरणातील बदलामुळे यंदा आंब्याच्या उत्पादनात काहीशी घट निर्माण झाल्यामुळे गत वर्षीच्या तुलनेत यंदा दरात १५ ते २० टक्क्यांची वाढ झाली आहे. मात्र, येत्या ३० एप्रिल रोजी अक्षयतृतीया हा सण असून, या दिवशी आमरसचा बेत आखला जातो. त्यामुळे अक्षयतृतीयापर्यंत हापूससह इतर प्रकारच्या आंब्यांचे दर कमी होतील, असा अंदाज विक्रेत्यांनी व्यक्त केला आहे.



> अवकाळी पावसाचा फटका व वातावरणातील बदलामुळे यंदा आंब्याच्या उत्पादनात काहीशी घट निर्माण झाली आहे. किरकोळ बाजारात हापूस ३०० ते ४०० रुपये किलो, केसर १५० ते १८० रुपये किलो दराने विकला जात आहे. यांसह इतर आंब्यांचे दर देखील १५० ते २०० रुपये किलो आहेत. येत्या काही दिवसांत आंब्यांची आवक वाढण्याची शक्यता असून, दर आटोक्यात येतील.
> – **चंद्रकांत शेजवळ,** आंब्याचे घाऊक विक्रेते

यंदा मार्चमध्येच बाजारपेठेत हापूस दाखल झाला होता. त्यानंतर एप्रिल महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात आंध्र प्रदेश, गुजरात, नांदेड या ठिकाणाहून लासलगावच्या बाजारपेठेत हापूससह केसर, बदाम, लालबाग, राजापुरी, रत्नागिरी व अन्य आंबे दाखल झाले आहेत. सध्या शहरातील बाजारतळ, पोलीस स्टेशन समोरील रस्ता, मेन रोड, स्टेशन रोड, विंचूर रोड आदींसह शहराच्या अन्य भागात आंबे विक्रीची दुकाने थाटली आहेत.

# गणवेश खरेदी अधिकार शाळा व्यवस्थापनाकडे

## पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना पुस्तके, गणवेशही मिळणार!

**निफाड : विशेष प्रतिनिधी**

नाशिक जिल्ह्यातील शाळांमध्ये एक राज्य, एक गणवेश ही योजना राज्यातील शिक्षण विभागाने सुरू केली होती, मात्र वितरण प्रक्रियेत मोठा गोंधळ उडाल्याने ही योजना शासनाने रद्द केली आहे. आता गणवेश खरेदीचे अधिकार शाळा व्यवस्थापन समितीकडे देण्यात आले आहेत. तर, मोफत पुस्तके विद्यार्थ्यांना पहिल्या दिवशी मिळावी यासाठी शिक्षण विभागाकडून नियोजन सुरू आहे. शाळेच्या नवीन सत्राच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना गणवेश व पुस्तके देण्याच्या सूचना शिक्षण विभागाकडून देण्यात आल्या आहेत.

राज्य सरकारने याआधी सर्व शाळांसाठी एकसमान गणवेश असावा, असे धोरण आखले होते. मात्र, या योजनेचा पुरता बोजवारा उडाला होता. गत वर्षी अर्धे सत्र संपत आले तरी विद्यार्थ्यांना गणवेश मिळाले नव्हते. त्यामुळे गणवेश वाटप करण्याचे अधिकार यंदा शाळा व्यवस्थापन समित्यांना देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे राज्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये गणवेश वितरणाची जबाबदारी थेट स्थानिक शाळा व्यवस्थापन समित्यांकडे देण्यात आली आहे. शाळांना आता त्यांच्या गरजेनुसार आणि स्थानिक परिस्थितीनुसार गणवेश निवडण्याचा अधिकार देण्यात आला आहे. शासनाचा निधी मंजूर करून गणवेश खरेदीसाठीचा निधी थेट शाळा व्यवस्थापन समितीच्या खात्यावर जमा केला जाणार आहे. यासंदर्भात तसे निर्देश जारी केले आहे. नवीन शैक्षणिक सत्राच्या पार्श्वभूमीवर, जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी मोफत पाठ्यपुस्तके आणि गणवेश उपलब्ध करून देण्यासाठी व्यापक नियोजन सुरू केले आहे. मोफत गणवेश व पुस्तकांचा संच पहिली ते सातवीपर्यंत शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था व खासगी अनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांना देण्यात येतात. पाठ्यपुस्तके शासकीय, खासगी अनुदानित व अंशतः अनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांना पुस्तक संच विनामूल्य देण्यात येणार आहे. शाळा व्यवस्थापन समित्यांनी गणवेशाच्या गुणवत्तेची खातरजमा करणे बंधनकारक असून, दर्जाबाबत हलगर्जीपणा आढळल्यास संबंधितांवर कारवाई केली जाणार आहे. गुणवत्तेत तडजोड न करता प्रत्येक विद्यार्थ्याला दर्जेदार गणवेश मिळावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. गेल्या वर्षीचा गणवेशाचा झालेला गोंधळ पुन्हा टाळण्यासाठी स्थानिक शाळा व्यवस्थापन समितीकडेच गणवेशाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. कापडाच्या खरेदीपासून त्याचे शिवणकाम आणि वितरण ही कामे व्यवस्थापन समितीच करणार आहे. गणवेशाचे डिझाइन, रंग ठरवण्याचे अधिकारही समितीलाच असतील.



> शाळेच्या पहिल्या दिवशी गणवेश व पुस्तकांचा संच देण्याच्या दृष्टीने नियोजन सुरू आहे. याबाबत नाशिक जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून पत्रव्यवहार करण्यात आला आहे. चालू वर्षी शासनाने गणवेश खरेदी करण्याची जबाबदारी शाळा व्यवस्थापन समितीकडे देण्यात आली आहे. नवीन सत्राच्या पहिल्या दिवशी मोफत गणवेश देण्याच्या सूचना शाळा व्यवस्थापन समित्यांना देण्यात आल्या.
> – **प्रशांत गायकवाड,** गटशिक्षणाधिकारी, निफाड पं. स.

महत्वाचे



## म्हसोबा महाराज यात्रोत्सवानिमित्त दोन दिवसीय कुस्त्यांची दंगल

**सिडको : विशेष प्रतिनिधी** उंटवाडी येथील नंदिनी नदीच्या तीरावर असलेल्या आणि गर्द हिरव्या महाकाय वटवृक्षाच्या छायेत स्वयंभू उंटवाडीचा राजा अतिप्राचीन म्हसोबा महाराजांच्या दोन दिवसीय यात्रोत्सवात कुस्त्यांची दंगल भरविण्यात आली. यावेळी नाशिक शहर आणि जिल्ह्यातील महिला आणि पुरुष पैलवान कुस्ती आखाड्यात उतरले होते. श्री म्हसोबा महाराज देवस्थान समितीच्या माध्यमातून पूर्वापार चालत असलेल्या या यात्रेच्या समाप्तीनिमित्त अतिप्राचीन म्हसोबा महाराज यात्रा कमेटीच्या वतीने कुस्त्यांची दंगल भरविण्याची परंपरा कायम ठेवत यंदाही कुस्तीप्रेमींसाठी अतिप्राचीन श्री म्हसोबा महाराज यात्रा कमेटीच्या वतीने सिटी सेंटर मॉलनजीक महाकाय आणि विशाल वटवृक्षाच्या छायेखाली अतिप्राचीन म्हसोबा महाराज मंदिरच्या प्रांगणात कुस्त्यांची दंगल भरविण्यात आली या कुस्त्यांच्या दंगलीत भगुर येथील बलकवडे व्यायामशाळा,दांडेकर तालीम, यासह नाशिक शहर आणि जिल्ह्यातील विविध व्यायामशाळेतील मातब्बर पैलावांनासह चिंचोली, मुरंबी,विल्होळी वाडीवऱ्हे इगतपुरी येथील पट्टीचे पैलवानांनी कुस्तीच्याआखाड्यात उतरुन कुस्त्यांची परंपरा कायम आहे. यावेळी कुस्तीगीरांसह पैलवान तसेच कुस्तीप्रेमींनी मोठीगर्दी केली होती. प्रारंभी अतिप्राचीन श्री म्हसोबा महाराज यात्रा पंच कमेटीचे अध्यक्ष फकिरराव तिडके, माजी नगरसेवक आण्णा पाटील यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून कुस्त्यांच्या दंगलीला प्रारंभ करण्यात आला यावेळी अतिप्राचीन म्हसोबा महाराज यात्रा कमेटीचे ,माजी अध्यक्ष मधुकर तिडके यांच्यासह सदाशिव नाईक, अंबादास जगताप, रामचंद्र तिडके ,बाजीराव तिडके,आण्णा पाटील,दत्ता पाटील विलास जगताप, विष्णु जगताप, एकनाथ तिडके, जगन्नाथ तिडके, राजेश गाढवे, सुरेश जगताप, संतोष कोठावळे बाळासाहेब तिडके, राम पाटील,प्रविण जगताप , दत्तात्रेय तिडके, आदीनी केले आहे.

## तोफखाना केंद्रीय विद्यालयात रंगले हॅण्डबॉल सामने



**जुने नाशिक : वार्ताहर** शहरातील तोफखाना केन्द्र परिसरातील पीएमश्री केन्द्रीय विद्यालय क्रमांक एक मध्ये विभागीय हॅण्डबॉल आणि बॅडमिंटन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. राज्य शासनाचे छत्रपती पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ हॅण्डबॉल प्रशिक्षक तसेच जिल्हा हॅण्डबॉल संघटनेचे अध्यक्ष साहेबराव पाटील यांच्या हस्ते स्पर्धेचे उदघाटन करण्यात आले. प्राचार्य गजराज मीना यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. खेळात शक्ती आणि बुद्धीचा योग्य समन्वय व समतोल साधला तर, यश हे तुमचेच असते, असे प्रतिपादन साहेबराव पाटील यांनी केले. यावेळी जे. एस. रुंगठा हायस्कूलचे प्राचार्य संजय पाटील, संलग्न प्रशिक्षक डॉ. नवनीत कौर रंधावा, अमीत त्यागी, रवी सिंग, विकास सिंग, कामिनी केवट, हेमा सोनवणे, चंद्रकांत भाग्यवंत, रोहित भामरे, सूरज काताड, शुभम साळवे, आदी आव्हाड आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन तुषार वारडे यांनी केले. कल्पना शिंदे यांनी आभार मानले. स्पर्धेत पुणे, भुसावळ, मानखुर्द, पनवेल, भांडुप, ठाणे, पवई, मंडावी, अहमदनगर, बांबोलिम कॅम्प, गणेशखिंड, देवळाली, संभाजी नगर, नागपूर आदी शहरांतील केंद्रीय विद्यालयातील खेळाडू सहभागी आहेत. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी अविनाश पवार, आरीफ बेग, ज्ञानेश्वर सरताले, शुभम यादव आदींनी परिश्रम घेतले.



## पांडवलेणी येथे पक्ष्यांसाठी चारापाणी

**नाशिक : प्रतिनिधी** सध्या कडक उन्हाळा लागल्याने पशुपक्ष्यांना पाणी मिळणे कठीण झाले आहे. अन्नपाण्यासाठी पशुपक्षी-प्राणी वणवण करताना दिसत आहे.पाण्यावाचून अनेक वेळा पक्षी-प्राण्यांचा जीवही जातो. उन्हाळ्यात पक्ष्यांसाठी चोचभर पाणी आणि घासभर चारा मिळावा याकरिता पांडवलेणी या परिसरात दाणापाण्याची सोय करण्यात आली आहे. पांडवलेणी परिसरात चिमणी,कबुतरे,कावळा,कोकिळा,मोर,खारुताई व इतर पक्षी-प्राणी मोठ्या प्रमाणात असल्याने त्यांच्यासाठी ठिकठिकाणी सिमेंट व मातीच्या भांड्यात पाणी व त्या शेजारी ज्वारी-बाजरी,तांदूळ,गहू इतर धान्याचीही व्यवस्था करण्यात आली. विशेष म्हणजे पक्षाला व प्राण्यांना इजा झाल्यास प्राथमिक उपचार करून डॉक्टरांना बोलवले जाते. तसेच सिमेंट व मातीचे भांडे दिवसाआड स्वच्छ करून त्यात स्वच्छ पाणी टाकले जाते आणि वृक्षाला पाणी टाकून त्याचाही काळजी घेतली जाते. जेणेकरून पक्षी,जनावरे,वृक्ष यांना तीव्र उन्हाळ्याचा त्रास जाणवणार नाही. यावेळी सुनील मटाले,अनिल पोटे, प्रकाश माळेकर, प्रतिक करडे, संदीप पाटोळे, प्रणित थिगले, तेजल वैष्णव,अथर्व मटाले, दूर्वा पोटे,विनोद वैष्णव, सुधाकर टाव्हरे, गोरक्षनाथ कासार, प्रविण दोंदे, रितेश देशमुख, प्रमोद पाटील, योगेश मवाळ, स्वरा उपळकर ,अमोल उपळकर, ध्रुव देशमुख,दर्शित पाटील,ओम कासार, शैलेश कासार,सत्यजित शिंदे, सुनिल पवार,दिपक खवणे,सचिन कांबळे,योगेश देशमुख, राजेश चौधरी, दीपक दुधवडे, दीपक तातुस्कर, वैजिनाथ पिंपळे, तुषार पवार, स्वप्नील पाटील, योगेश क्षीरसागर, ओम पाटील उपस्थित होते.

## मीनका रिव्हरडेल गोल्फ कप व कैडी स्पर्धेचा समारोप

**नाशिक:** मीनका रिव्हरडेल गोल्फ - २९२५ स्पर्धांना कालपासून रिव्हरसाइड गोल्फ कोर्स, निफाड, नाशिक येथे सुरुवात झाली आहे. काल लहान मुलांच्या गटाच्या स्पर्धा पार पडल्या. आज गोल्फ या खेळातील कॅडि म्हणजेच यांच्यासाठी विशेष स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. नाशिक, नागपूर व मुंबई येथून हे स्पर्धक आले होते. एकूण १८ होलच्या या स्पर्धेत २३ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. यात नाशिकच्या समीर खानने एकूण ६७ स्ट्रोकमध्ये ही स्पर्धा जिंकली.

# अवयव प्रत्यारोपण केंद्र स्थापन करा : आरोग्यमंत्री आबिटकर

### अवयव प्रत्यारोपणाविषयी मंत्रालयात बैठक

**नाशिक : प्रतिनिधी**

आ. देवयानी फरांदे यांनी केलेल्या मागणीप्रमाणे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली आरोग्य भवन येथे अवयव प्रत्यारोपणविषयी बैठक झाली. राज्यातील अवयदानाची व अवयव प्रत्यारोपणाची प्रक्रिया अत्यंत क्लिष्ट असल्यामुळे अनेक व्यक्ती या प्रक्रियेपासून दूर राहतात, असे आ. देवयानी फरांदे यांनी स्पष्ट केले.

आंध्र प्रदेश येथे महाराष्ट्राच्या बरोबरीने अवयव प्रत्यारोपणाची सुरुवात झालेली असताना आज चेन्नई येथे मोठ्या प्रमाणावर अवयव प्रत्यारोपणाच्या शस्त्रक्रिया होताना दिसून येतात, परंतु महाराष्ट्र मात्र या सर्व बाबतीत मागे पडलेला आहे, असे आमदार फरांदे यांनी स्पष्ट केले. राज्यातील अवयवदान आणि प्रत्यारोपण प्रक्रियेला अधिक गती, पारदर्शकता आणि परिणामकारकता मिळवून अधिकाधिक गरजू रुग्णांना जीवनदान देता येणार असल्याचे यावेळी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले. अवयव प्रत्यारोपणासाठी नाशिक येथील



नागरिकांना मुंबईला यावे लागते. याच प्रकारची परिस्थिती विभागात असल्यामुळे प्रत्येक विभागात प्रादेशिक अवयव प्रत्यारोपण समन्वय केंद्र स्थापन करण्याची मागणी आमदार देवयानी फरांदे यांनी केली. नाशिकसह अमरावती, कोल्हापूर आणि सोलापूर येथे नवे प्रादेशिक अवयव प्रत्यारोपण समन्वय केंद्र स्थापन करण्यात येईल असे आश्वासन आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. शासकीय रुग्णालयात मोठ्या प्रमाणावर ब्रॅण्डेड पेशंट येत असताना देखील त्याची नोंदणी केली जात नसल्याचे फरांदे यांनी स्पष्ट केले. सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये अवयव वाचवण्यासाठी यंत्रणा उभी करणे गरजेचे असल्याचे आमदार देवयानी फरांदे यांनी स्पष्ट केले. शासकीय रुग्णालयांमध्ये मानवी अवयव पुनर्प्राप्ती केंद्रांची निर्मिती आणि त्या ठिकाणी समन्वयकांची नियुक्ती करण्यात येईल. अवयव प्रत्यारोपणासाठी आवश्यक रुग्णालय नोंदणी प्रक्रियेचा तातडीने निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. त्याचबरोबर विभागीय प्राधिकरण समित्यांनी जिवंत अवयवदान परवानगी प्रक्रियेला सुलभ करण्यात येत असल्याचेही मंत्री आबिटकर यांनी यावेळी सांगितले.



## एकाच कुटुंबातील ५ जणांचा अपघातात मृत्यू

**जयपूर :** एकाच कुटुंबातील ५ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. ओव्हरटेकच्या नादात ट्रेलर आणि कारची समोरासमोर जोरदार धडक होऊन हा भीषण अपघात झाला. जयपूरच्या जमवारामगडमध्ये ही घटना घडली. या अपघातामध्ये इंजिनिअर तरुण, त्याची पत्नी, आई-वडील आणि सहा महिन्यांच्या मुलीचा मृत्यू झाला. अपघातामध्ये कारचा अक्षरशः चक्काचूर झाला. मिळालेल्या माहितीनुसार, हा अपघात रविवारी सकाळी ८ वाजताच्या सुमारास जमवारामगढ येथील रायसर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मनोहरपूर-दौसा हायवेवर झाला. भरधाव वेगात असलेल्या कारने ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी समोरून आलेल्या ट्रेलरखाली कार घुसली. हा अपघात इतका भीषण होता की या अपघातामध्ये कारचा चक्काचूर झाला. या अपघातामध्ये कारमध्ये असलेल्या सर्वांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. स्थानिकांच्या मदतीने सर्वांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले.

## मारहाण केलेल्या शिक्षकाचा मृत्यू

**लातूर :** लातूरच्या निलंगा तालुक्यातील औंढा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने काढण्यात आलेल्या मिरवणुकी दोन गटांत वाद झाला. या वादाचे रूपांतर तुफान दगडफेक आणि हाणामारीत झाले. या हाणामारीत शिक्षकाला देखील मारहाण करण्यात आली. यात शिक्षकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी दहा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला.


## नोटीस

**हया नोटीसद्वारे बॅकसन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा. लि. D/2, PLOT 90, शांतीवन सोसायटी अंधेरी (वेस्ट), मुंबई निवेदन करीत आहे की, आमच्या निदर्शनास असे आले आहे की, अज्ञात व्यक्ति आमच्या कंपनीच्या नावे जिल्हा परिषद किंवा आरोग्य विभागात विविध पदांवर नोकरी देतो असे सांगून पैसे उकळीत आहे. आमची कंपनी नोकर भरतीसाठी पैसे घेत नाही. तसेच त्या अज्ञात व्यक्तिने आमच्या कंपनीचे बनावट लेटर हेड आणि शिक्के बनविले असून तरी कोणीही या व्यक्तिस पैसे दिले असल्यास आमची कंपनी यासाठी जवाबदार राहणार नाही, याची नोंद घ्यावी.**

श्री अनुज बक्शी
(Director)
बॅकसन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा. लि.

बीवायपी



**श्री नेमिनाथ जैन ब्रम्हचर्याश्रम संचलित**
**श्री नेमिनाथ जैन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, मिनगर, चांदवड, जि. नाशिक.**
**फोन क्र.-** 02556-252124, 297045 ईमेल-snjhchanwad@gmail.com
**(अल्पसंख्यांक संस्था)**

| अ. क्र | पदाचे नाव | पात्रता | पद संख्या (पूर्णवेळ) |
|---|---|---|---|
| १ | क. लिपिक | बी.कॉम, टंकलेखन मराठी- ३०, इंग्रजी- ३०, ४०, एमएससीआयटी, संगणकीय कामकाजाचा अनुभव | ०१ |
| २ | प्रयोगशाळा सहाय्यक | एसएससी प्रथम श्रेणी, एचएससी विज्ञान शाखा | ०१ |
| ३ | ग्रंथपाल | एसएससी, एचएससी, बी. लिब | ०१ |

या विद्यालयाच्या अनुदानित / अशतः अनुदानित माध्यमिक विभागाकडे खालीलप्रमाणे शासकीय नियमानुसार पदे भरावयाचे आहे.

वरील पात्रताधारक उमेदवारांनी समक्ष मुलाखतीसाठी दि १६.०५.२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वरवचनि सर्व मूळ कागदपत्रांसह विद्यालयात उपस्थित राहावे.

**( श्री. शिंदे एस डी )** प्राचार्य
**(बेबीलाल केशरमल संचेती)** चेअरमन


# काँग्रेसचा उद्या संविधान सद्भावना मार्च

### काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांची उपस्थिती



**नाशिक : प्रतिनिधी**

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या उपस्थितीत उद्या मंगळवार, दि.२९ रोजी शहरात संविधान सद्भावना मार्चचे आयोजन केले असून, या यात्रेनिमित्ताने शहरात शांतीचा व सद्वाणीचा संदेश देणारी यात्रा ठरेल, असे मत प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस शहराचे प्रभारी ब्रिजकिशोर दत्त यांनी व्यक्त केले. प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ व विधिमंडळ काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये ही यात्रा निघणार आहे.

या यात्रेमध्ये ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष कुणाल पाटील, खासदार शोभाताई बच्छाव, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष शिरीष कोतवाल, शहर काँग्रेसचे अध्यक्ष आकाश छाजेड, प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष राजाराम पानगव्हाणे, उपाध्यक्ष शरद आहेर, प्रदेश काँग्रेसचे सचिव राहुल दिवे, तसेच महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष संध्याताई सव्वा लाख, प्रदेश एनएसयूआयचे अध्यक्ष अमीर शेख, तसेच जिल्ह्यातील सर्व प्रदेश पदाधिकारी सर्व आघाड्यांचे पदाधिकारी सर्व विभाग व सेलचे पदाधिकारी, माजी नगरसेवक, माजी लोकप्रतिनिधी, माजी जिल्हा परिषद सदस्य आदी पदाधिकारी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या संविधान सद्भावना यात्रेसाठी शहर काँग्रेसचे अध्यक्ष आकाश छाजेड व शहरातील सर्व ब्लॉक अध्यक्ष सर्व आघाड्यांचे अध्यक्ष सर्व पदाधिकारी मेहनत घेत आहेत. या यात्रेनिमित्ताने शहरांमध्ये एकात्मतेचे व सद्भावनाचे संदेश सामान्य जनतेपर्यंत पोहोचावे, असा उद्देश काँग्रेस पदाधिकाऱ्यांचा आहे, अशी माहिती प्रभारी ब्रिजकिशोर दत्त यांनी दिली.

## मानवता एकता दिवस शिरेवाडी भवन येथे साजरा

**वासाळी : वार्ताहर**

नाशिक क्षेत्रातील संत निरंकारी मंडळाचे शिरेवाडी ब्रँचने मानवता एकता दिवस साजरा करण्यात आला. इगतपुरी ब्रांच व घोटी ब्रांच याही ठिकाणी हा दिवस साजरा करण्यात आला. दरवर्षी २४ एप्रिल हा दिवस मानवता एकता दिवस म्हणून साजरा केला जातो. भारताबाहेर हा दिवस मानवी एकता दिवस म्हणून ओळखला जातो. मानवतेच्या कल्याणासाठी सद्गुरु बाबा गुरुबचनसिंह महाराजांच्या बलिदानाचा सन्मान करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो.

संत निरंकारी मिशनची सेवा, भावना आणि मानव कल्याणाचा संकल्प साकार कारण्याचे कार्य आज दिवस रात्र संपूर्ण विश्वभर करत आहे. शिरेवाडी भवनवर ७ ते ९ या वेळेत सत्संग पार पाडला. अनेक संत महात्म्यानी गीताच्या व विचाराच्या माध्यमातून या दिवसाचा संदेश दिला. तसेच मानव एकता दिनानिमित्त स्टेज वरून विचार प्रकट करताना परम आदरणीय महात्मा राकेश जी भांबरे मुखी सातपूर बोलले निरंकारी समाज जगभरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करतो. या दिवशी रक्तदान शिबिरांचे आयोजन केले जाते. यामध्ये मोठ्या प्रमाणात सत्संग व सेवादल महिला पुरुष सहभागी होऊन रक्तदान करतात. महात्मा रामदासघाणे यांनी सूत्रसंचालन केले.

# ई-केवायसी केली का? उरले अवघे तीन दिवस

### प्रक्रिया पूर्ण करण्याचे पुरवठा विभागाचे आवाहन

**नाशिक : प्रतिनिधी**

शासनाकडून शिधापत्रिकेवर धान्य मिळवण्यासाठी ई-केवायसी प्रक्रिया करणे बंधनकारक केले आहे. शिधापत्रिकाधारकांना ई-केवायसी करण्यासाठी ३० एप्रिलपर्यंत अंतिम मुदत आहे. त्यामुळे ज्या शिधापत्रिकाधारकांची ई-केवायसी प्रक्रिया बाकी आहे अशा शिधापत्रिकाधारकांनी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा पुरवठा विभागाकडून करण्यात आले आहे.

नाशिक जिल्ह्यातील ३८ लाख ५७ हजार ६६४ शिधापत्रिकाधारकांची ई-केवायसी पूर्ण करण्याचे उद्दिष्ट पुरवठा विभागाला देण्यात आले आहे. अंदाजे जिल्ह्यातील ८२ टक्के ई केवायसी प्रकिया पूर्ण झाली आहे. अद्यापही पाच लाखांहून अधिक शिधापत्रिकाधारंकाची ई



केवायसी प्रकिया अपूर्ण आहे.. शासनाने रेशनधारकांना केवायसी करणे बंधनकारक केले आहे. या शिधापत्रिकाधारकांनी ई-केवायसी पूर्ण करावी, अन्यथा रेशन बंद होण्याचा इशारा पुरवठा विभागाकडून देण्यात आला आहे.

**शिधापत्रिकाधारकांनी मेरा-केवायसी ॲप वापरण्याचे आवाहन**

ई-केवायसी करण्यासाठी रेशन दुकानात गर्दी होत असल्याने शासनाने मेरा-केवायसी ॲप विकसित केले आहे. या ॲपवर ओटीपीद्वारे इतर माहिती भरणे अनिवार्य आहे. सर्व माहिती भरुन ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. शिधापत्रिकारधारकांनी ३० एप्रिलपर्यंत ई केवायसी पूर्ण करावी.


## टायटल व्हेरिफिकेशनकामी जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :** तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका इगतपुरी पैकी **मौजे माणिकखांब** शिवारातील **गट क्रमांक व उपविभाग ३९३ यांसी एकूण क्षेत्र ०१ हे. ०१ आर यांसी आकार रू. ००.९४ पैसे,** ही मिळकत **श्री. दिलीप भिका ततार** व **श्री. संजय भास्कर अमृतकर** यांचे खरेदी मालकीची व कब्जा उपभोगाची असून त्यांनी आमचे पक्षकारांना खरेदी देण्याचे ठरवून व्यवहार पक्का करून विसार रक्कम स्विकारली आहे. तथापि, सदरची जाहीर नोटीस टायटल तपासणीकामी प्रसिध्द केलेली आहे.

सबब, सदर मिळकतीवर कोणाचेही कसलेही गहाण, दान, लिज, बक्षिस, लिज, अन्नवस्त्र, मृत्यूपत्र, साठेखत, खरेदीखत, बोजा, चार्ज, जनरल मुखत्यारपत्र, हक्क, अधिकार, ॲक्वायर, रिक्वायर, कोणतेही करार, मदार इत्यादींसारखे लेखी अगर तोंडी बोलणी किंवा कराराने गुंतविलेली असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० (दहा) दिवसांचे आत आमचे कार्यालयात योग्य त्या कायदेशिर पुराव्यानिशी लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची हरकत अगर तकार न आल्यास सदर मिळकतींचे टायटल स्वच्छ व निर्दोष आहे, असे समजण्यात येवून **टायटल सर्टिफिकेट** देण्यात येईल व आमचे पक्षकार व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेल्या तक्रारींचा व परस्पर वृत्तपत्रात जाहीर केलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. कळावे, ही नोटीस.

**नाशिक, दि. २७.०४.२०२५**
**आमचे मार्फत प्रसिध्द**

**ॲड. कामिनी माणिकसा खेरूडकर**
**(B.S.L., LL.B. & L. W. D.C.P.L, F.M.C.)**
**मोबाईल नं. ९३२५३९५९०४, ऑफिस नं. ९, चारूदत्त चेंबर्स, गायकवाड क्लासचे समोर, कान्हेरेवाडी, सि.बी.एस. नाशिक.**



**मुंबई कर्ज वसुली न्यायाधिकरण नं. ३**
अर्थ मंत्रालय भारत सरकार
सेक्टर ३०ए, रघुलिला मॉलच्या पुढे, वाशी रेल्वे स्टेशनजवळ, नवी मुंबई-४००७०३

आर पी नं. २३५/२०१६
**बँक ऑफ इंडिया** ....... प्रमाणपत्रधारक
विरुध्द
**मे. एम. आर. बहाळकर आणि इतर** ..... प्रमाणपत्र कर्जदार

**विक्री निश्चित करण्साठी सूचना**

**सीडी १** मे. एम. आर. बहाळकर. (प्रोप्रयटरमार्फत मालकी संस्था)
**श्री. मुरलीधर राजाराम बहाळकर, राहणार** बकुल को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, एस.टी. कॉलनीजवळ, गंगापूर रोड, नाशिक.
**सीडी २.** श्री. मुरलीधर राजाराम बहाळकर (मयत) (कायदेशीर वारसदारांमार्फत)
**२(ए)** सौ. मालती मुरलीधर बहाळकर
**२(बी)** श्री. शेखर मुरलीधर बहाळकर
**२(सी)** श्री. भूषण मुरलीधर बहाळकर
**२(डी)** सौ. शीतल नितीन पांडकर
**२(ई)** सौ. अश्विनी गिरीष येवला
**सर्व राहणार** : फ्लॅट नं. ८, जोगेश्वर को-ऑप, हाऊसिंग सोसायटी लि., न्यू पंडित कॉलनी, शरणपूर रोड, नाशिक,
**सीडी ३.** **श्री. मोरेश्वर शामराव जगताप, राहणार** फ्लॅट नं. ८, कलाग नगर, गंगापूर रोड, नाशिक
**सीडी ४.** **श्री. रतनलाल बी. बोहरा, राहणार** बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक.
**सीडी ५.** **श्री. अरविंद दत्तात्रय पोतनीस, राहणार** १४६०, पगडबंद लेन, नाशिक.

ज्याअर्थी, आपणाला मा. पीठासीन अधिकारी यांनी १९९९ च्या ओए नं. ६८४ संदर्भात वसुली प्रमाणपत्र जारी करुन अर्जदार बँकेस/वित्तीय संस्था यांना **रु. १५,८६,९९५.९० (रु. पंधरा लाख शहाऐंशी हजार नऊशे पंचाण्णव आणि पैसे नव्वद फक्त)** त्यावरील व्याज आणि किंमत अशी सर्व रक्कम जमा करण्याचा आदेश दिला होता आणि त्यानुसार आपण सीडी यांनी सदर रक्कम जमा केल्यामुळे खाली सही करणार यांनी खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेची विक्री करण्याचा आदेश जारी केला आहे..

आपणांस याद्वारे कळविण्यात येते की, **दि. ०२/०५/२०२५,** ही वेळ विक्री आयोजित करण्यासाठी आणि त्यापुढील अटी निश्चित करण्यासाठी नक्की करण्यात आली आहे. आपणांस याद्वारे कळविण्यात येते की, या विक्रीच्या अटींची पूर्तता करण्यासाठी, या मालमत्तेशी किंवा त्याच्या कोणत्याही भागाशी निगडीत कोणताही बोजा, आकार, दावा किंवा देणे असल्यास खाली सही करणार यांच्या नजरेस आणून द्यावे

**स्थावर/जंगम मालमत्तेचा तपशील**

पुढील मालमत्तेचा सर्वसामाईक भाग- प्लॉट नं. १४, सर्व्हे नं. ६८७/बी-१-३ पैकी व प्लॉट नं. १५, सर्व्हे नं. ६८७/बी-१-४ पैकी,पम्पिंग स्टेशन रोड, जिल्हा नाशिक-४२२००५

**दि. ०८/०४/२०२५** रोजी माझ्या स्वाक्षरीने व न्यायाधिकरणाच्या शिक्क्यानिशी दिले.

न्यायाधिकरणाचा शिक्का

**(दीपा सुब्रमणिअन)**
**वसुली अधिकारी-II,**
**कर्ज वसुली न्यायाधिकरण-३**


# इंडियन कॅन्सर सोसायटीतर्फे जनजागृती

**नाशिक : प्रतिनिदी**

इंडियन कॅन्सर सोसायटी व आरोग्य विभाग जिल्हा परिषद यांच्यामार्फत कर्करोग जागरूकता, तपासणी आणि उपचार वाढवण्यासाठी एकात्मिक कर्करोग तपासणी आणि जनजागृती कार्यक्रम जिल्हास्तरीय प्रशिक्षकांचे प्रशिक्षण नुकतेच झाले.



इंडियन कॅन्सर सोसायटी ॲक्सिस बँकेच्या मदतीने नाशिक आणि सिन्नर, त्र्यंबकेश्वर, इगतपुरी आणि दिंडोरी तालुक्यात कर्करोग जागरूकता, तपासणी आणि निदान जागरूकता साठी समुदाय केंद्रीत उपक्रम सुरू केला आहे. महाराष्ट्रात या कार्यक्रमाची ही नाशिक जिल्ह्यापासून सुरुवात झाली आहे. आरोग्य विभाग जिल्हा परिषद नाशिकच्या पाठिंब्याने सुरू झालेल्या या व्यापक कार्यक्रमात कर्करोगाविषयी जागरूकता पसरविण्यासाठी तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, सामुदायिक आरोग्य अधिकारी आणि फ्रंटलाइन हेल्थकेअर वर्कर्सना प्रशिक्षण देण्यात आले. त्यात तोंडाच्या, स्तनाच्या आणि गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोगांसाठी मोफत तपासणी तसेच निदानात्मक मदत केली जाणार आहे. सरकारी प्रयत्नांना पूरक म्हणून विशेषतः वंचित समुदायांसाठी हा कार्यक्रम नाशिकमध्ये समुदाय जागरूकता सत्रांद्वारे १.५ लाखांहून अधिक लोकांपर्यंत आणि मास मीडिया आउटरीचद्वारे ७ लाखांहून अधिक व्यक्तींपर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट ठेवतो. आयसीएस च्या भागीदारीतून एसएमबीटी इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस अँड रिसर्च सेंटरच्या सहकार्याने, समुदाय कर्करोग तपासणी उपक्रम ४,००० व्यक्तींना कव्हर करेल आणि अतिरिक्त १,००,००० लोकांमध्ये जागरूकता निर्माण करेल.

हा कार्यक्रम या प्रदेशात गरजू कर्करोग रुग्णांच्या निदान आणि उपचारांसाठी आर्थिक सहाय्य प्रदान करतो. महाराष्ट्रातील कर्क रोगाविरुद्धच्या मोहिमेला पाठिंबा देण्यासाठी इंडियन कॅन्सर सोसायटीसोबतची आमची भागीदारी भारतातील कर्करोग संशोधन आणि रुग्णसेवा परिसंस्था मजबूत करण्याच्या आमच्या मोठ्या वचनबद्धतेशी पूर्णपणे जुळते. नागरिकांमध्ये वाढलेली जागरूकता आणि वैद्यकीय क्षेत्रातील चांगली तयारी कर्करोगाचे निदान तसेच लवकर उपचार करता येतील याची खात्री करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे.

या प्रकल्पामुळे वैद्यकीय अधिकारी, सामुदायिक आरोग्य अधिकारी आणि आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये समाजात सामान्य कर्करोगांविषयी उदा. तोंडाचा, स्तनाचा आणि गर्भाशयाच्या ग्रीवेचा कर्करोग जागरूकता निर्माण करण्यासाठी क्षमता निर्माण होण्यास मदत होईल, ज्यामुळे तपासणीद्वारे लवकर निदान होण्यास प्रोत्साहन मिळेल आणि कर्करोगाचा भार कमी होण्यास मदत होईल. असे प्रतिपादन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे यांनी केले. २०० हून अधिक वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणात अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र बागूल, माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. हर्षल नेहते आणि सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दीपक लोणे, डॉ. युवराज देवरे उपस्थित होते.

# स्वा. सावरकर स्मारकाच्या डागडुजीला मुहूर्त लागणार कधी?

**देवळाली कॅम्प : प्रतिनिधी**



नाशिक जिल्ह्यातील भगूर जन्मभूमीत असलेल्या स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या स्मारकाच्या डागडुजीतील विलंबामुळे स्थानिक नागरिक आणि सावरकरप्रेमी अस्वस्थ आहेत. ऐतिहासिक महत्त्व असलेल्या या स्मारकाच्या दुरुस्तीचे काम गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू आहे, परंतु काम अत्यंत संथ असल्याने अद्यापही ते पूर्णत्वास आले नाही.

स्मारकाच्या दुरुस्तीचे काम पुरातत्त्व विभागामार्फत सुरू झाले, मात्र तांत्रिक अडचणींमुळे कासवाच्या गतीने सुरू असल्याने पर्यटकांसाठी अडचण निर्माण होते. त्यात स्मारकात लाईट वायरिंग नसल्याने स्मारकात सर्वत्र अंधारमुळे आणि शौचालय अपूर्ण व्यवस्था यामुळे स्मारकाला भेट देणाऱ्या पर्यटकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

सावरकरप्रेमींनी प्रशासनाकडून तत्काळ या कामाकडे लक्ष देण्याची मागणी केली आहे. 'स्मारकाच्या डागडुजीसाठी पाच महिने पुरेसे आहेत. मात्र प्रशासनाच्या चालढकल आणि संसाधनांच्या अभावामुळे हे काम रखडले आहे,' असे स्थानिक स्वातंत्र्यवीर सावरकर समूहाचे मनोज कुवर यांनी आरोप केला.

भगूर हे सावरकरांचे जन्मस्थान असल्याने या स्मारकाचे जतन राष्ट्रीय अभिमानाशी जोडले गेले आहे. सावरकरांच्या त्याग आणि देशभक्तीची साक्ष देणाऱ्या या ठिकाणाचा योग्य विकास होणे गरजेचे आहे. स्थानिकांनी प्रशासनाकडे त्वरित दखल घेण्याची मागणी करत स्मारकाच्या कामात येणाऱ्या अडथळ्यांचे कारण स्पष्ट करण्याची विनंती केली आहे.

पुरातत्त्व विभागाने कामावर लक्ष केंद्रित करणे आणि संसाधनांची व्यवस्था करणे गरजेचे आहे. पर्यटकांसाठी आवश्यक सुविधा लवकरात लवकर उभारून स्मारकाला नव्या रूपात सादर करणे ही काळाची गरज आहे. स्मारकाच्या डागडुजीतील विलंब हा केवळ स्थानिक पातळीवरचा मुद्दा नाही, तर तो राष्ट्रीय अभिमानाशी जोडलेला आहे. अशा ऐतिहासिक स्थळांची काळजी घेणे आणि त्यांची जपणूक करणे ही आपली जबाबदारी आहे. पुरातत्त्व विभागाने या बाबीकडे लक्ष देऊन त्वरित पूर्ण करावे आणि सावरकरांच्या स्मृतीला सन्मानपूर्वक जपावे, अशी अपेक्षा भगूरपुत्र स्वातंत्र्यवीर सावरकर समूहाचे मनोज कुवर, सुनील जोरे, प्रवीण वाघ, नीलेश हासे, संतोष मोजाड, संभाजी देशमुख, दीपक गायकवाड, शरद करंजकर, संदेश बुरके आदींनी व्यक्त केली आहे.

## सोलापूरहून थेट गाठता येणार गोवा

सोलापूर : सोलापूरकरांची आतुरता असलेल्या विमानसेवेसंदर्भातील महत्वाची माहिती आता समोर आली आहे. मागील काहीं वर्षांपासून होटगी रोडवरील विमानतळ सुरू करण्यासंदर्भातील हालचाली सुरू झाल्या होत्या.

याबाबत केंद्रीय उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनीही सोलापूरची विमानसेवा लवकर सुरू होईल, असे कळविले होते. त्यानंतर आता अखेर सोलापूर ते गोवा ही विमानसेवा सुरू होणार असल्याची माहिती समोर आली आहे. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी २६ मेपासून सोलापूर ते गोवा ही विमानसेवा सुरू होणार असल्याचे सांगितले आहे. फ्लाय ९१ या प्रवासी विमान वाहतूक करणाऱ्या कंपनीकडून सोलापूर विमानतळ येथून २६ मे रोजी पासून सोलापूर ते गोवा प्रवासी विमान सेवा सुरू करण्यात येणार आहे.



## अरुण पवार यांना गुणवंत शिक्षक पुरस्कार

**नाशिक : प्रतिनिधी**

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मुख्याध्यापक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना दरवर्षी विजय आप्पा करंजकर शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना पुरस्कार वाटप केले जाते. यात उत्कृष्ट संघटक म्हणून न्यू इंग्लिश स्कूल पळाशी हायस्कूलचे शिक्षक तसेच एन. डी. एस. टी. सोसायटीचे माजी चेअरमन व कार्यवाह विद्यमान संचालक, नाशिक जिल्हा टी. डी.एफ.चे कार्यवाह, तसेच नाशिक जिल्हा समन्वय समितीचे कार्यवाह अरुण पवार यांना काल शिवसेनेचे सचिव भाऊसाहेब चौधरी, दिंडोरी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भास्करराव भगरे, शिक्षक आमदार . किशोर भाऊ दराडे तसेच शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख विजय आप्पा करंजकर यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला.

याप्रसंगी सौ. सुनीता अहिरे, सौ.मनीषा गुंजाळ, सौ. ज्योती पवार तसेच शिक्षक नेते शिवाजी निरगुडे, नानासाहेब देवरे, के. के. अहिरे, साहेबराव कुटे, नेता बापू पवार तसेच एन. डी.एस.टी.चे चेअरमन शांताराम देवरे, संचालक दत्ता आदिक, समीर जाधव, संग्राम करंजकर, छोटू शिरसाट, अनिल देवरे, संजय मगर, जगदीश गुंजाळ, नीलेश ठाकूर, संजय बच्छाव, महेंद्र पवार, प्रसाद पंचवाघ व इतर मित्र परिवार हजर होता.

## सीता नवमी साजरी

**नाशिक : प्रतिनिधी** विश्व हिंदू परिषदेतर्फे सीता नवमीनिमित्त इंदिरानगर येथे मारुती मंदिरामध्ये आज सत्संग व प्रबोधनाचा कार्यक्रम आयोजित केला गेला होता. प्रमुख वक्त्या म्हणून स्वाती वाळिंबे होत्या, त्यांनी आधुनिक सीतांनी कसे वागावे याबद्दल मार्गदर्शन केले व सीतामाईंच्या वनवासाबद्दल माहिती सांगितली. विश्व हिंदू परिषदेचे अध्यक्ष विराज लोमटे यांनी प्रास्ताविक केले. सोनाली कुलकर्णी यांनी प्रमुख पाहुण्यांचा सत्कार केला. कांचन गायधनी यांनी सूत्रसंचालन केले. विश्व हिंदू परिषदेचे मंदिर अर्चक पुरोहित आयाम प्रमुख प्रशांत कुलकर्णी, बापट काका, देसाई काका, प्रेरणा जोशी, माधवी कुलकर्णी उपस्थित होते.

## मोबाइल चोरीचा प्रयत्न उधळला; दोघे चोरटे अटकेत

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

अंबड परिसरात मोबाइल चोरीचा प्रयत्न उधळत स्थानिक नागरिकांनी धाडस दाखवत दोघा चोरट्यांना पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. ही घटना २५ एप्रिल रोजी सायंकाळी ७.२० वाजता रेणुका बिअर शॉपीसमोर घडली.

ऋषीकेश सुरेश जाधव (वय २६), रहिवासी मारुती संकुल, अंबड हे कामावर जात असताना ते मोबाइलवर बोलत होते. त्याचवेळी निखिल संजय वाघ (वय २१) व गोपाल रोहिदास देवकाते (वय १९) या दोघांनी त्यांचा ओप्पो कंपनीचा मोबाइल हिसकावण्याचा प्रयत्न केला.

चोरीचा प्रयत्न पाहून अनिल कोतकर या नागरिकाने चोरांना पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र, चोरट्यांनी पळ काढताना त्यांच्या स्कूटीने अनिल कोतकर यांना धडक दिली, ज्यात ते जखमी झाले. तरीही परिसरातील नागरिकांनी तत्काळ धाव घेत चोरांना पकडले आणि अंबड पोलिसांच्या ताब्यात दिले. फिर्यादी ऋषीकेश जाधव यांच्या तक्रारीवरून अंबड पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

# चांदवडमध्ये मुस्लिम समाजाचा निषेध मोर्चा

**चांदवड : वार्ताहर**

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ चांदवड शहरातील मुस्लिम समाजाने रविवारी निषेध मोर्चा काढला. शहरातील चौक मस्जिद येथे मुस्लिम बांधव एकत्र जमले आणि तेथून शिवाजी चौक, सोमवारपेठ मार्गे चांदवड पोलीस स्टेशनपर्यंत गेले.

यावेळी आंदोलकांनी चांदवडचे पोलीस निरीक्षक कैलास वाघ यांना निवेदन दिले. निवेदनात म्हटले आहे की, ''सकल मुस्लिम समाजबांधव जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे भारतीय नागरिक पर्यटकांवर झालेल्या



दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध करत आहेत. दहशतवाद्यांनी केलेल्या या अमानुष गोळीबारात निष्पाप पर्यटकांची हत्या करणे हे निंदनीय आणि घृणास्पद आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की, जम्मू-काश्मीर हे पर्यटनासाठी अतिसंवेदनशील क्षेत्र असतानाही केंद्र सरकारने पहलगाम येथे पर्यटकांच्या सुरक्षेसाठी कोणतीही व्यवस्था केली नव्हती, हे स्पष्ट दिसत आहे. केंद्र शासनाच्या गुप्तचर यंत्रणेचेही हे अपयश आहे. सरकारने दहशतवाद आणि आतंकवाद रोखण्यात आलेले अपयश लपवण्यासाठी या हल्ल्याला हिंदू-मुस्लिम रंग देऊन देशाची कायदा व सुव्यवस्था बिघडवण्याचा प्रयत्न काही धार्मिक संघटना करत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. केंद्र सरकार या संघटनांना खतपाणी घालत असल्याचा दावाही करण्यात आला आहे.या घटनेबाबत केंद्र सरकारने कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही, तसेच गृहमंत्र्यांनीही कोणतीही पत्रकार परिषद घेतलेली नाही. याचा गैरफायदा घेऊन काही धार्मिक संघटना सोशल मीडियावर हा हल्ला इस्लामिक असल्याचे पोस्ट प्रसारित करत आहेत, असे निवेदनात नमूद केले आहे. मात्र, हल्ल्याच्या वेळी पर्यटकांचे प्राण वाचवण्यासाठी दहशतवाद्यांशी दोन हात करणारा २० वर्षीय मुस्लिम तरुण सय्यद आदिल हुसैन शाह याला विसरता कामा नये, असेही निवेदनात म्हटले आहे मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. निवेदनावर अल्ताफ शेख, जाकीर शहा, जाहीद घासी, काशिफ खान, शहनवाज शहा, मोहमंद साहेब फारुक पटेल, रहेमान बागवान, वासीफ शेख, अशपाक तांबोळी, मजीद खान यांच्यासह चांदवड शहरातील अनेक मुस्लिम कार्यकर्त्यांच्या सह्या आहेत.


## टायटल व्हेरिफीकेशनसाठी नोटीस

तमाम लोकांस कळविणेत येते की, तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका निफाड, पैकी **मौजे शिरसगाव,** ग्रामपंचायत हद्दीतील शेतजमिनीची मिळकत **गट नंबर ३४८/१** यांसी **क्षेत्र हेक्टर ९९ आर + पो.ख.० हेक्टर ०५ आर यासी आकार १० रूपये ६२ पैसे**. यापैकी **श्री. लक्ष्मण नामदेव जगझाप** यांचे हिश्श्याचे गटाचे पश्चिम बाजूने उत्तर कोप-यातील दक्षिण उत्तर लांबीचे संपूर्ण **क्षेत्र ० हेक्टर ८० आर** यांसी **आकार २ रूपये १४ पैसे. श्री. लक्ष्मण नामदेव जगझाप.** रा. ओझर मिग. ता. निफाड. जि. नाशिक. ४२२२०७. यांचे मालकीची व कब्जावहिवाटीची असल्याचे सांगून, त्यांनी सदर मिळकत आमचे अशिलांना निर्वेध व बोजाविरहीत आहे, असे सांगून त्याचे सोबत व्यवहाराची बोलणी करुन व विसाराची रक्कम ही स्वीकारलेली आहे. तथापि, उपरोक्त मिळकतीचे टायटल व्हेरिफीकेशनसाठी ही नोटीस प्रसिध्द करीत आहोत.सबब, उपरोक्त मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लीन, लिज, अन्नवस्त्र, बक्षिसपत्र, हक्क, हितसंबंध, करार मदार अगर इतर कोणत्याही प्रकारचा बोजा अगर हक्क असल्यास अगर कोणाचीही सदर व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून खालील पत्यावर ७ दिवसांचे आत कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी हरकत नोंदवावी. परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. सबब, उपरोक्त मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे, असे समजून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल यांची नोंद घ्यावी. कळावे ही जाहीर नोटीस. ता. २८/०४/२०२५.

**ॲड. प्रकाश भास्कर बोडके**
**ॲडव्होकेट ॲण्ड नोटरी**
**श्री'' झेरॉक्स ॲण्ड स्टॅम्पवेंडर, २३ बसवंत मार्केट, पिंपळगाव (ब).**
**ता. निफाड. जि. नाशिक मो.नं. ९८५०१५६५८८**


### पान १ वरून....

## व्हिसा मुदत संपलेल्या पाकिस्तानींची पाठवणी

तत्काळ देश सोडावा लागेल. या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी पोलिस आणि इमिग्रेशन विभागाच्या अधिकाऱ्यांनी तयारी केली आहे. गुरुदासपूर, अमृतसर, फिरोजपूर आणि पंजाबच्या इतर सीमावर्ती जिल्ह्यांतील अनेक पाकिस्तानी नागरिकही आज सीमेवर रवाना झाले. परवानगीशिवाय कोणीही भारतात राहू नये म्हणून अधिकारी प्रत्येक ठिकाणी कागदपत्रे तपासत आहेत.

## २१०० रुपयांवरून झिरवाळ यांचेही घुमजाव

महायुती सरकार पुन्हा सत्तेत येऊन देखील लाडक्या बहिणींच्या हप्त्यामध्ये पुन्हा वाढ न करण्यात आल्यानं विरोधकांकडून सवाल उपस्थित करण्यात येत आहेत. त्यावर जाहीरनामा ५ वर्षांसाठी असतो, असं उत्तर सत्ताधाऱ्यांकडून देण्यात आलं आहे. मात्र, आता तर १५०० रुपयांत लाडक्या बहिणी खुश आहेत, २१०० देऊ असं म्हटलंच नसल्याचे राज्य सरकारमधील मंत्री झिरवळ यांनी म्हटलं आहे.

## प्रेम विवाह केल्याच्या रागातून मुलीची हत्या

गंभीर जखमी झाला आहे. मृत तरुणी तृप्तीचे वडील किरण अर्जुन मंगले हे सीआरपीएफचे निवृत्त अधिकारी आहेत. त्यांनी त्यांच्या परवाना असलेल्या बंदुकीचा वापर करुन हा गोळीबार केला. या घटनेनंतर हळदी समारंभातील इतर वऱ्हाड्यांनी आरोपीला बेदम मारहाण केली असून त्याच्या विरोधात चोपडा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आली आहे. तसेच आरोपी देखील या मारहाणीत जखमी झाल्यामुळे त्याला जळगाव येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. सध्या पोलिसांनी आरोपी किरण यांनी या गुन्ह्यात वापरलेली पिस्तूल जप्त केली आहे, अशी माहिती जळगावचे पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी दिली.

## नाशिक-शिर्डी रेल्वे मार्गाचे सर्व्हेक्षण पाडले बंद

रहिवासी, व्यावसायिक, शेतकरी आदींना विचारात घेतलेले नाही. या प्रकल्पासाठी शेतक-यांच्या परंपरागत जमिनी घेतल्या जाणार आहे. हे विकसित क्षेत्र असून बागायती आहेत. गहू, भाजीपाला, कांदा आदी बारमाही नगदी पीक घेतले जाते. द्राक्ष, आंबा, पेरू आदी बागा चाडेगाव अन्य गावात आहेत. रेल्वेने या प्रकल्पासाठी ओसाड, नापिक जमिनी घ्याव्यात, शेती व अन्य व्यवसाय उध्वस्त करू नये.

## १७ सिंधी पाकिस्तानी नागरिकांची आज रवानगी

**उल्हासनगर** : शॉर्ट टर्म व्हिसावर १७ पाकिस्तानी नागरिक शहरांत वास्तव्यास राहत असल्याची माहिती उघड होऊन त्याला पोलीस उपायुक्त सचिन गोरे यांनी कबुली दिली. पहलगाम दहशदवादी हल्ल्यानंतर त्यांना देश सोडून जाण्याचे फर्मान सरकारने काढल्याने, ते सोमवारी देश सोडून जाणार असल्याचेही गोरे म्हणाले. सर्व १७ पाकिस्तानी नागरिक हे सिंधी समाजाचे आहेत.फाळणीच्या वेळी विस्थापित झालेला सिंधी समाजाला देशाच्या विविध भागात वसविण्यात आले. उल्हासनगरात वसविण्यात आलेल्या सिंधी समाजाचे अनेक नातेवाईक आजही पाकिस्तान मध्ये आहेत. सण व विविध उत्सावावेळी ते एकत्र येतात. भारतीय सिंधी सभेच्या पर्यत्नातून आजपर्यंत १४० जणांना भारतीय नागरिकत्व देण्यात आल्याची माहिती सिंधी अकादमीचे महेश सुखरामनी यांनी दिली. गेल्या स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमात शहरातील सिंधूभवन मध्ये भारतीय नागरीकत्व देण्यात आलेल्या ६५ सिंधी नागरिकांनाचा सत्कार करण्यात आला होता. शॉर्ट टर्म व्हिसावर आलेल्या १७ सिंधी समाजाच्या पाकिस्तानी नागरिकांना पहलगाम हल्ल्यानंतर देश सोडून जाण्याचे सरकारने आदेश काढले.


## जाहीर इशारा नोटीस

तमाम लोकांस विशेषत: **१. गोपाळ सक्रु मेरंदे, २ . पंडीत सक्रु मेरंदे, ३. भिमाबाई पांडु मांगटे ४. जयराम लहानु मोंढे** यांस कळविणेत येते की, तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका त्र्यंबकेश्वर जिल्हा परिषद नाशिक पैकी पंचायत समिती त्र्यंबकेश्वर पैकी, **मौजे देवगाव** येथील **गट नं. १२८** याचा जुना **सर्व्हे नं. ११९, १२१, १२१/१, १२१/२** या मिळकती संदर्भात आमचे पक्षकार नामे **१. श्री. रमेश भाऊ मेरंदे २. श्री. दिलीप भाऊ मेरंदे ३. श्री. बाळु भाऊ मेरंदे ४. श्री. राजाराम भाऊ मेरंदे** सर्व रा. मु. आव्हाटे, पो. देवगाव, ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक यांचे वर वर्णन केलेल्या व्यक्तीं सोबत वाद चालू असून, असे असताना ७/१२ उताऱ्यावर अगर अधिकार अभिलेखात नावे असल्याचा गैरफायदा घेवुन वर नमूद केलेल्या व्यक्ती सदर मिळकतीचे विल्हेवाट लावण्याचे प्रयत्नात आहेत असे खात्रीलायकरित्या आमचे पक्षकारास समजले आहे. त्यास आमचेवर नमूद पक्षकार यांची तीव्र हरकत आहे. म्हणून सदर मिळकती संदर्भान्वये कोणीही कोणत्याही स्वरूपाचे व्यवहार करू नये केल्यास सदर व्यवहार आमचे पक्षकाराचे व यांचे कायदेशीर हक्क सांगणारेचे कायदेशीर हक्कावर बंधनकारक राहणार नाही व कायदेशीर कारवाईस पात्र राहतील यांची नोंद घ्यावी कळावे.

**दिनांक : २९/०४/२०२५**

**ॲड. उमेश दगडू खैरनार**
**२०७ बी, मेघदूत शॉपींग सेंटर, सी.बी.एस. जवळ, जिल्हा व सत्र न्यायालय समोर, नाशिक-४२२००२. मो. नं. ९६१९७०००६३**


# पावसाळ्यापूर्वी नाल्यांची दुरुस्ती, साफसफाई करावी

## नागरिकांची मनपा प्रशासनाकडे मागणी

**नाशिक : प्रतिनिधी**

शहरातील अनेक भागांमध्ये पावसाळी नाले असून, या नाल्यांमध्ये माती, कचरा मोठ्या प्रमाणावर साचलेला आहे तर काही नाल्यावरील ढापे हे बुजलेले दिसून येतात. अनेक वर्षांपूर्वी बांधण्यात आलेले हे पावसाळी नाले अरुंद असून, नियमित साफसफाई न झाल्याने त्यांची खोली दिवसेंदिवस कमी होत नाले बुजले जात आहे. यामुळे पावसाळ्यात रस्त्यांवर, गल्लोगल्ली मोठ्या प्रमाणावर पाणी वाहताना दिसते.

नवीन सिडको, गणेश चौक येथे गेल्या अनेक वर्षांपासून पावसाळ्यात रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचत आहे. या पाण्याचा निचरा होत नसल्याने हे पाणी गणेश चौकातील खालील गल्ल्यांकडे वळत असल्याने थेट लोकांच्या घरात घुसते. गणेश चौक व्यापारी संकुल ते त्रिलोकेश्वर मंदिर या ठिकाणचा पावसाळी नाला हा पूर्णपणे कचरा व मातीने भरलेला असून पावसाळ्यात जमा होणारे पाणी या नाल्यातून पुढे वाहत नसल्याने रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचते. व्यावसायिकांच्या दुकानात पाणी शिरते. यामुळे दरवर्षी मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असते. या नाल्याची रुंदी व खोली मोठी करून या ठिकाणी नवीन पाइप टाकण्यात यावे व नाल्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून वारंवार केली जात आहे.



या ठिकाणी ५/६ वर्षांपूर्वी पावसाळी नाला तयार करण्यात आला. परंतु, हा नाला ज्या ठिकाणी पावसाचे पाणी साचते त्या ठिकाणी करणे अपेक्षित असताना विरुद्ध दिशेला रहिवासी, लोकांच्या घरालगत नालाचे काम करण्यात आले आहे. या नाल्याचा कुठलाही उपयोग न होता उलट या नाल्यामुळे परिसरात दुर्गंधी, उंदीर – घुशी तसेच साप देखील निघत आहे तसेच नाल्याचे काम अतिशय निकृष्ट पद्धतीने केलेले असल्याने आतापर्यंत दोन ते तीन वेळा याची दुरुस्ती करण्यात आल्याने जनतेच्या पैसा पाण्यात वाया जात असल्याचे बोलले जात आहे.

**–योगेश कातकाडे, करसल्लागार**

गणेश चौक व्यापारी संकुल – सार्वजनिक मुतारी ते मनपा शाळेची भिंत या ठिकाणी मोठ्या प्रमाणात अनेक वर्षांपासून पावसाचे पाणी साचत आहे. दोन महिन्यांवर पावसाळा आला असल्याने केवळ वरचे वर साफसफाई न करता योग्य पद्धतीने कामकाज करून कायमस्वरूपी प्रश्न सुटला पाहिजे, अन्यथा आम्ही सर्व नागरिक रस्त्यावर उतरून जनआंदोलन करू.

**– कुणाल धात्रक (सामाजिक कार्यकर्ते)**

## उन्हाळ्यामुळे मासळीला मागणी कमी

**मुंबई :** देशाची पूर्व व पश्चिम किनारपट्टीहून गणेश पेठेतील मासळी बाजारात मासळीची आवक कमी प्रमाणात होत आहे. उन्हाळ्यामुळे मासळीला मागणी कमी झाल्याने भावात पाच ते दहा टक्क्यांनी घट झाली होती. चिकन, मटण आणि गावरान, इंग्लिश अंड्याचे भाव स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. खोल समुद्रातील मासळी १० टन, खाडीच्या मासळीची २०० किलो आणि नदीच्या मासळीची ४०० किलो आवक झाली.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**शेलपिंपळगाव :** खेड तालुक्यातील मांजरेवाडी गावात एका नराधमाने एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून तिचा क्रूरपणे खून केल्याची घटना ताजी असतानाच शेलपिंपळगाव हद्दीतील मोहितेवाडी येथे एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीवर २६ वर्षीय नराधमाने अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. दरम्यान आरोपी आसीम मुलानी याचेवर बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत चाकण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.


## गांवकरी Classified

जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

### पाहिजेत

राणेनगर येथील टू व्हीलर व फोर व्हीलर शोरूमसाठी CRM/ DBM रिसेप्शनिस्ट, मेकॅनिक, सर्विस ॲडव्हायझर, स्पेअर पार्ट मॅनेजर, टेलीकॉलर, हाऊस कीपिंग, ऑफिस बॉय, वॉशिंग बॉय, अकाउंटंट त्वरित पाहिजेत. **संपर्क :** ९२७२०९१४२५

---

दुकान कामासाठी मुले व मुली पाहिजे.श्री गिफ्ट ॲण्ड टॉईज, कानडे मारुती लेन, नाशिक. **संपर्क-** ९८९००१३१३६

---

गंगापूररोड, पाईपलाईनरोडयेथील कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता १० वी-१२ वी पास-नापास ऑफिसबॉय पाहिजे. ८२३७३११२११

---

नामांकित बँकेच्या वसुलीसाठी डीआरए परीक्षा पास झालेले महिला व पुरुष उमेदवार पाहिजेत: संपर्क ९९६०३५०००५

### पाहिजेत

महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त कंपनीसाठी,आडगाव विंचूर गवळी शिवार नाशिक येथे कायमस्वरूपी कामासाठी फील्ड ऑफिसर पाहिजे. शिक्षण किमान १० वी पास, वय २१ ते ६५. **संपर्क** ९२२०२४२५५५

---

कोहिनूर ज्वेलर्स, पखाल रोड, अशोका मार्ग, १२ वी पास मुलगी पाहिजे. **संपर्क-९८६०१३६५३६**

### महिला व पुरूष पाहिजेत

Draftsman part time आटोक्याड नॉलेज-१, ऑफिस कामासाठी-४, कोर्ट व महापालिकेच्या कामासाठी-२, ड्रायव्हर-१, वकील पार्ट टाइम-१, अकाऊंटंट पार्ट टाइम-१, भटजी देवपूजा करण्यासाठी-१ **एन.एन. असोसिएटस्**, तिसरा मजला, आय. डी.बी.आय. बँकेच्यावर, साठे बाग, एम.जी.रोड, नाशिक. वेळ- सकाळी १२ ते ५. संपर्क- 8668862801

### विकणे आहे

शरदचंद्र पवार फ्रुट मार्केट यार्डच्यामागे, विबगोर शाळा रोड, नाशिक येथील 2BHK फर्निचरनी सुसज्ज फ्लॅट त्वरित विकणे आहे. **संपर्क-** ७२०८४९८५२३

पाथर्डी फाटा, ज्ञानेश्वरनगर, साईसंकल्प बिल्डींग फ्लॅट विकणे आहे. पहिला मजला **संपर्क:** ९९७००३९०४६

### जमीन विकणे आहे

मंजूर तालुका कोपरगाव, जिल्हा अहिल्यानगर येथे जमीन विक्री करणे आहे, शिर्डी-लासलगाव हायवेजवळ/गोदावरी गंगा नदीचे पासून १.५ किलो मीटर अंतरावर ८ एकर विहीर बागायती जमीन विक्री करणे आहे. गट नंबर २८४/२,३,४,५ शिर्डीपासून २८ किलोमीटर मागे. **संपर्क-** ८७८८०९२४१५



## जाहीर निवेदन

सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, **श्रीमती आशा संजीव तडवी.** रा- फ्लॅट नं. ५. प्रसाद विहार अपार्टमेंट श्रमनगर २, उपनगर, नाशिक, ता. जि. नाशिक. येथील रहिवाशी असून माझे पती नामे **संजीव महमंद तडवी** हे सार्वजनिक बांधकाम विभाग, मालेगाव येथे वरिष्ठ लिपीक या पदावर कार्यरत होते. तसेच त्यांचे **दि.१२/०३/२०२५** रोजी मयत झालेले असून त्यांना खालीलप्रमाणे वारस आहेत.

| अ.नं. | वारसांचे नाव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | श्रीमती आशा संजीव तडवी | ४२ | पत्नी |
| २) | श्री. रोशन संजीव तडवी | २३ | मुलगा |
| ३) | कुमारी. शायना संजीव तडवी | २१ | मुलगी |

हे वारस असून या व्यतिरिक्त दुसरे कोणीही वारस नाहीत तरी कुणास काही हरकत असल्यास त्यांनी मा. तहसिलदार सो, नाशिक यांचेकडे ७ दिवसांच्या आंत लेखी खुलासा करावा अन्यथा मा. तहसिलदार नाशिक यांचेकडून वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर प्रमाणपत्र हे शासकीय पेन्शन, ग्रॅज्यूएटी, व बँकेतील रक्कमा व इतर यासाठी देण्यात येणार आहे. त्यांच्या नावे त्यांच्या मृत्यू पश्चात त्यांच्या पेन्शन खात्यातील रक्कम हया व्यतिरिक्त उर्वरीत सर्व रक्कमा व इतर सर्व प्रशासकीय लाभ इतर लाभांच्या जमा असलेल्या रकमांवर नॉमेनी/वारस नावे म्हणून लावलेले आहे.

**तहसिलदार**



## ग्रुप ग्रामपंचायत माळेगांव,ता.सिन्नर जि.नाशिक

### जाहीर बी-१ निविदा सुचना क्र.२ सन २०२५/ २०२६(प्रथम प्रसारण )

मा.सरपंच ग्रामपंचायत माळेगाव ता.सिन्नर जि.नाशिक हे खालील कामांच्या बी-१ पध्दतीने मोहर बंद पध्दतीने वर्ग ५ अ व वरील नोंदणीकृत ठेकेदाराकडून मागवित आहेत.निविदा दि.२८/०४/२०२५ ते ०४/०५/२०२५ रोजी दुपारी ५:०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात सुट्टीचे दिवस वगळुन स्विकारण्यात येतील.

| अ. नं. | कामाचे नाव | निविदा रक्कम | बयाणा रक्कम | सुरक्षा अनामत रक्कम (देयकातून कपात) | निविदा विक्री किंमत ५००+ GST | निविदा विक्री व स्विकृतीचा दिनांक | काम पुर्ण करण्याची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | मापारवाडी येथे वसंत गाडे ते नाला रस्ता मजबुतीकरण करणे. | ४११२६/- | ५०००/- | २.५% | ५९०/- | दि.२८/०४/२०२५ ते दि. ०५/०५/२०२५ सकाळी ११:०० वाजेपर्यंत | ६ महीने |

टिप :- १) समकक्ष सरकारी कामे केल्याचे अनुभवाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.२) सशर्त निविदा स्विकारले जाणार नाही.मात्र ज्या ठेकेदारांची निविदा स्विकारली जाईल त्यांना मजिप्रा चे सर्व अटी नियम बंधनकारक राहतील ३) जीएसटी सर्टीफिकेट,पॅनकार्ड ३ वर्षाचे रिटर्न्स जोडणे आवश्यक.४) मोहरबंद निविदा दि.२८/०४/२०२५ ते ०५/०५/२०२५ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालय,माळेगाव ता.सिन्नर जि.नाशिक येथे स्विकारले जातील. ५)मोहरबंद निविदा दि.०६/०५/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामपंचायत सदस्य,ठेकेदार,किंवा त्यांचे प्राधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष मा.सरपंच यांच्या परवानगीने उघडले जातील.६)सिलबंद लखोट्यावर कामाचे नांव,मक्तेदाराचे नांव लिहीणे आवश्यक.७)कोणतेही कारण न देता निविदा स्विकारण्याचा/नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायत माळेगाव यांनी राखुन ठेवला आहे.

**सरपंच** **ग्रामपंचायत अधिकारी**

**ग्रुप ग्रामपंचायत माळेगांव/मापारवाडी, ता. सिन्नर, जि. नाशिक.**

## महत्त्वाचे

### पाथर्डीफाटा परिसरात रिलेशनशिप वादातून चॉपरने धमकी, आठ जणांविरुद्ध गुन्हा

**सिडको : विशेष प्रतिनिधी** पाथर्डीफाटा परिसरातील मालपाणी सेप्रोन सोसायटीत रिलेशनशिप वादातून मध्यरात्री गोंधळ घालण्यात आला. आठ जणांच्या टोळीने एका व्यक्तीच्या घराचा दरवाजा ठोठावून, शिवीगाळ व धमकावले. इतकेच नव्हे तर एका साक्षीदाराला चॉपरसारख्या हत्याराने धमकावल्याची घटना घडली.

फिर्यादी दीपकसिंग भंडारी (वय ४१, रा. एक्स्प्रेस इन हॉटेल मागे, पाथर्डीफाटा) यांनी इंदिरानगर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपींपैकी प्रदीप मोहनलाल कांकरिया एका महिलेसोबत रिलेशनशिपमध्ये राहत आहे. याच कारणावरून फिर्यादी यांचा काहीही संबंध नसताना, राजेंद्र चौधरी, सिद्धांत चौधरी, परम कांकरिया, नितीन धाडीवाल, मोहन धाडीवाल, प्रीती कांकरिया, स्वाती कांकरिया, अरुणा जैन या आठ जणांनी फिर्यादीच्या घराच्या दरवाज्याला हाता-लाथांनी मारून शिवीगाळ केली. यावेळी पार्किंगमध्ये उपस्थित असलेल्या साक्षीदार श्रीराम वारुंगसे यास आरोपी राजेंद्र चौधरी याने हातातील चॉपरसारखे स्टीलचे हत्यार पोटाजवळ लावत धमकी दिली, 'तू आमच्यामध्ये पडू नको, तुझा गेम करून टाकीन' अशी तीव्र धमकी दिली. यानंतर इतर आरोपींनी सोसायटीतील इतर सदस्यांनाही शिवीगाळ करत दमदाटी केली. या प्रकरणी इंदिरानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक तृप्ती सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहवा पवार करीत आहेत.




### पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध

**सिडको :** काश्मीरमधील पहलगाम येथे हिंदूंवर टार्गेट करून करण्यात आलेल्या अमानवी दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध नोंदवण्यासाठी काल संध्याकाळी नाशिकमधील रविवार कारंजा येथे हिंदू एकता आंदोलन पक्षातर्फे जोरदार आंदोलन करण्यात आले. यावेळी संतप्त कार्यकर्त्यांनी भारत माता की जय, वंदे मातरम, पाकिस्तान मुर्दाबाद, एक धक्का और दो, पाकिस्तान तोड़ दो, बदला लो, बदला लो, जला दो, जला दो पाकिस्तान जला दो, अशा प्रखर राष्ट्रवादी घोषणा दिल्या. आंदोलनादरम्यान पाकिस्तानचा ध्वज तसेच दहशतवाद्यांचे फोटो जाळून संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली. या आंदोलनात हिंदू एकता आंदोलन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामसिंग बावरी, जिल्हाध्यक्ष किशोर बागमार, शहराध्यक्ष किरणसिंग पवार, कालीचरण महाराज, प्रसाद बावरी, प्रियांका अहिरराव, ॲड. श्रीकांत पाटील, कल्याणसिंह परदेशी, मनोज मराठे, उमेश पाटील, राजेंद्र समशेर, नितीन खैरनार, प्रताप पवार, अनिल जाधव, राजेश धुमाळ, रोहन पवार, मोहन पवार, किरण कळसकर, अविनाश शिंदे, सोमनाथ यंदे, विजय राख, दिलीप क्षीरसागर, मिथुन परदेशी, अर्जुन समशेर, राजेंद्र परदेशी, श्रावण खर्डे, प्रथमेश तालखे यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व देशभक्त नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. हिंदू एकता आंदोलन पक्षाने केंद्र सरकारकडे मागणी केली की, या हल्ल्याचा सर्जिकल प्रतिशोध घ्यावा आणि पाकिस्तानला योग्य ती जागा दाखवावी. तसेच अशा घटनांवर कायमचा बंदोबस्त करावा, अशी संतप्त प्रतिक्रिया आंदोलनकर्त्यांकडून व्यक्त झाली.

### गारमेंट दुकानातून ८२ हजारांची चोरी

**सिडको :** सिडको परिसरातील अंबिका संकुल, संजीवनगर येथील एका गारमेंट दुकानात चोरीची धक्कादायक घटना घडली असून, या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. इफ्तिकार राहिल खान (वय ४३), हे संजीवनगर येथील रहिवासी असून, त्यांचे अंबिका संकुलमध्ये गारमेंटचे दुकान व गोडावून आहे. १७ एप्रिलच्या रात्री १२ ते १८ एप्रिलच्या सकाळी ७ वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या गोडावूनमधून तीन गठ्ठे फॅब्रिक कपडे चोरले. या कपड्यांची एकूण किंमत ८२ हजार रुपये इतकी आहे. या चोरीत विविध कंपन्यांच्या फॅब्रिक कपड्यांचा समावेश आहे. चोरीची माहिती मिळताच फिर्यादी इफ्तीकारखान यांनी अंबड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.




### पाकचा ध्वज जाळून पहलगाम हल्ल्याचा निषेध

**जुने नाशिक :** पहलगाम येथे हिंदूंवर टार्गेट करून करण्यात आलेल्या अमानवी दहशतवादी हल्ल्याचा निषेध नोंदवण्यासाठी रविवार कारंजा येथे हिंदू एकता आंदोलन पक्षातर्फे पाकिस्तानचा ध्वज तसेच दहशतवाद्यांचे फोटो जाळून आंदोलन करण्यात आले. यावेळी भारत माता की जय, वंदे मातरम, पाकिस्तान मुर्दाबाद, एक धक्का और दो, पाकिस्तान तोड़ दो, बदला लो, बदला लो, जला दो, जला दो, पाकिस्तान जला दो, अशा घोषणा देण्यात आल्या. आंदोलनात हिंदू एकता आंदोलन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामसिंग बावरी, जिल्हाध्यक्ष किशोर बागमार, शहराध्यक्ष किरणसिंग पवार, कालीचरण महाराज, प्रसाद बावरी, प्रियांका अहिरराव, ॲड. श्रीकांत पाटील, कल्याणसिंह परदेशी, मनोज मराठे, उमेश पाटील, राजेंद्र समशेर, नितीन खैरनार, प्रताप पवार, अनिल जाधव, राजेश धुमाळ, रोहन पवार, मोहन पवार, किरण कळसकर, अविनाश शिंदे, सोमनाथ यंदे, विजय राख, दिलीप क्षीरसागर, मिथुन परदेशी, अर्जुन समशेर, राजेंद्र परदेशी, श्रावण खर्डे, प्रथमेश तालखे यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व देशभक्त नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दरम्यान केंद्र सरकारने या हल्ल्याचा सर्जिकल प्रतिशोध घ्यावा आणि पाकिस्तानला योग्य ती जागा दाखवावी. तसेच, अशा घटनांवर कायमचा बंदोबस्त करावा, अशी संतप्त प्रतिक्रिया आंदोलनकर्त्यांकडून व्यक्त करण्यात आली.



### डांग सेवा मंडळ पतसंस्थेच्या अध्यक्षपदी बीडकर

**अभोणा :** डांग सेवा मंडळ कर्मचारी पतसंस्थेच्या अभोणा येथील कार्यालयात संचालक मंडळाची सभा झाली. त्यात अध्यक्षपदी मृणाल बीडकर यांची तर उपाध्यक्षपदी प्रा. डॉ. रवींद्र पगार यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. इतर कार्यकारिणीत कार्यवाहपदी सुनील धात्रक व खजिनदारपदी संजय बागुल यांची नियुक्ती करण्यात आली. निवडणूक अधिकारी म्हणून योगेश कराटे, सहाय्यक सहकार अधिकारी, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था कळवण यांनी कामकाज पाहिले. याप्रसंगी सचिव देवीदास येवला, सचिन कुलकर्णी, कमलेश शेलार, महेंद्र सूर्यवंशी, धनंजय सोनवणे, ज्ञानेश्वर सोनवणे, गौरव बागुल आदी उपस्थित होते.

# बसमध्ये दागिने चोरी करणारे बंटी-बबली जेरबंद

## सोन्याचे दागिने, स्विफ्ट कारसह मुद्देमाल जप्त : युनिट एकची कारवाई

**पंचवटी/सिडको : प्रतिनिधी**

**बसमध्ये चढणाऱ्या पुरुष व महिलांच्या गळ्यातील तसेच पर्समधील सोन्याचे दागिने चोरी करणारे बंटी-बबली जेरबंद करण्यात गुन्हे शाखा युनिट क्रमांक एकला यश मिळाले असून, त्यांच्याकडून सोन्याच्या दागिन्यांसह स्विफ्ट कारसह एकूण ९ लाख ४१ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.**

याबाबत अधिक माहिती अशी की, दि.३० नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास फिर्यादी सुरेश रणसिंग हे महामार्ग बसस्टॅण्ड, नाशिक येथून नाशिक ते सोलापूर बसमध्ये चढत असताना त्यांच्या गळ्यातील सोन्याची चेन चोरी झाल्याबाबत मुंबई नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्या अनुषंगाने नाशिक शहरामध्ये महामार्ग बसस्थानक, ठक्कर बाजार बसस्थानक, मेळा बसस्थानक, नाशिक या बसस्थानक परिसरात गर्दी वाढत असून, या गर्दीचा फायदा घेऊन चोरटे हे प्रवाशांच्या गळ्यातील, बॅगेतील सोने व रोख रक्कम चोरी करण्याच्या घटना वाढल्या होत्या. त्यामुळे सदर गुन्हे उघडकीस आणण्याबाबत पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांनी सूचना दिल्या होत्या. तर पोलिस उपायुक्त (गुन्हे) सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे शाखा संदीप मिटके यांनी गुन्हे शाखा युनिट एकचे अधिकारी व अंमलदार यांची पथके तयार करून सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याबाबत मार्गदर्शन केले होते.

त्यानुसार गुन्हे शाखा युनिट क्रमांक एकचे पोलिस अधिकारी व अंमलदार गुन्ह्याचा समांतर तपास करीत असताना पोलीस हवालदार प्रशांत मरकड यांना मिळालेल्या माहितीनुसार गुन्हा मंगेश अशोक राखपसरे व त्याची पत्नी निशा मंगेश राखपसरे यांनी केला असून, ते सध्या संसरी गाव, देवळाली कॅम्प परिसरात असल्याची माहिती मिळाल्याने सदरची माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक मधुकर कड यांना दिली. त्यानुसार त्यांनी गुन्हे शाखा युनिट एकचे पोलिस उपनिरीक्षक रवींद्र बागुल, हवालदार प्रशांत मरकड, विशाल काठे, प्रवीण वाघमारे, संदीप भांड, प्रदीप म्हसदे, नाझीमखान पठाण, पोलिस नाईक विशाल देवरे, मिलिंदसिंग परदेशी, पोलिस अंमलदार जगेश्वर बोरसे, महिला पोलिस हवालदार शर्मिला कोकणी, अनुजा येलवे, चालक पोलिस हवालदार सुकाम पवार, पोलिस अंमलदार समाधान पवार यांचे पथक तयार करून त्यांचा शोध घेऊन कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिले.

त्या अनुषंगाने नमूद पथकाने संसरीगाव, देवळाली कॅम्प येथे जात मारुती मंदिर संसरीगाव या ठिकाणी मंगेश अशोक राखपसरे व त्याची पत्नी निशा यांना पथकाने ताब्यात घेतले. मंगेश अशोक राखपसरे, रा. गजानन चौक, अवधूतवाडी, पंचवटी, नाशिक सध्या रा. संसरीगाव, देवळाली कॅम्प, नाशिक, निशा मंगेश राखपसरे यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. तसेच त्यांनी आणखीही गुन्हे केल्याची कबुली दिली. त्यानंतर संशयित मंगेश राखपसरे, त्याची पत्नी निशा यांनी चोरी केल्याचे सांगून चोरी केलेले सोने सोनारास विक्री केले असे सांगितले. त्यावरून सोनाराने गुन्ह्यातील ६ लाख रुपये किमतीच्या ८० ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या लगडी जमा केल्या. तसेच सोने विकून विकत घेतलेली ३ लाख ४१ हजार रुपये किमतीची स्विफ्ट डिझायर कार असा एकूण ९ लाख ४१ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करून एकूण पाच गुन्हे उघडकीस आणले आहेत. गुन्ह्याचा पुढील तपास मुंबई नाका पोलिस ठाणे करीत आहेत.

**या पोलिस ठाण्यांमधील गुन्हे उघडकीस**

१) मुंबईनाका पोलीस ठाणे गुरनं. ३६१/२०२४ भा. न्या. सं. कलम ३०३ (२) प्रमाणे.
२) पंचवटी पोलीस ठाणे गुरनं ७५३/२०२४ भा. न्या. सं. कलम ३०३ (२) प्रमाणे
३) सरकारवाडा पोलीस ठाणे गुरनं. ०४/२०२५ भा. न्या. सं. कलम ३०३(२) प्रमाणे
४) सरकारवाडा पोलीस ठाणे गुरनं. २४/२०२५ भा. न्या. सं. कलम ३०३ (२) प्रमाणे
५) मुंबईनाका पोलीस ठाणे गुरनं. २९/२०२५ भा.न्या.सं. कलम ३०३ (२) प्रमाणे



### गोवंश जातीच्या ६ जनावरांची सुटका

गुंडाविरोधी पथकाची यशस्वी कारवाई, दोन आरोपी जेरबंद

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

नाशिक शहरात गोवंश जातीच्या जनावरांची अवैध वाहतूक व कत्तलीस आळा बसवण्यासाठी पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या आदेशानुसार गुन्हे शाखेच्या गुंडाविरोधी पथकाने मोठी कारवाई केली आहे. गिरणारे गावाहून गंगापूर मार्गे नाशिक शहरात कत्तलीसाठी आणली जात असलेली गोवंश जातीची सहा जिवंत जनावरे ताब्यात घेऊन दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

गुंडाविरोधी पथकाला मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, गंगापूर रोडवरील भोसला मिलिटरी स्कूल समोरील रस्त्यावर सापळा रचण्यात आला.

त्यावेळी बोलेरो पिकअप (क्र. एम.एच.१५ एफ.व्ही. ९७२४) वाहन थांबवून तपासणी केली असता, त्यामध्ये सहा गोवंश जातीची जिवंत जनावरे आढळून आली. वाहनचालक नामदेव सुकदेव पावडे (४२, रा. पिंपळद, नाशिक) आणि त्याचा साथीदार अरकान उर्फ अप्पू अजीज कुरेशी (२४, रा. मदिनानगर, नाशिक) यांनी जनावरे गिरणारे येथून उचलून वडाळागावातील निसार कुरेशी यांच्या गोडावूनमध्ये कत्तलीसाठी नेत असल्याचे सांगितले.

पथकाने दोन्ही आरोपींना ताब्यात घेऊन एकूण ५ लाख ६० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. पुढील कारवाईसाठी आरोपींना गंगापूर पोलिस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कामगिरी संदीप कर्णिक (पोलीस आयुक्त), प्रशांत बच्छाव (उपआयुक्त, गुन्हे) आणि संदीप मिटके (सहाय्यक आयुक्त गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत सहा. पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर मोहिते व त्यांच्या सहकाऱ्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

### रिक्षा प्रवासात दोन महिलांकडून सोन्याचे दागिने लंपास

**पंचवटी : वार्ताहर**

छत्रपती संभाजीनगर रोडवरील नांदूर नाका ते कपिलश्वरनगर दरम्यान रिक्षात प्रवास करणाऱ्या दोन महिलांकडून सोन्याची दागिने लंपास करण्याची घटना घडली आहे. याबाबत आडगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अश्विनी विष्णू शिरसाठ (४०) व शेती, रा. सरदवाडी, ता. सिन्नर, जि. नाशिक यांनी आडगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. दि.१८एप्रिल २०२५ रोजी सकाळी ९.१५ ते ९.४५ वाजेच्या दरम्यान छत्रपती संभाजीनगर रोडवरील नांदूरनाका ते कपालेश्वरनगरदरम्यान रिक्षात प्रवास करीत असताना रिक्षात बसलेल्या दोन महिला त्यातील उजव्या बाजूस बसलेली अंदाजे ३० वर्षीय सावळ्या रंगाची, जांभळ्या रंगाचा पंजाबी ड्रेस घातलेला आणि तिच्या उजव्या बाजूला बसलेल्या अंदाजे २० ते २५ सावळ्या रंगाची अंगात आकाशी रंगाची साडी घातलेल्या महिलेने फिर्यादी महिलेस त्यांच्या कडेला बसवून पुढे मागे सरकण्यास सांगत नकळत पर्समध्ये ठेवलेल्या ८४ हजार रुपये किमतीचे एक २८ ग्रॅम सोन्याचे लॉकेट (गोफ) , ३५ हजार रुपये किमतीचे एक १० ग्रॅम सोन्याचे डिझाइनचे कानातील झुमके, ३५ हजार २०० रुपये किमतीचे एक १० ग्रॅम सोन्याच्या वेढ्याच्या अंगठ्या, २४ हजार ५०० रुपये एक ७ ग्रॅम सोन्याची अंगठी आणि एक काळ्या रंगाचे चेन असलेले पाकीट असे एकूण १ लाख ७८ हजार ५०० मुद्देमाल लंपास केला आहे. याबाबत आडगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक सचिन खैरनार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार राजुळे करीत आहेत.






### अंबडमध्ये गॅस पाइपलाइनसाठी खोदकामानंतर चुकीचे बुजविले खड्डे; अपघाताची शक्यता

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

अंबड औद्योगिक वसाहतील इंडो लाइन फर्निचर कंपनीपासून अंबड गावाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर महाराष्ट्र नॅचरल गॅस कंपनीकडून गॅस पाइपलाइन टाकण्यासाठी खोदकाम करण्यात आले. मात्र, हे काम झाल्यानंतर खड्डे चुकीच्या पद्धतीने बुजवण्यात आल्यामुळे सध्या संपूर्ण रस्त्यावर मातीचे ढिगारे पसरले आहेत. या रस्त्याचा वापर करणाऱ्या नागरिकांना आता धोकादायक परिस्थितीचा सामना करावा लागत आहे. विशेषतः दुचाकीस्वारांची वाहने या सैल मातीमुळे घसरत असून, अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. स्थानिक नागरिकांनी सांगितले की, काम झाल्यानंतर खड्ड्यांवर रोलर फिरवून सपाटीकरण करणे गरजेचे होते, मात्र ते करण्यात आलेले नाही. परिणामी, रस्त्यावर माती पसरल्याने वाहतूक धोकादायक बनली आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित बांधकाम विभाग तसेच गॅस पाइपलाइनच्या ठेकेदारांनी त्वरित समन्वय साधून रस्त्यावरील खड्डे नीट बुजवावेत, सपाटीकरण करून रस्त्यावर साचलेली माती हटवावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.



### दरोड्याच्या तयारीत असलेले गुन्हेगार जेरबंद

उपनगर पोलिसांची कारवाई

**सिडको/नाशिकरोड : प्रतिनिधी**

उपनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील देवळालीगाव परिसरात दरोड्याच्या तयारीत असलेल्या रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर उपनगर पोलिसांनी शनिवारी रात्री मोठी कारवाई करत चौघांना अटक केली. घटनास्थळावरून गावठी कट्टा, धारदार शस्त्र, दोरी, मिरची पूड आणि दोन मोटारसायकली असा सुमारे २ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवार दि. २६ एप्रिल रोजी रात्री साडेबारा वाजता उपनिरीक्षक शांताराम महाजन व त्यांच्या पथकाने देवळाली गावाजवळ गस्त घालत असताना कुस्ती मैदानाजवळ अंधारात काही संशयित दबा धरून बसलेले दिसले. पोलिसांची चाहूल लागताच आरोपी सार्थक आहीरे, आबा पवार, हार्दिक बेलदार, पवन घोलप, समीर सोनवणे व इतर तिघेजण मोटारसायकलवरून पळू लागले. पळताना हार्दिकच्या हातात धारदार शस्त्र, सार्थककडे गावठी कट्टा आणि पवनकडे दोरी असल्याचे दिसले.

पोलिसांनी पाठलाग केल्यानंतर आरोपी गल्ली-बोळातून पसार झाले. पहाटे चारच्या सुमारास सार्थक आहिरेला बिटको हॉस्पिटलमध्ये गोळी लागून जखमी अवस्थेत आल्याचे समजले. चौकशीत त्याच्या पायाला गावठी कट्ट्याचा अपघाताने गोळी लागल्याचे निष्पन्न झाले. यानंतर पवन घोलप व समीर सोनवणे यांना अटक करण्यात आली. त्यांच्या चौकशीतून इतर आरोपींची माहिती मिळाली. या प्रकरणी गुन्हा क्रमांक १७०/२०२५ नोंदवून ऋषिकेश उर्फ आबा पवार, हार्दिक बेलदार, समीर सोनवणे आणि पवन घोलप यांना उपनगर पोलिसांनी अटक केली आहे. दरम्यान, या प्रकरणातील संशयित आरोपींकडून पोलिसांनी गावठी कट्टा, लोखंडी कोयता, दोरी, मिरची पूड, बजाज पल्सर व सुझुकी ॲक्सेस असा २ लाख पाच हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. ही कारवाई पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, उपआयुक्त डॉ. मोनिका राऊत व सहाय्यक आयुक्त डॉ. सचिन बारी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तपास पोउनि प्रभाकर सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली सुरू आहे.




### बंद घर फोडून २ लाख ८२ हजारांचे दागिने चोरीला

सदाशिवनगरमध्ये अज्ञात चोरट्यांचा धुमाकूळ

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

पाथर्डी फाटा परिसरातील सदाशिवनगर येथे एका बंद घराचे दरवाजाचे कडी-कोयंडे कापून अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश करत तब्बल २ लाख ८२ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना घडली आहे.

याबाबत इंदिरानगर पोलिस ठाण्यात फिर्यादी माधुरी भालचंद्र बेडसे (वय ३८, रा. सदाशिवनगर, पाथर्डी फाटा) यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे, त्यांच्या बंद घराचा गैरफायदा घेऊन अज्ञात चोरट्यांनी मुख्य दरवाजाचे कडी-कोयंडे कापून घरात प्रवेश केला व बेडरूममधील कपाट फोडून त्यातील ६५ ग्रॅम वजनाचे आणि अंदाजे १ लाख ९५ हजार रुपये किंमत असलेली सोन्याचे मंगळसूत्र ५ ग्रॅम वजनाची सुमारे १५ हजार रुपये किंमत असलेली ५ ग्रॅम सोन्याची अंगठी आणि ४ ग्रॅम सोन्याचे आणि सुमारे १२ हजार रुपये किंमत असलेली लटकनासह कर्णफुल असा एकूण २ लाख ८२ हजार रुपयांच्या सोन्याचे दागिने चोरीला गेले. या प्रकरणी इंदिरानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास इंदिरागर पोलिस ठाण्याच्या महिला वरिष्ठ पोलीस निरीक्षक तृप्ती सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक शिरसाठ हे करत आहेत.



# म्हसरूळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत चार ठिकाणी चेन स्नॅचिंगच्या घटना

**पंचवटी : वार्ताहर**

म्हसरूळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शंकर पार्क, बालकृष्णनगर, कंसारा माता चौक आणि शांतीनगर, नाशिक - मखमलाबाद रोड येथे दोन दिवसांत चार चेन स्नॅचिंगच्या घटना घडल्या असून, याबाबत म्हसरूळ पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल झाले आहेत.

**पहिली घटना :** वैशाली अशोक इंपाळ (४२) एच.पी. गॅस गोडवूनजवळ, मेहेरधाम, पेठरोड ही महिला दि.२५ रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास त्यांच्या घराजवळील किराणा दुकानात सामान आणण्यासाठी गेली असता व दुकानातून सामान घेऊन परत घरी येत असताना शंकरपार्क बिल्डिंगच्या कॉर्नरला, बाळकृष्णनगर, मखमलाबाद, येथे पाठीमागून एका काळ्या रंगाच्या मोटारसायकलवरून आलेल्या दोघांपैकी पाठीमागे बसलेल्या इसमाने फिर्यादीच्या गळ्यातील २० हजार रुपये किमतीची एक २.५ ग्रॅम वजनाची सोन्याची शॉर्ट पोत हिसकावून मोटारसायकलवर अश्वमेधनगरच्या दिशेने पळून गेले.

**दुसरी घटना :** श्रेयस रामानाथन अयर (२२) रा. श्रीजी बंगलो, कंन्सारा माता चौक, म्हसरूळ दि. २५ रोजी रात्री १ वाजेच्या सुमारास वाजेच्या म्हसरूळ मखमलाबाद लिंक रोडवरून कंन्सारा माता चौकाकडे पायी घरी जात असताना दिगंबर ट्रस्ट कपांउड केलेल्या रोडलगत एका मोपेड मोटारसायकलवरून आलेल्या दोघा जणांनी ४० हजार रुपये किमतीची एक अंदाजे १२ ग्रॅम वजन असलेली गोफ केलेली सोन्याची चेन हिसकावून पळून गेले.

**तिसरी घटना : (१० मिनिटांच्या अंतरावर दोनदा चेन स्नॅचिंग) :** माधुरी ज्ञानेश बेलेकर (५७)व्यवसाय-घरकाम, तांबे बोराडे मळा, लिलावती हॉस्पिटलजवळ, मखमलाबाद शिवार या दि. २६ सायंकाळी ७.४० वाजेच्या सुमारास त्यांच्या पतीसह स्वामी समर्थ केंद्र, शांतीनगर येथे दर्शन घेऊन पुन्हा घरी येत असता चंद्रकांत गॅस गोडावून रस्त्यावर पाठीमागून मोटारसायकलवरून आलेल्या दोघांपैकी पाठीमागे बसलेल्या एकाने ७० हजार रुपये किमतीची १० ग्रॅम वजनाची एक शॉर्ट पोत हिसकावून पळून नेली. तर तेथून पुन्हा सायंकाळी ७.५० वाजेच्या सुमारास शैलजा पंढरीनाथ पवार कंसरा चौक या घरातून कंसरा चौक येथे भाजीपाला घेण्यासाठी गेल्या असता भाजीपाला घेऊन घरी येत असताना साईकृपा हॉस्पिटलसमोर, त्यांच्या पाठीमागून मोटारसायकलवर आलेल्या दोघांपैकी पाठीमागे बसलेल्या एकाने त्यांच्या गळ्यातील ६० हजार रुपये किमतीची ९.६ ग्रॅम वजनाची सोन्याची शॉर्ट पोत हिसकावून मोटारसायकलवरून म्हसरूळ गावाच्या दिशेने पळून गेले. यात एकूण १ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल गेला आहे. चेन स्नॅचिंगच्या घटनांचा तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक अंकुश चिंतामण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक दीपक पटारे करीत आहेत.



**नाशिक-मखमलाबाद रोडवर चेन स्नॅचिंगच्या घटना नित्याच्याच**

गेल्या काही अनेक दिवसांत घरफोडी, चेन स्नॅचिंगच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यातच आता शाळांना सुट्ट्या देखील लागल्या असून, घरफोडीसारख्या घटना वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती होण्याची गरज आहे. तर चेन स्नॅचिंगच्या घटना कणसरा माता चौक आणि शांतीनगर या भागात मोठ्या प्रमाणावर वाढल्या असून, या ठिकाणी सायंकाळी पोलिस गस्त वाढविण्याची गरज असून, नागरिकांमध्ये चेन स्नॅचिंगच्या घटनांबाबत देखील जनजागृती करण्यासाठी पोलिस यंत्रणेने प्रयत्न करण्याची गरज आहे. गेल्या काही दिवसांतील घटना बघता मोटारसायकलवरून आलेल्या या एकसारख्याच दिसत असल्याचे चित्र बघायला मिळत असून, पोलिसांनी या दुचाकीस्वारांचा शोध घेणे गरजेचे आहे.

महत्त्वाचे



## फांगदर शाळेच्या ४५ मुलांनी अनुभवला क्रिकेट सामना

**देवळा :** देशाच्या सर्वांत श्रीमंत असणाऱ्या अंबानी कुटुंबाच्या पाहुणचाराचा आनंद जिल्हा परिषदेच्या देवळा तालुक्यातील फांगदर शाळेच्या ४५ विद्यार्थिनींनी लुटला. त्याचबरोबर आयपीएलच्या मुंबई इंडियन्स विरुद्ध लखनऊदरम्यान क्रिकेट सामना पाहत प्रत्यक्ष क्रिकेट सामना पाहण्याचा योग या विद्यार्थ्यांना मिळाला. नाशिक येथील दिव्य फाउंडेशनचे श्याम मानकर व रोशनी मानकर या दाम्पत्यांनी रिलायन्स समूहाशी संवाद साधत ग्रामीण भागातील मुलांना क्रिकेट सामना पाहण्यासाठी विनंती केली होती व शाळेच्या ४५ विद्यार्थिनींना अंबानी परिवाराचे निमंत्रणाची सुवर्णसंधी लाभली. खामखेडा येथील सरपंच वैभव पवार व पालकांच्या वतीने बसला. मुंबईच्या दिशेने रवाना करण्यासाठी हिरवा झेंडा दाखवला होता. क्रिकेट सामना पाहायला येण्या-जाण्यासाठी मोफत बस, क्रिकेट सामना पाहण्यासाठी सर्व मुलांना आकर्षक टी-शर्ट, मुंबई येथे झालेला मुंबई इंडियन्स विरुद्ध लखनऊदरम्यान क्रिकेट सामना फांगदर शाळेतील ४५ पेक्षा जास्त विद्यार्थिनींनी अनुभवला. नीता अंबानी यांनी रिलायन्स फाउंडेशनच्या माध्यमातून सामना पाहणाऱ्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला. नीता अंबानी यांनी सर्व विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधून मुलांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेतला. यावेळी शाळास्तरावरील नावीन्यपूर्ण उपक्रम शाळेचे शिक्षक संजय गुंजाळ व खंडू मोरे यांनी सांगितले. यापूर्वी फांगदर शाळा व खामखेडा गावाचा परिसर न सोडलेल्या ४५ मुलांनी क्रिकेटचा आनंद, सुप्रसिद्ध क्रिकेटवीर, व्यापक असलेले विश्व, अब्ज-धीश नीता अंबानी यांचे सान्निध्य आणि मार्गदर्शन यांचा अतीव आनंद घेतला. रिलायन्स फाउंडेशन आणि श्याम मानकर यांचे आम्ही आयुष्यभर ऋणी राहू, असे मुलांनी सांगितले. विद्यार्थिनी व पालकांनी रिलायन्स फाउंडेशन आणि श्याम मानकर यांचे आभार मानून आनंद व्यक्त केला.



## मोहाडी देवराईचा बीज संमेलनात सन्मान

**दिंडोरी :** सह्याद्री देवराई महाराष्ट्र व भारती विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने पहिले दोन दिवसीय बीज संमेलन-२०२५ भारती विद्यापीठाच्या पुणे येथील धनकवडी शैक्षणिक संकुलात अतिशय उत्साहात पार पडले. यावेळी देशी वाणांसाठी आपल्या आयुष्य वेचणाऱ्या बीजमाता पद्मश्री राहीबाई पोपेरे यांचा संमेलनाच्या समारोपात जीवनगौरव पुरस्कार व सन्मानपत्र ज्येष्ठ गायक श्री. आचार्य पंडित मुकुल शिवपुत्र यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. सदर बीज संमेलनामध्ये महाराष्ट्रातील सर्व देवराईंची सदस्य तसेच इतरही पर्यावरणावरती काम करणाऱ्या संस्था, व्यक्ती यांची उपस्थिती होती. विशेष बाब म्हणजे सह्याद्री देवराई गोपालकृष्ण मोहाडी नाशिक संस्थेच्या विशेष व नावीन्यपूर्ण संकल्पनांचा महाराष्ट्रातील इतर देवरायांनाही फायदा व्हावा म्हणून सखोल माहिती देवराई सदस्यांनी दिली. सदर बीज संमेलनामध्ये विविध झाडांच्या बियांचे प्रदर्शन मांडण्यात आले होते. त्यासोबत फलक व इत्यंभूत माहिती ठेवण्यात आलेली होती, तसेच झाडांच्या पानांचे प्रदर्शन विविध अति दुर्मिळ झाडांचे प्रदर्शन विविध झाडांविषयक पुस्तकांचे प्रदर्शन तसेच देशी कडधान्यांचे प्रदर्शन माहितीसह विविध स्टॉल लावण्यात आले होते. त्यामध्ये पाणवटे, चिमणी घर व पक्ष्यांच्या घरट्यांच्या माहितीचे स्टॉल लावण्यात आले होते. पर्यावरणतज्ज्ञ यांचे मार्गदर्शक चर्चासत्र ही संपन्न झाले. ज्यामध्ये विविध झाडांची माहिती, त्याचे फायदे व झाडांविषयी असलेल्या शंकांचे निरसन प्रश्नोत्तराच्या माध्यमातून सोडवण्यात आले. मोहाडी देवराईचा विशेष सन्मान प्रसिद्ध सिनेमा दिग्दर्शक नागराज मंजुळे, सयाजी शिंदे व अरविंद जगताप यांच्या हस्ते करण्यात आला. अतिशय भव्यदिव्य बीज संमेलनामध्ये विद्यार्थ्यांची झाडावरील गाणे, झाडांची प्रार्थना व झाडांचे नवीन गाणे प्रदर्शित करण्यात आले. सदर बीज संमेलनात भारती विद्यापीठाचे संचालक आमदार सत्यजित कदम तसेच प्रसिद्ध दिग्दर्शक गणेश आचार्य, पद्मश्री राहीबाई पोपेरे हे उपस्थित होते.

## कसबे-सुकेणेत संत तुकाराम महाराज कथा

**कसबे-सुकेणे :** भगवंताच्या कृपेने व साधुसंतांच्या आशीर्वादाने श्री गुरु चैतन्य महाराज देगलूरकर श्रीक्षेत्र पंढरपूर यांच्या कुशल मार्गदर्शनाने जगद्गुरू संत तुकाराम महाराजांची चरित्र कथा शुक्रवार दिनांक २ मे ते रविवार दिनांक ४ मेपर्यंत सायंकाळी साडेसहा ते नऊ वाजेपर्यंत कथा प्रवक्ते गुरुवर्य समाधान महाराज रिंगणगावकर(जळगाव) हे निरूपण करणार आहेत.

ही कथा निफाड तालुक्यातील कसबे-सुकेणे येथील सांडखोरे वस्ती, कोकणगाव-सुकेणे रोड, ओणे फाटा येथे आयोजित करण्यात आली आहे. कथेस ख्यातनाम गायक संतू महाराज लहाने, समाधान महाराज भगत हे गायनसाथ करणार आहेत तसेच गणेश महाराज भोर हे मृदंगसाथ करणार आहेत. भाविकांनी कथा श्रवण सुखाचा लाभ घेण्याचे आवाहन खंडेराव सांडखोरे, गौरव महाराज सांडखोरे, सांडखोरे परिवार, ग्रामस्थ व भजनी मंडळाने केले आहे.

## रत्नमाला आरोळे यांचे निधन

**नाशिक : प्रतिनिधी**



महानगरपालिकेच्या सेवानिवृत्त मुख्याध्यापिका श्रीमती रत्नमाला गोपाळराव आरोळे (नाशिक - ह. मु. पुणे) यांचे वयाच्या ८६ व्या वर्षी अल्प आजाराने निधन झाले. त्या एक व्यासंगी शिक्षिका होत्या व अनेक वर्षे त्यांनी नाशिक महानगरपालिका शाळांमधून अध्यापनाचे अविरत कार्य केले. त्यांना राज्य सरकारचे अनेकदा उत्कृष्ट शिक्षक पारितोषिक मिळाले होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली आणि जावई, नातवंडे, पणतू असा परिवार आहे.

निधन वार्ता

## रागिणी पिंगटे



**पिंपळगाव बसवंत :** येथील उद्योजक सुनील आकडे यांच्या भगिनी रागिणी सुरेश पिंगटे (६२) यांचे प्रदीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, तीन मुली, नातवंडे असा परिवार आहे. त्या येथील सुरेश पिंगटे यांच्या पत्नी तर सिद्धू सुरेश पिंगटे यांच्या मातोश्री होत.

# पाण्यासाठी बांबळेवाडीच्या नागरिकांची वणवण

## महिलांची प्रशासनाकडे तातडीने मदतीची मागणी

**इगतपुरी : प्रतिनिधी**

पावसाचे माहेरघर समजल्या जाणाऱ्या इगतपुरीत एप्रिल महिन्यातच भीषण पाणीटंचाईला आदिवासी नागरिकांना सामोरे जावे लागत आहेत. पावसाळ्यात सुमारे चार हजार मिमी पाऊस पडत असूनही पाण्याचे योग्य नियोजन नसल्यामुळे पाणीटंचाईच्या झळा आत्तापासुनच सुरू झाल्या आहेत.

इगतपुरी तालुक्यातील कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या मतदारसंघातील सर्वतीर्थ टाकेद येथील बांबळेवाडी शिवारात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली आहे. जलजीवन मिशनच्या योजनेंतर्गत उभारलेल्या टाक्यांत आणि नळांमधून पाणीपुरवठा पूर्णतः बंद असल्याने महिलांना आणि ग्रामस्थांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

टाकेद बुद्रुक येथील ग्रुप ग्रामपंचायतीच्या बांबळेवाडीतील ग्रामस्थांना स्वखर्चाने पाण्याचे टँकर मागवून तहान भागवावी लागत असून, एका दोनशे लिटरच्या प्लास्टिक ड्रमसाठी शंभर रुपये मोजावे लागत आहेत. बांबळेवाडीत जलजीवन मिशन अंतर्गत राष्ट्रीय पेयजल योजना कुचकामी ठरली आहे. या परिसरात



इगतपुरी : नळाला पाणी येत नसल्याने खासगी विहिरीतून पाणी भरताना बांबळेवाडी येथील महिला. (छाया : ओंकार गवांदे)

मार्च महिन्यापासूनच या ठिकाणी भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.

पाणी मिळवण्यासाठी महिलांना एक ते दीड किलोमीटर अंतर पायी चालते, एका शेतातील खासगी विहिरीतून पाणी भरावे लागत आहे. मात्र, ही विहीरही आटत चालल्यामुळे लवकरच गावकऱ्यांना पाच किमी अंतरावरील सर्वतीर्थ येथून पाणी आणावे लागणार आहे. खरं म्हटले तर इगतपुरी तालुक्यात मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो. जवळपास ४ हजार मीटर पावसाची नोंद दरवर्षी पावसाळ्यात होत असते. पावसाचे पाणी साठवण्यासाठी तालुक्यात लहान मोठी मिळून १६ धरणे बांधली

> गेल्या अनेक वर्षांपासून दरवर्षी मार्च महिन्यात पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. या काळात निवडणुका आल्या की, विविध पक्षाचे पुढारी येऊन पाण्याचे खासगी टँकरने पाणीपुरवठा करतात. निवडणुका जिंकून झाल्यावर मात्र इकडे कोणीही फिरकत नाही. पाण्याचे टँकर सुरू करण्यात यावे, अशी मागणी वेळोवेळी करूनही शासकीय अधिकारीसुद्धा दुर्लक्ष करीत असल्याने महिलांनी कोणाकडे दाद मागावी.
>
> – **राम शिंदे,** सामाजिक कार्यकर्ते

आहेत. तरी देखील पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तालुक्यातील छोटी खेडी व वाड्यापाड्यांवर होऊ शकलेली नाही. त्यामुळे इगतपुरीतील हे भीषण वास्तव कधी मिटणार, असा सवालही उपस्थित केला जात आहे.

प्रशासन आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दुर्लक्ष झाल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली असून, तत्काळ टँकरने किंवा अन्य माध्यमातून नियमित पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी महिलांनी जोरदारपणे केली आहे. या गावातील परिस्थितीवर प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन तत्काळ उपाययोजना करावी, अशी मागणी आता तीव्र होत आहे.



## सैन्यदलात निवड झाल्याने सिद्धार्थ सानपचा सत्कार

**कसबे-सुकेणे : वार्ताहर**

निफाड तालुक्यातील शिवरे येथील सिद्धार्थ बाळासाहेब सानप या युवकाची भारतीय सैन्यदलात निवड झाल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने नागरी सत्कार करण्यात आला.

प्रतिकूल परिस्थितीवर मात करत यशाला गवसणी घालणाऱ्या सिद्धार्थ सानपने भारतीय सैन्यदलात जीडी या विभागात बेळगाव कर्नाटक येथे मराठा बटालियनमध्ये दाखल होऊन आपल्या कार्याची चुणूक दाखवल्याने त्याची गावातून सवाद्य मिरवणूक काढून सत्कार करण्यात आला.

यावेळी निसाकाचे माजी संचालक बाळासाहेब पुंड, व्ही. एन. नाईक शिक्षण संस्थेचे विश्वस्त बबनराव सानप, ज्येष्ठ पत्रकार संतोष गिरी, निफाड तालुका वारकरी महामंडळाचे प्रसिद्धीप्रमुख लक्ष्मण महाराज पडोळ, येवला येथील सक्सेस अकॅडमीचे मार्गदर्शक शिक्षक पंकज वाडेकर, समाधान जमदडे आदींची गुणगौरव करणारी भाषणे झाली.

सिद्धार्थ सानप या जवानाने सत्कारास उत्तर देताना सर्वांचे ऋण व्यक्त करून आभार मानले. याप्रसंगी शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस वाहतूकचे शहराध्यक्ष मनोहर कातकाडे, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे वरिष्ठ सहाय्यक रवींद्र सोनवणे हिंगणवेढे, सरपंच भास्कर कराड, संतोष गिरी, लक्ष्मण पडोळ, सक्सेस अकॅडमीचे मार्गदर्शक शिक्षक पंकज वाडेकर, समाधान जमदाडे, वाळू निश्चित, सचिन दप्तरे, राजेंद्र सानप उपस्थित होते.

## खामखेड्यातील शेतकऱ्याचा चारचाकी वाहनाच्या धडकेत मृत्यू

### कांदे काढणीसाठी मजुरांच्या होते शोधात

**देवळा : प्रतिनिधी**



कांदे अजून शेतातच आहेत, वेळेवर निघाले नाहीत तर सर्व मेहनत वाया जाईल! ही चिंता मनात घेऊन तालुक्यातील खामखेडा येथील कांदा उत्पादक शेतकरी भाऊसाहेब लक्ष्मण शेवाळे (५५) हे आठवड्यापासून मजुरांच्या शोधात होते. मात्र, गुरुवार, दि. २४ रोजी सायंकाळी खामखेडा येथील आठवडे बाजार चौकात मजुरांची चौकशी करत असताना समोरून आलेल्या चारचाकी वाहनाने दिलेल्या धडकेत त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

शेवाळे यांनी कष्टानं उभी केलेली कांद्याची पिकं आता काढणीसाठी तयार आहेत. मात्र, गेल्या अनेक दिवसांपासून मजूर मिळत नसल्याने कांदा शेतातच अडकून पडला आहे. कडाक्याच्या उन्हामुळे कांद्याची पात जळू लागली होती आणि वेळेवर कांदे निघाले नाहीत तर सडू शकतात, या भीतीने ते अधिकच चिंतेत होते.

कांदे निघाले, विक्रीला गेले, तर दोन पैसे हातात पडतील, या आशेने ते सायंकाळी खामखेडा चौफुलीवरून गावातील शेतकऱ्यांशी चर्चा करून मजुरांचा तपास करत होते. तिथेही निराशा झाली आणि ते गावात आठवडे बाजार होता त्या ठिकाणी गेले. तिथेही मजुरांची विचारपूस करत होते आणि तेथे चौकात उभे असतानाच, फुटाणे विक्री करून परतणाऱ्या इको गाडी क्रमांक एमएच ०४ एचएम ६५५३ गाडीवडील चालकाचे नियंत्रण सुटल्याने गाडी थेट उभे असलेल्या शेवाळे यांच्यावर आदळली. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना रुग्णालयात नेले गेले, मात्र वाटेतच त्यांची प्राणज्योत मालवली आणि क्षणार्धात होत्याचं नव्हतं झालं,

भाऊसाहेब शेवाळे हे संयमी, शांत, मनमिळाऊ स्वभावाचे होते. देवळा ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करून शुक्रवारी दि.२५ रोजी सकाळी १० वाजता शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. याबाबत देवळा पोलीस ठाण्यात अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक सार्थक नेहते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विनय देवरे, दिलीप सोनवणे, सुरेश कोरडे करीत आहेत.







## ओझरला नवीन स्थानकात एसटी बस येत नाहीत

**ओझर : वार्ताहर**

शाळा, कॉलेजच्या परीक्षा जवळपास संपत आल्या असून, विद्यार्थ्यांना शाळा, कॉलेजला २६ तारखेपासून सुट्ट्या लागतील आणि बाहेरगावी जाणाऱ्या प्रवाशांच्या संख्येत मोठी वाढ होणार आहे; पण त्याआधीच सीबीएस नाशिक येथून सुटणाऱ्या एसटी बसेसला ओझर येथे अधिकृत थांबा आहे. बस नवीनस्थानकाकडे जाण्यासाठी महामार्गाला दोन्ही लेनवर कट दिलेला आहे तरीसुद्धा बसेस नवीन व जुन्या बसस्थानकात येत नाही. त्यामुळे प्रवाशांचे हाल होतात. म्हणून सर्व बसेस स्थानकात आणाव्यात, अशी मागणी प्रवाशांसह नागरिकांनी केली आहे.

> ओझर बसस्थानक बसेसबाबत असलेल्या तक्रारीकडे व्यक्तिशः लक्ष देऊन पिंपळगाव आगाराच्या बसेस स्थानकावर येतील या संबंधित दक्षता घेण्यात येईल. इतर आगाराच्या बसेस ओझर नवीन बस स्थानकात येतील. तसेच लांब पल्ल्याच्या अथवा जवळच्या बसेससाठी ओझर येथे महामार्गाच्या कट जवळ थांबणाऱ्या प्रवाशांना बसमध्ये बसवून देण्यासाठी नवीन बसस्थानकातील कंट्रोलर महामार्गावर दिवसभर उपस्थित असतात.
>
> - **मनोज गोसावी** आगारप्रमुख, पिंपळगाव बसवंत

पिंपळगाव बाजूकडे जाणाऱ्या बसेस बसस्थानकात तर येत नाहीतच, पण ओझरमध्येही थांबत नाहीत. उड्डाणपुलावरून बस स्थानकाला व प्रवाशांना टाटा करत सरळ निघून जातात. त्यामुळे लांबपल्ल्यासह इतर गावांकडे जाणाऱ्या प्रवाशांचे अतोनात हाल होतात. नवीन बसस्थानकात बसेस येत नसल्याने नेहमीच शुकशुकाट असल्याचे दिसून येते. त्यामुळे ओझरचे नवीन बसस्थानक म्हणजे शोभेची वास्तू बनली आहे तसेच पिंपळगाव बाजूकडून येणाऱ्या साध्या बसेससह लांब पल्ल्याच्या बसेस जुन्या बस स्थानकात येत नाहीत.

# नगरसूल-कोळगाव शिवरस्ता झाला खुला

**येवला : प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक यांच्या आदेशाने गाव नकाशाप्रमाणे येवला तालुक्यातील मौजे नगरसूल-कोळगाव येथील शिवरस्ता मोकळा झाला आहे.

अतिक्रमित रस्ते, शेतरस्ते, शिवरस्ते, शेतावर जाण्याचा मार्ग मोकळा करण्यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार कार्यवाही सुरू असून, येवल्यातील नगरसूल व कोळगाव येथील सुमारे २५ वर्षांपासून बंद असलेला शिवरस्ता काल खुला करण्यात आला. त्यामुळे संबंधित शेतकरी यांच्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. जिल्हाधिकारी यांचेकडील परिपत्रकान्वये तहसीलदार आबा महाजन यांच्या मार्गदर्शनाने बुधवार दि. २२ एप्रिल २०२५ रोजी सदर रस्त्याचे शेतकरी यांनी आपसात असलेले वाद विसरून लोकवर्गणीतून रस्ता तयार केला आहे तसेच भविष्यात या रस्त्याबाबत कुठलाही वाद उपस्थित करणार नाही व अडवणूक करणार नाही याबाबत पंचनामा नोंदवला आहे.



> शेतरस्त्याचे वाद मिटवण्यासाठी संबंधित गावांचे तलाठी, मंडल अधिकारी यांना बैठक घेऊन सविस्तर सूचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने बऱ्याच वर्षांपासून वादात अडकलेल्या या रस्त्याने मोकळा श्वास घेतला आहे. यामुळे भविष्यात निर्माण होणारे न्यायालीयन वाददेखील संपुष्टात येतील.
>
> - **आबा महाजन,** तहसीलदार, येवला

याप्रसंगी नगरसूल येथील मंडळ अधिकारी गणेश लाडेकर, ग्राम महसूल अधिकारी कोळगाव संकेत मरवट, कोळगाव गावचे पोलीसपाटील शरद धनवटे, सुदाम गाडेकर, किरण कमोदकर, सोपान कमोदकर आदी उपस्थित होते.





## पहलगाम आतंकी हल्ल्याच्या निषेधार्थ विंचूरला बंद

**विंचूर : प्रतिनिधी**

२२ एप्रिल रोजी काश्मीरमधील पहलगाम येथे पाकिस्तानी अतिरेक्यांनी केलेल्या क्रूर हल्ल्यात २६ निरापराध भारतीयांची हत्या केली.या निंदनीय घटनेच्या निषेधार्थ विंचूरकर ग्रामस्थांनी कडकडीत बंद पाळून निषेध नोंदवला. अत्यावश्यक सेवा वगळता गावातील सर्व व्यावसायिकांनी स्वयंस्फूर्तीने बंदमध्ये सहभाग घेतला होता.

सकाळी विंचूर, हनुमाननगर, विष्णूनगर, सुभाषनगर, कृष्णवाडी, विठ्ठलवाडी येथील सकल हिंदू समाज व सर्व पक्षांच्या वतीने येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भवानी पेठ ते पोलीस चौकीपर्यंत निषेध मोर्चा काढण्यात आला. यावेळी निरापराध भारतीयांचा बळी घेणाऱ्या पाकिस्तानी अतिरेक्यांना कठोर शासन व्हावे, अशा आशयाचे निवेदन लासलगाव पोलीस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक भास्कर शिंदे यांना देण्यात आले.

यावेळी ओम शेवाळे, समाधान कापसे, सोमनाथ गायके, कैलास सोनवणे, हर्षल काळे, नीलेश सालकाडे आदींनी आपल्या मनोगतातून सदर घटनेचा निषेध व्यक्त केला व हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या भारतीयांना श्रद्धांजली अर्पण केली. तसेच भारत सरकार व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निर्णयाला पूर्ण पाठिंबा असल्याचे सांगितले.

यावेळी विंचूर ग्रामपालिकेचे सरपंच सचिन दरेकर, कैलास सोनवणे, नीलेश सालकाडे, राजेंद्र पारिख, ज्ञानेश्वर शिरसाट, हर्षल काळे, राजेंद्र मोरे, योगेश खुळे, सुनील नेवगे, सोहेल मोमीन, इरफान मणियार, मोहसीन शेख, गोरख गांगुर्डे, ललित सोनी, तुषार दरेकर, ओम शेवाळे, विक्रम पवार, सोपान नेवगे, संजय धनवटे, बाबाजी पाटील, रमेश गुंजाळ, दिलीप सोनवणे, प्रशांत सरोदे, राजेश भडांगे, प्रज्वल गायकवाड, विलास दरेकर, नीलेश बोथरा, दीपक राऊत, ज्ञानेश्वर खांदोडे, किरण शिरसाट, किरण नेवगे, सचिन जेऊघाले, यश चौधरी, विकी काळे, आकाश जाधव, मनोज शिरसाट, धनंजय गांगुर्डे, अभिजित जाधव, महेश शिंदे, हरिओम परदेशी, सुनील घोडके, दिलीप बोथरा, पारस शिरसाट, सत्यम काळे, लड्डूराजे शिरसाट, यश पारिख, नारायण देसले, शैलेश गायकवाड, रोहित भट्टड, दीपक पुंड, अक्षय सोनी, अजय मानकर, अक्षय जंगम, केतन नाबरा आदी उपस्थित होते. तर बंद शांततेत पार पडला.

# मनमाड उपजिल्हा रुग्णालयाच्या डॉक्टरांची अरेरावी

## मयत व्यक्तीचे शवविच्छेदन करण्यासाठी टाळाटाळ





**मनमाड : प्रतिनिधी**

रुग्णसेवा हीच खरी सेवा हे ब्रीदवाक्य घेऊन काम करणारे डॉक्टरच जिवंत माणसाला तर सोडा, मयत व्यक्तीलादेखील न्याय देण्यासाठी टाळाटाळ करत असतील तर यांना डॉक्टर म्हणायचे की हैवाण, असा प्रश्न मनमाडच्या सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे.

अशीच एक घटना मनमाड उपजिल्हा रुग्णालयात घडली असून, निंबाळा (ता. चांदवड) येथे सकाळी १० वाजेच्या सुमारास अपघात झाला. या अपघातात धनराज पंडित उबाळे (६५) यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांचे शव उपजिल्हा रुग्णालयात आणण्यात आले, मात्र या ठिकाणी ड्यूटीवर असलेल्या सिस्टर व डॉ. तुसे यांनी तपासणी केली व तब्बल ३ तासांपेक्षा जास्त वेळ रुग्णाला हात लावला नाही. मयत रुग्णाच्या नातेवाइकांनी याबाबत तक्रार केली असता डॉ. तुसे यांनी रुग्णाच्या नातेवाइकांवर दादागिरी केली.

तुम्ही तक्रार कशी केली मी ठरवेल. मला केव्हा काय करायचं मला माहिती आहे. मी जेवण करतो मग येऊन शवविच्छेदन करून देईल, अशी भाषा केली. याबाबत काही सामाजिक कार्यकर्त्यांनी विचारणा केली असता डॉ. तुसे यांनी त्यांनाही दमबाजी केली. तुझा काय अधिकार आहे, तू कसा काय आला, मी तुला बघून घेईल. मोठी यंत्रणा कामाला लावून तुला दाखवतो, अशी दमबाजी केली. अशा कामचुकार डॉक्टरांना ड्यूटीवर ठेवू नये. या प्रकरणाची सखोल चौकशी करून आम्हाला न्याय द्यावा, अशी मागणी मृताच्या नातेवाइकांनी केली आहे.

### डॉ. तुसे यांनी आम्हाला दमबाजी केली!

माझ्या मामाला आम्ही अपघातानंतर मनमाड उपजिल्हा रुग्णालयात घेऊन आलो. या ठिकाणी असलेल्या सिस्टरने तपासणी केली व डॉक्टरांना याबाबत कळवले. डॉ. तुसे हे ड्यूटीवर असताना त्यांनी तपासणी केली व आम्हाला बाहेर काढून दिले व जेवायला निघून गेले. तब्बल तीन तास आम्ही मृतदेह घेऊन ताटकळत उभे होतो. यानंतर येथील सामाजिक कार्यकर्ते यांना बोलावले. त्यांनी जिल्हा शल्यचिकित्सक यांना कॉल केला तर तुसे हे रागात आले व आम्हाला म्हणे तक्रार कोणी केली, अशी विचारणा करत आम्हाला दमबाजी केली व माझं कोणी काही करू शकत नाही अशी अरेरावी केली. जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या फोननंतर त्यांनी तब्बल ४ तासांनी शवविच्छेदन करून दिले. याबाबत आम्ही तक्रार केली आहे.

– **किशोर संसारे**

## महत्त्वाचे

### वृक्षसंवर्धनासाठी मडके दान करा
### ढग्या डोंगर संवर्धन समितीचे आवाहन

**सिन्नर :** येथील ढग्या डोंगर परिसरात संवर्धन समितीच्या वतीने लावण्यात आलेल्या शेकडो वृक्षांना पाण्याचा संचय करण्यासाठी लग्न, समारंभ, अक्षय तृतीया यावेळी वापरण्यात येणारे छोटे मडके दान करण्याचे आवाहन स्वयंसेवकांनी केले आहे. गेल्या चार वर्षांपासून संवर्धन समितीने ढग्या डोंगरावर शेकडो वृक्षांची लागवड करण्याबरोबरच डोंगरावरील खंडोबा मंदिराचे सुशोभीकरण, डोंगरावर जाण्यासाठी रस्ता व डोंगरावरील पुरातन कुंडाना पुर्नजिवीत केले आहे. समितीच्या वतीने डोंगरावर लावण्यात आलेल्या वृक्षांना पाणी देण्यासाठी छोट्या मडक्यांची आवश्यकता आहे. अक्षय तृतीया या सणाला आपण लहान गाडगे म्हणजेच केळीचे मडके घरी आणतो. मात्र, सण झाल्यानंतर हे मडके नदीत सोडले जातात. तर कोणी घराच्या आड बाजूला ठेवतात. मात्र, असे न करता ते ढग्या डोंगरावरील झाडांच्या संवर्धनासाठी दान करण्याचे आवाहन पदाधिकाऱ्यांनी केले आहे. त्यासाठी शहरातील छ.शिवाजी महाराज चौक येथील सागर देशमुख, तानाजी चौक तुषार रायजादे, शिवाजीनगर येथील नंदकुमार निकम, विजयनगर परिसरातील जुगल लोया, एनडीसीसी बँक कॉलनी, विजय नगर सुरेंद्र क्षत्रिय, गजानन महाराज चौक, कानडी मळा कपिल कोठुरकर, वारकरी भवन संतोष शिंदे, घोरपडे मळा विशाल खालकर, पंचायत समिती अमोल चव्हाण, संगमनेर नाका परिसर नितीन क्षत्रिय, छत्रपती कॉलनी विजय नगर संजय पाटील, ज्वाला माता लॉन्स परिसर शेखर अण्णा गोळेसर, जुने कोर्ट लेन, गणेशपेठ शाम दंताळ, लालचौक, नशिकवेस, गंगावेस परिसर विवेक चव्हाण, खर्जे मळ्यात दत्ता जोशी यांच्याकडे हे मडके जमा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### चास येथे ८ मेपासून बालसंस्कार शिबिर

**सिन्नर :** तालुक्यातील भोजपुर खोऱ्यातील चास येथे युवा किर्तनकार हर्षद महाराज खैरनार आणि सद्गुरू जोग महाराज वारकरी शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी यांच्यामार्फत ८ मे २०२५ ते २० मे २०२५ या कालावधीत बालसंस्कार शिबिर आयोजित करण्यात येत असल्याची माहिती हर्षद महाराज खैरनार यांनी दिली. सध्याची परिस्थिती बघता तरुण पिढी व्यसनाच्या आधीन जात आहेत आणि संस्कारहीन मुले समाजात वावरताना दिसत आहे. या गोष्टीला आळा बसावा आणि उन्हाळ्याच्या सुट्टीचा त्यांना सद्उपयोग व्हावा, उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये मुलांमध्ये वैचारिक, संस्कारिक विचारधारा ऋजू व्हावी, त्यांना समाज, देश, आई-वडील, संत, ग्रंथ, भगवंत कळावे यासाठी या आध्यात्मिक बालसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात मुलांना अध्यात्मिक आणि शैक्षणिक कालागुणांना वाव देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. याकरिता त्यांना टाळ, मृदंग, हार्मोनियम, गीतेतील निवडक श्लोक, सुभाषित, वकृत्व कला, निबंध लेखन, संत चरित्र, महापुरुषांचे चरित्र शिकवले जाणार आहे. ह. भ. प. सचिन महाराज औताडे, रोहित महाराज राक्षे, ज्ञानेश्वर महाराज अंडील, सर्वेश महाराज बाळसराफ, राजेंद्र महाराज ढोन्नर, सागर महाराज काळे, मयूर महाराज उगले उपस्थित राहणार आहेत. मुलांना राहण्याची, जेवणाची सोय पण करण्यात आलेली आहे. तसेच त्रिदिनी कीर्तन महोत्सव आयोजित केला आहे तरी परीसरातील सर्व मुलांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### सिन्नर महाविद्यालयाचा विद्यार्थी धावणार




**सिन्नर :** येथील सिन्नर महाविद्यालयातील विद्यार्थी अभिजित भालेराव हा काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत साडेतीन हजार किमी अंतर धावणार असून, त्या माध्यमातून विश्वविक्रम करणार आहे. महाविद्यालयाच्या वतीने त्याचा सत्कार करण्यात आला. अभिजित भालेराव हा काश्मीर ते कन्याकुमारी हे साडेतीन हजार किमीचे अंतर ३० दिवसांत पूर्ण करणार आहे. याप्रसंगी प्राचार्य डॉ. एन. यू. पाटील, उपप्राचार्य प्रा. आर. व्ही. पावर, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. एस. पी. शेलार, कार्यालय अधीक्षक गोसावी, कनिष्ठ महाविद्यालय विभागप्रमुख प्रा.आर.टी. सोनवणे, व्होकेशनल विभागप्रमुख गिरीश गुजराथी, कनिष्ठ महाविद्यालय क्रीडा विभागप्रमुख प्रा. पी. एम. खैरनार आदींसह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### सोनांबे विद्यालयाचे विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र



**सिन्नर :** तालुक्यातील सोनांबे येथील जनता विद्यालयातील पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्तीसाठी पाच तर पूर्व माध्यमिक शिष्यवृत्तीसाठी एक असे ६ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. विद्यालयातील इयत्ता पाचवीत शिकणारी स्नेहा दिनकर जोंधळे (१९२), प्रणव संजय सहाणे (१८८), श्रेयस नितीन गुरव (१८०), मानसी बाळासाहेब सांगळे (१६२), साहिल सुभाष शिंदे (१५०) पूर्व प्राथमिक शिष्यवृत्तीसाठी पात्र झाले आहेत. या विद्यार्थ्यांना श्रीमती योगिता शिंदे, भाऊसाहेब दहिफळे, रोहिणी पवार, शांताराम चांदोरे, सोपान पवार यांचे मार्गदर्शन लाभले. पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत प्रणिता विकास पवार १६२ गुण मिळवून पात्र ठरली आहे. तिला शबानाबी कादरी, दिपाली घोटेकर, वर्षा मोरे, पंडित चीने, सोपान पवार, किरण पवार यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रभाकर फटांगळे यांच्या अध्यक्षतेखाली पात्र विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी नारायण शिंदे, संजय शहाणे, सुभाष शिंदे, विकास पवार, दिनकर जोंधळे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे संस्थेचे सरचिटणीस ॲड नितीन ठाकरे, संचालक कृष्णाजी भगत, शालेय समिती अध्यक्ष नंदू पाटील पवार यांनी अभिनंदन केले आहे.

### मंगल कलश यात्रा बुधवारी कोपरगावात

**वावी :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने राज्यात महाराष्ट्र गौरव मंगल कलश रथ यात्रेचे आयोजन करण्यात आले असून, ही मंगल कलश रथ यात्रा बुधवार दि.३० एप्रिल रोजी कोपरगाव तालुक्यातून शिर्डीत दाखल होणार आहे. या मंगल कलश रथयात्रेचे शिर्डी येथील शासकीय विश्रामगृह येथे सकाळी १० वाजता आ. आशुतोष काळे स्वागत करणार असल्याची माहिती कोपरगाव तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष चारुदत्त सिनगर यांनी दिली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने ६५ व्या महाराष्ट्र दिनानिमित्त गौरवशाली महाराष्ट्र महोत्सवाचे मुंबई येथे आयोजन करण्यात आले आहे. आपल्या महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाचा, सामाजिक समरसतेचा आणि एकात्मतेचा संदेश देणारी ही मंगल कलश रथ यात्रा राज्यभर उत्साहात सुरू आहे. या मंगल कलशमध्ये गडकिल्ले, ऐतिहासिक वास्तूंची माती, नद्यांचे पाणी एकत्रित करण्यात येणार असून, कोपरगाव मतदार संघातून वाहणाऱ्या गोदावरी नदीचे पवित्र जल व विविध धार्मिक तीर्थक्षेत्राच्या पावन भूमीतील माती सजविलेल्या मंगल कलशातून मुंबई येथे नेण्यात येणार आहे. भक्तीच्या संगमातून संस्कृतीचा सन्मान करण्यासाठी राष्ट्रवादीतर्फे या रथयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

# वृक्षमित्र परिवाराचा उपक्रम आदर्शवत : हभप करंजकर

## मनेगावला वृक्ष सखा-वृक्षसखी पुरस्काराने महिला व विविध संस्थांचा सन्मान

**सिन्नर : प्रतिनिधी**

**वृक्षमित्र परिवाराने वृक्ष संवर्धनासाठी ग्रामस्थांना प्रोत्साहनपर योजना आखत ती प्रत्यक्षात उतरवली आणि उत्कृष्ट वृक्ष लागवड करणाऱ्या महिला व तालुक्यातील संस्थांचाही सन्मान सोहळा आयोजित केला. कृतीतून साध्य केलेला हा उपक्रम कौतुकास्पद असून, प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन ह.भ.प. गणेश महाराज करंजकर यांनी केले.**



**पुरस्काराचे मानकरी**

वृक्ष सखी पुरस्कार– सोनाली संपत सोनवणे, अर्चना प्रवीण सोनवणे, मंदाबाई मधुकर घोडेकर, माधुरी ज्ञानेश्वर सोनवणे, मनीषा अजय सोनवणे, वृक्षसखा पुरस्कार– वनप्रस्थ फाउंडेशन सिन्नर, ढग्या डोंगर वनसंवर्धन समिती, सिन्नर, राम कृष्ण हरी संस्था, पाटोळे, आई भवानी वृक्षमित्र मित्र संस्था, सोनांबे, तरुप्रित प्रकल्प, सिन्नर, ग्रीन आर्मी, दापूर, वृक्षमित्र फाउंडेशन सिन्नर.

प्लास्टिकमुक्त भारत व पर्यावरण रक्षणासाठी उद्योजक बाजीराव दराडे आणि रोटरी क्लब ऑफ सिन्नर सिटी यांच्या वतीने पर्यावरणपूरक पिशव्या वृक्ष मित्र परिवाराकडे सुपूर्द करण्यात आल्या. उत्कृष्टपणे वृक्ष संवर्धन करणाऱ्या १५ महिलांसाठी उत्तेजनार्थ स्टेनलेस स्टील बॉटल व प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. उपस्थित महिलांपैकी पाच महिला नशीब अपना अपना लकी ड्रॉद्वारे पैठणीच्या विजेत्या ठरल्या.

तालुक्यातील मनेगाव येथे वृक्ष मित्र परिवाराने आयोजित केलेल्या वृक्ष मित्रांचा व दूध उत्पादकांचा मेळावा आणि पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी आयोजित कीर्तनातून मार्गदर्शन करताना ते बोलत होते. व्यासपीठावर जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या सीमंतिनी कोकाटे, सरपंच सुनीता सोनवणे, उपसरपंच शोभा भालेराव, पोलीस पाटील रवींद्र सोनवणे, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष सी. डी. भोजने, वृक्ष मित्र परिवाराचे अध्यक्ष रत्नाकर सोनवणे आदी उपस्थित होते. करंजकर महाराजांनी कीर्तनरूपी सेवा करताना मानवी जीवनात असलेले वृक्षांचे महत्त्व विशद करत अध्यात्म आणि विज्ञान याची उत्तम सांगड घालून उपस्थित श्रोत्यांना मार्गदर्शन केले. माजी जि.प. सदस्या सीमंतिनी कोकाटे यांनी वृक्षमित्र संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. तसेच दूध उत्पादक महिलांना मार्गदर्शन केले. खा. राजाभाऊ वाजेंच्या प्रमुख उपस्थितीत सकाळी वृक्षदिंडी व वृक्षरोपणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. तसेच डॉ. ढमाले, डॉ. अमोल आडभाई, डॉ. येवलेकर यांच्याकडून दूध उत्पादनाविषयी मार्गदर्शन घेतले. तर सायंकाळी सीमंतिनी कोकाटे व गणेश महाराज करंजकर यांच्या हस्ते उत्कृष्ट दूध उत्पादकांचा सन्मानचिन्ह व वृक्ष भेट देत सन्मान करण्यात आला. तसेच उत्कृष्टपणे वृक्ष संवर्धन करणाऱ्या महिलांचा पैठणी व सन्म चिन्ह देत सन्मान करण्यात आला. याप्रसंगी बचत गटाच्या महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंकुश सहाने, आभार दत्तात्रय गायकवाड यांनी मानले.

# भैया कांदळकर हत्येप्रकरणी चौघांना अटक

## तीन दिवसांची पोलीस कोठडी

**सिन्नर : प्रतिनिधी**

शहा येथील तडीपार गुंड भैया उर्फ प्रवीण कांदळकर यांच्या हत्ये प्रकरणी वावी पोलिसांत १४ जणांवर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पैकी पोलिसांनी अटक केलेल्या चौघा आरोपींना न्यायालयात हजर केले असता त्यांना २९ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली.

भैया कांदळकर याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी नाशिक येथे पाठवण्यात आला होता. शनिवारी उशीर झाल्याने शवविच्छेदन झाले नाही. रविवारी (दि.२७) नाशिक जिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन केल्यानंतर त्याचा मृतदेह नातलगांच्या ताब्यात देण्यात आला. त्यानंतर पोलीस बंदोबस्तात दुपारी शहा येथे त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. सिन्नरचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड, वावीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश शिंदे, सायखेडा पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक यांच्या नेतृत्वाखाली शहा गावात चोख बंदोबस्त लावण्यात आला होता.

दरम्यान, गुन्हा दाखल झालेल्या १४ आरोपींपैकी ४ जणांना पोलिसांनी अटक केली आहे. दिनेश मोतीराम उर्फ वाळीबा गोराणे (२१), राहुल गोरख बागल (२९), अतुल अशोक गोराणे (३५), अमित उर्फ आबा अण्णासाहेब उर्फ गोटीराम गोराणे (२९) अशी अटक करण्यात आलेल्या संशयितांची नावे आहेत. या चौघांना वावी पोलिसांनी शनिवारी संध्याकाळी ताब्यात घेऊन अटक केली होती. या चौघांनाही रविवारी (दि. २७) न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यांना २९ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. या घटनेतील उर्वरित १० आरोपींचा पोलिसांकडून शोध सुरू आहे. याबाबत अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश शिंदे, हेडकॉन्स्टेबल शहाजी शिंदे करीत आहेत.

# सोनारी दुर्घटनेतील सासू, जावयाच्या मृत्यूनंतर मुलीचाही मृत्यू

**सिन्नर : प्रतिनिधी**

स्वत:ला ज्वलनशील पदार्थाने पेटवून घेत पत्नी आणि सासूला मिठी मारून त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न तालुक्यातील सोनारी येथे जावयाने केला होता. या घटनेत पहिल्याच दिवशी जावयाचा मृत्यू झाला होता, त्यानंतर आठवडाभरात सासूचाही मृत्यू झाला होता. त्यानंतर भाजल्याने नाशिक येथे उपचार सुरू असलेल्या पत्नीचाही दोन दिवसांपूर्वी मृत्यू झाला आहे. स्नेहल केदारनाथ हांडोरे (१९, रा. शिंदेवाडी) असे मयत महिलेचे नाव आहे.

सोनारी येथील जळीत प्रकरणी तिघांचाही दुर्दैवी अंत झाल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे. केदारनाथ दशरथ हांडोरे (२४) रा. शिंदेवाडी, ता. सिन्नर याने पत्नी स्नेहल (१९) माहेरी राहण्यासाठी आल्यानंतर सोनारी येथे जाऊन वाद घातला. चाकूचा धाक दाखवून मित्रांच्या मदतीने पळवून नेण्याचा प्रयत्नही केला होता.

यात त्याने स्वत:ला पेटवून घेतले. पेटलेल्या अवस्थेत केदारनाथ याने पत्नी स्नेहल व सासू अनिता सोमनाथ शिंदे (३८) यांना मिठी मारली होती. घटनेनंतर केदारनाथचा मृत्यू झाला.



**मयत स्नेहल हांडोरे आणि केदारनाथ हांडोरे.**

त्यानंतर सासू अनिता शिंदे यांचाही उपचार सुरू असतानाच मृत्यू झाला. पत्नी स्नेहल हिचाही उपचारादरम्यान मृत्यू झाला असून, सोनारी येथे शोकाकुल वातावरणात तिच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. उपनिरीक्षक संजय वाघमारे अधिक तपास करीत आहेत.



# कुशावर्त तीर्थ घेऊन राष्ट्रवादीची मंगल कलश यात्रा निघाली

**त्र्यंबकेश्वर :** त्र्यंबकेश्वर येथील कुशावर्त तीर्थावर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या मंगल कलश यात्रेसाठी जल संकलन करण्यासाठी रविवारी सायंकाळी मान्यवरांची उपस्थिती लाभली.

यावेळी जिल्हाध्यक्ष विष्णुपंत म्हैसधुणे यांनी या मंगल कलश यात्रेची संकल्पना स्पष्ट केली. या मंगल कलशात कुशावर्त जल, हनुमान जन्मस्थान अंजनेरी गडावरील माती, संत निवृत्तिनाथ संजीवन समाधी मंदिर परिसरातील माती, ब्रह्मगिरी पर्वतावरील गोदावरीच्या उगमस्थानावरील जल यांच्या कालाशांचे पूजन करण्यात आले.

यावेळी यामागची संकल्पना स्पष्ट करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण महाराष्ट्रातून मंगल कलश यात्रा काढण्यात येत आहे. दिनांक २९ एप्रिल मंगळवार रोजी सदर यात्रा नाशिक शहरात येत आहे. या यात्रेत महाराष्ट्रातील विविध नदी जल व गडकिल्ल्यांची माती एकत्र करत मंगल कलश यात्रा महाराष्ट्रातील प्रत्येक विभागातून मुंबईकडे जाणार आहे. महाराष्ट्राची थोर संस्कृती आणि उज्वल परंपरा यांचे दर्शन या यात्रेतून घडवले जात आहे. त्र्यंबकेश्वर येथे यानिमित्ताने आमदार हिरामण खोसकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी ज्येष्ठ नेते संपतराव सकाळे, ॲड. संदीप गुळवे, जिल्हाध्यक्ष विष्णुपंत म्हैसधुणे, महिला जिल्हाध्यक्ष प्रेरणा बलकवडे, युवक जिल्हाध्यक्ष योगेश निसाळ, विद्यार्थी जिल्हाध्यक्ष अक्षय खांडबहाले, तालुकाध्यक्ष बहिरू मुळाणे, महिला तालुकाध्यक्ष भारती खिरारी, युवक तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर महाले, शहराध्यक्ष बंडू खोडे, वेदांत फडके, संजय मेढे, गोकुळ बत्तासे, हिरामण जाधव, वामन खोसकर, रोहित सकळे, हिमांशू देवरे यांसह मोठ्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



# चांदवड तालुक्यातील महिलांसाठी शेळीपालन, शेतीपूरक व्यवसाय प्रशिक्षण

**चांदवड : वार्ताहर**

बँक ऑफ महाराष्ट्र आणि उमेद महा. राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या संयुक्त विद्यमाने पंचायत समिती चांदवड अंतर्गत आरशेटी प्रशिक्षण संस्थेत चांदवड तालुक्यातील महिलांसाठी शेळीपालन व शेतीपूरक व्यवसायाचे प्रशिक्षण नुकतेच आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणामुळे महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

प्रशिक्षणाच्या समारोपप्रसंगी आयोजित कार्यक्रमात प्रशिक्षणार्थी महिलांना आमदार राहुल आहेर यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. यावेळी बोलताना आमदार राहुल आहेर यांनी महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी अशा प्रशिक्षणांचे महत्त्व सांगितले आणि महिलांना शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी गटविकास अधिकारी मच्छिंद्र साबळे, भाजप तालुकाध्यक्ष मनोज शिंदे, राजेश गांगुर्डे, भाजप महिला मोर्चा तालुकाध्यक्ष गीताताई झाल्टे, उमेद प्रशिक्षण तालुका व्यवस्थापक प्रकाश बागुल, राजेंद्र पवार आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांनीही महिलांना मार्गदर्शन केले आणि त्यांच्या प्रयत्नांना शुभेच्छा दिल्या.

# भाकपाचे सिन्नर तालुका अधिवेशन उत्साहात

**सिन्नर : प्रतिनिधी**

सिन्नरला २७ एप्रिल रोजी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सिन्नर तालुका अधिवेशन नांदूरशिंगोटे या ठिकाणी काल पक्षाचे ज्येष्ठ नेते कॉ. कारभारी उगले पाटील यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडले. अधिवेशनाचे उद्घाटन पक्षाचे नाशिक जिल्हा सचिव कॉ. महादेव खुडे यांच्या प्रभावी भाषणाने झाले तर शाहीर कॉम्रेड धम्मा खडसे यांची क्रांतिकारी गीताने उत्साहात आली.

कॉ. खुडे यांनी आपल्या भाषणात स्पष्टपणे सांगितले की, आपण निवडून दिलेले लोकप्रतिनिधी जनतेसाठी नाही, तर स्वतःच्या विकासासाठी काम करतात. आपला खरा विकास हा फक्त भारतीय कम्युनिस्ट पक्षच करू शकतो. त्यांनी कष्टकरी वर्गाला संघटित होण्याचे आवाहन करत सांगितले की, जो कष्ट करतो, त्याला त्याचा पूर्ण मोबदला मिळायला हवा. त्यासाठी लाल झेंड्याखाली संघटित संघर्षाची गरज आहे.



अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी कॉ. कारभारी उगले पाटील होते. त्यांनी उपस्थितांना उद्देशून सांगितले, आपण कामगार आहोत, याचा आपल्याला अभिमान असला पाहिजे. आपण आपल्या श्रमावर जगतो; कोणाच्या श्रमावर नव्हे. त्यांनी पक्षाचा गौरवशाली इतिहास, कामगार आणि श्रमिक चळवळीतील संघर्ष, आणि संघर्षातून मिळवलेल्या यशाचा गौरव केला. त्यांनी विशेषतः तरुणांची वाढती उपस्थिती कौतुकास्पद असल्याचे सांगितले व नव्या पिढीने संघर्षाचे महत्त्व समजून घेतले पाहिजे, असे आवाहन केले.

अधिवेशनात नवीन नेतृत्वाची निवड सर्वानुमते करण्यात आली. सचिव म्हणून मारुती पवार सहसचिव म्हणून अनिल पठारे, व जिजाबाई आंधळे तर खजिनदार म्हणून अतिक सैय्यद यांची निवड झाली. तसेच, सुकदेव जोंधळे यांची सचिव मंडळ सदस्य म्हणून निवड करण्यात आली. २१ सदस्यीय तालुका कौन्सिलही एकमताने निवडून देण्यात आली.

अधिवेशनाचे सूत्रसंचालन संतोष शिरसाठ यांनी तर प्रास्ताविक कॉ. भीमा पाटील यांनी केले. पक्षाचे ज्येष्ठ नेते कॉ. दत्तू तुपे, कॉ. पद्माकर इंगळे, आणि कॉ. तल्हा शेख यांनी अधिवेशनास सदिच्छा देऊन पुढील संघर्षासाठी सदिच्छा दिल्या. अधिवेशनात कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य, पक्षनिष्ठा आणि संघर्षाची ऊर्जा फुलली. आगामी काळात भारतीय कम्युनिस्ट पक्ष सिन्नर तालुका कार्यक्षेत्रात अधिक बळकट होणार याबाबत ठाम निर्धार व्यक्त करण्यात आला.

# श्रीराम मंदिर परिसरात स्वच्छता मोहीम

**सिन्नर : प्रतिनिधी**

जागतिक वसुंधरा दिनानिमित्त २२ एप्रिल ते १ मे महाराष्ट्र दिन या कालावधीत साजऱ्या होणाऱ्या वसुंधरा नवरात्रोत्सव महोत्सवांतर्गत सिन्नर नगरपरिषद आणि वनप्रस्थ फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आणि सिन्नर शहरातील विविध सामाजिक संस्थांच्या सहकार्याने सुरू करण्यात आलेली स्वच्छता मोहीम शनिवारी (दि. २६) माजी नगरसेवक सोमनाथ पावसे यांच्या पुढाकारातून प्रभाग क्रमांक ११ मधील अयोध्यानगर, उद्योग भवन येथील श्रीराम मंदिर परिसरात राबविण्यात आली.

माजी नगरसेवक सोमनाथ पावसे यांच्यासह स्थानिक महिलांनी व नागरिकांनी सहभाग घेऊन अयोध्यानगर येथील श्रीराम मंदिर परिसरापासून स्वच्छता मोहीम सुरू करून रस्ते, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता करण्यात आली. यावेळी महिलांनी आपल्या स्वच्छतेबाबतच्या समस्या नगर परिषदेच्या अधिकाऱ्यांना सांगून उपाय योजना करण्यास सांगितले.



तसेच नागरिकांचा सहभाग व पुढाकार घेणे गरजेचे आहे, असे मत माजी नगरसेवक सोमनाथ पावसे यांनी मांडले.

तब्बल ९ दिवस चालणाऱ्या या वसुंधरा नवरात्रोत्सव महोत्सवात पाण्याचे जलस्त्रोत पुनर्जीवित करणे, वृक्षारोपण करणे, शहरातील विविध भाग स्वच्छ करणे, टाकाऊपासून टिकाऊ वस्तू तयार करणे इ.बाबत शाळा, महाविद्यालयात निबंध स्पर्धा घेणे व महाराष्ट्र दिनी उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्तींचा संस्थेचा सन्मान करण्यात येणार आहे.

सिन्नर शहरातील विविध सामाजिक संस्थांसह नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपले सिन्नर शहर स्वच्छ सुंदर व्हावे यासाठी स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला.

यावेळी उदय सांगळे, सिन्नर नगर परिषदेचे आरोग्य निरीक्षक रवींद्र देशमुख, शहर अभियान व्यवस्थापक अनिल जाधव, शहर समन्वयक सायली बाविस्कर, माजी नगरसेवक श्रीकांत जाधव, वनप्रस्थ फाउंडेशनचे अध्यक्ष अभिजित देशमुख आदी उपस्थित होते. यावेळी वनप्रस्थ फाऊंडेशनचे सर्व पदाधिकारी, सदस्य, सिन्नर नगर परिषदेचे अधिकारी, स्वच्छता कर्मचारी, तसेच माजी नगरसेवक सोमनाथ पावसे, अयोध्यानगर येथील नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# बारागावपिंप्री शाळेत चौथीच्या विद्यार्थ्यांचा आशीर्वाद सोहळा

**सिन्नर :** तालुक्यातील बारागावपिंप्री येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांचा आशीर्वाद आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा उत्साहात झाला. चौथीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांना सन्मानचिन्ह व त्यांच्या कार्याचा गौरव करणारी आकर्षक फ्रेम भेट दिली. तसेच शाळेसाठी खास भेटवस्तू अर्पण करून आपल्या शाळेबद्दलच्या प्रेमाचा सुंदर आविष्कार केला. विद्यार्थ्यांच्या प्रेमळ सन्मानामुळे शिक्षकही भावूक झाले. यावेळी शाळेच्या वतीने वर्षभर विविध शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून सुंदर डेंगळे, गणेश कळसकर, मनोज उगले, सागर उगले, रवी उगले, दशरथ रोडे, संदीप जाधव, कैलास उगले, सीमा मांजरे आदींसह पालक आणि ग्रामस्थांनीही मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षक राजेंद्र पाटील, गोरक्ष सोनवणे, रोहिणी पगार, मनीषा शेळके, गोरक्ष काकड आणि अनिता बडदे यांनी मनोगत व्यक्त केली.

यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक नवनाथ हांडगे, शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## महत्त्वाचे

### नाशिकमध्ये १ मे रोजी मूल्यसंस्कार मेळावा

**नाशिक : प्रतिनिधी**

अखिल भारतीय श्री स्वामी सेवामार्गाच्या बालसंस्कार व युवा प्रबोधन विभागातर्फे नाशिकच्या गोल्फ क्लब मैदानावर दि.१ मे २०२५ रोजी परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या पावन सान्निध्यात भव्य राष्ट्रीय महासत्संग मेळावा तथा गुरु -मातृ-पितृ पाद्यपूजन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. भावी पिढी सुसंस्कारित, निर्व्यसनी, सदाचारी आणि कर्तृत्ववान निर्माण व्हावी, या उद्देशाने श्री स्वामी सेवामार्गाच्या बालसंस्कार व युवा प्रबोधन विभागातर्फे सातत्यपूर्ण विविध उपक्रम राबविले जातात. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून मूल्यसंस्कार मेळावा आणि गुरू मातृ पितृ पाद्यपूजन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमाची सुरुवात दि. १ मे रोजी सकाळी ९ वाजता गुरुपुत्र नितीन मोरे व प्रमुख मान्यवरांच्या हस्ते ज्ञानदालनाच्या उद्‌घाटनाने होईल. सर्वांसाठी ज्ञानदालने दिवसभर पाहण्यासाठी उपलब्ध असतील. कार्यक्रमाच्या ठिकाणी पालक पाल्य समुपदेशनासह गर्भसंस्कार, शिशुसंस्कार, बालसंस्कार, युवा प्रबोधन, आदर्श पालकत्व, युवा वर्गांसाठी नोकरी- करिअर मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आलेले आहे. दुपारी ठीक २ वाजता सामाजिक संदेश देणाऱ्या भव्यदिव्य संदेश यात्रेचे आयोजन करण्यात आले असून, त्यानंतर वृक्ष- बीजपूजन होऊन वृद्धाश्रममुक्त भारत नाटिका सादर केली जाईल. सायंकाळी ठीक ५.३० वाजता परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांचे पावन प्रबोधनपर हितगुज होईल.

### ‘मंगल कलश यात्रा’ उद्या नाशिक जिल्ह्यात

**नाशिक : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे महाराष्ट्र दिनानिमित्ताने ‘गौरवशाली महाराष्ट्र महोत्सवाचे’ आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त राज्यभरातील नद्यांचे पाणी, ऐतिहासिक व धार्मिक स्थळांवरील मातीचे मंगल कलश असलेला गौरवरथ येत्या मंगळवार दि.२९ रोजी नाशिक जिल्ह्यात येत असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष ॲड. रवींद्र पगार यांनी दिली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे मुंबई येथे ६५ व्या महाराष्ट्र दिनानिमित्त दि.१ ते ४ मेदरम्यान गौरवशाली महाराष्ट्र महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाच्या निमित्ताने संपूर्ण राज्यात महाराष्ट्र गौरव रथ : मंगल कलश यात्रा काढण्यात येत आहे. हि यात्रा मंगळवार दि.२९ रोजी नाशिक जिल्ह्यात येत आहे. महाराष्ट्राच्या प्रत्येक भागातील महापुरुषांच्या वास्तव्याने समृद्ध झालेल्या, त्यांच्या महान कार्याने प्रेरित अशा भागातील माती, नद्या आणि संगमावरून आणलेले पाणी या महाराष्ट्र गौरव रथातील मंगल कलशात एकत्रित करण्यात येणार असून, महाराष्ट्र दिनी मुंबई येथे आयोजित गौरवशाली महाराष्ट्र महोत्सवात ठेवण्यात येणार आहे.

# चार महिन्यांत रोखले अकरा बालविवाह

## अक्षयतृतीयेमुळे महिला-बालकल्याण विभाग अलर्ट मोडवर

**नाशिक : देवयानी सोनार**

**अक्षयतृतीया मुहूर्तावर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात बालविवाह होण्याची शक्यता लक्षात घेता जिल्हा प्रशासनाने कडक प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ तसेच महाराष्ट्र बालविवाह प्रतिबंध अधिनियम २०२२ अंतर्गत बालविवाह हा अजामीन पात्र गुन्हा असून, दोषींना दोन वर्षांपर्यंत सक्त मजुरीची शिक्षा व एक लाख रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो.**



जिल्ह्यात जानेवारी ते मार्च दरम्यान २४ बालविवाह प्रकरणांची नोंद करण्यात आली आहे. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयाच्या आकडेवारीवरून जानेवारी ते मार्च या कालावधीत एकूण २४ बालविवाह प्रकरणे नोंदविण्यात आली. यामध्ये नाशिक तालुक्यात सर्वाधिक ६ प्रकरणे, त्र्यंबकेश्वर, निफाड आणि नांदगाव तालुक्यांत प्रत्येकी दोन प्रकरणे आढळली आहेत. काही प्रकरणांमध्ये समुपदेशनाद्वारे बालविवाह रोखण्यात आले. काही प्रकरणे बालविवाह प्रतिबंधक अधिकाऱ्यांकडे कार्यवाहीसाठी वर्ग करण्यात आले.

जिल्ह्यातील १५ तालुक्यांमध्ये ग्राम बालसंरक्षण समित्यांची स्थापना करण्यात आली असून, त्यांना बालविवाह प्रतिबंध आणि जनजागृतीसंदर्भात प्रशिक्षण देण्यात आले आहे.

ग्रामीण भागात आजही अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर बालविवाह लावले जातात. बालविवाह रोखण्यासाठी गावपातळीवरील यंत्रणांनी सतर्क राहण्याबरोबर बालविवाह रोखण्यासाठी सोशल मीडियाचा प्रभावी वापर करीत दुर्गम भागात जनजागृती करावी, अशा सूचना उपजिल्हाधिकारी तुकाराम हुलवळे यांनी दिल्या आहेत.

> बालविवाह होत असल्यास किंवा बालविवाहाची माहिती असल्यास १०९८ किंवा ११२ यावर माहिती नोंदविता येणार आहे. ही माहिती गोपनीय ठेवली जाणार आहे.
>
> **– सुनील दुसाने,** जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, नाशिक

### पंडित, छायाचित्रकारांवर होणार कारवाई

बालविवाहात सहभागी होणारे व सहकार्य करणारे व्यक्ती धार्मिक गुरू, पंडित सेवा देणारे व्यावसायिक, मंडप मालक, फोटोग्राफर,केटरिंग व्यावसायिक, लॉन्स मालक आणि वाजंत्री यांच्यावरही कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

### ग्रामविकास अधिकाऱ्यांवर जबाबदारी

बालविवाह रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने ॲक्शन प्लॅन तयार केला आहे. यात ग्रामीण भागातील बालविवाह रोखण्याची जबाबदारी ग्रामविकास अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे.

| तालुका | जानेवारी ते मार्च२०२५ |
|---|---|
| नाशिक | ०६ |
| पेठ | ०० |
| बागलाण | ०१ |
| मालेगाव | ०२ |
| चांदवड | ०० |
| इगतपुरी | ०१ |
| त्र्यंबकेश्वर | ०२ |
| सिन्नर | ०१ |
| दिंडोरी | ०० |
| निफाड | ०२ |
| देवळा | ०१ |
| कळवण | ०० |
| नांदगाव | ०२ |
| सुरगाणा | ०० |
| इतर जिल्ह्याकडे वर्ग | ०५ |
| एकूण | २४ |
| समुपदेशाने रोखलेले बालविवाह ११ | |
| प्राप्त तक्रारीपैकी गरज नसलेली प्रकरणे(वय पूर्ण असणे, खोटी माहिती)०४ प्रकरणे | |
| बालविवाह प्रतिबंधक अधिकारी यांच्याकडे कार्यवाहीसाठी ०४ प्रकरणे | |

गेल्या वर्षी जिल्हा महिला व बालविकास विभागाकडे एकूण ६३ तक्रारी आल्या होत्या. यापैकी ४३ बालविवाह रोखण्यात आले होते. जिल्हा बालसंरक्षण कक्ष, चाइल्ड हेल्पलाइन पोलिस विभाग, सर्व बालविवाह प्रतिबंधक अधिकारी नाशिक यांच्या संयुक्त उपक्रमाने बालविवाह रोखण्यात यश आले आहे.

# चित्तथरारक अनुभव घेऊन परतले २५ नाशिककर

## टूर्सच्या प्रवाशांचाही रेल्वे प्रवास सुरू

**नाशिक : प्रतिनिधी**

जम्मू-काश्मीर येथे पर्यटनासाठी गेलेल्या नाशिक जिल्ह्यातील ७६ पर्यटकांपैकी ५१ पर्यटक टूर एजन्सीसोबत गेलेले असल्याने ते आपली सहल पूर्ण करून परतणार आहेत. २५ पर्यटक नााशिकला परतले आहेत. मात्र, दहशतवादी हल्ल्यामुळे पर्यटनाला जाणाऱ्या नागरिकांनी आपले रिझर्व्हेशन आरक्षण रद्द केले असून, त्यामुळे उन्हाळी कालावधीत पर्यटन क्षेत्राला मोठा फटका बसणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

नाशिकमधून काश्मीरला ७६ पैकी ५१ पर्यटक ट्रॅव्हल एजन्सीमार्फत पर्यटनासाठी गेलेले असून, पर्यटन सहल पूर्ण करून परतणार आहेत. पहलगाम परिसर अद्यापही बंदच असून, देशाच्या इतरत्र भागात फिरण्यास वाव असल्याने अनेकांनी त्यांची नियोजित सहल कायम ठेवली आहे. भारतीय लष्कराच्या सुरक्षेवर त्यांनी विश्वास व्यक्त केला असून, सहल पूर्ण झाल्यानंतर ट्रॅव्हल एजन्सीमार्फत ते परतणार आहेत.

तर स्वतंत्रपणे गेलेल्या २५ पर्यटकांचे परतीचे तिकीट आरक्षित करण्यात आले होते. त्यापैकी १८ पर्यटकांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विमानाने मुंबईला आणल्यानंतर ते नाशिकला दाखल झाले. नवीन नाशकातील दोघेही पर्यटक सुखरूप परतले असून, उर्वरित ५ जण परतीचा प्रवासात आहेत.

### वाहतूक कोंडी झाली नसती तर जिवावर बेतले होते...

मखमलाबाद येथील पर्यटकांचा मुक्काम पहलगाममध्येच होणार होता. मात्र, महामार्गावरील वाहतूक कोंडीमुळे त्यांनी पहिला मुक्काम श्रीनगर येथे केला. त्यानंतर पहलगामला जाण्याचे नियोजन केले होते; परंतु दुसऱ्याच दिवशी पहलगाममध्ये अतिरेकी हल्ला झाल्याचे वृत्त समजल्यामुळे हायसे वाटले. केवळ वाहतूक कोंडीमुळे आम्ही बदललेल्या मार्गामुळे आमचे प्राण वाचले, अन्यथा गंभीर प्रसंगाला सामोरे जावे लागले असते, असे काश्मीरहून परतलेले पर्यटक स्वप्नील मानकर व सहकार्यांनी सांगितले.

### नवीन नाशकातील दोघे परतले...

गुरुवारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमवेत परतलेल्या नागरिकांनी मुंबईत रात्रभर विश्रांती घेत शुक्रवारी दुपारनंतर नाशिक गाठले. नवीन नाशिक येथील सिद्धी मुसळे व सौरभ मुसळे यांचाही समावेश आहे.

> पहलगाम बंद आहे. त्यामुळे त्या भागात कोणताही पर्यटक जाऊ शकत नाही. तेथील स्थिती अजून काही दिवस कायम राहण्याची शक्यता आहे. मात्र, इतर ठिकाणचे वातावरण निवळल्याने नाशिकमधील बहुतांश पर्यटकांनी पुढील कार्यक्रम कायम ठेवला आहे. मात्र, या घटनेमुळे पुढील आठ दिवसांचे टूरसह रेल्वे आणि विमानाचे सर्वच आरक्षण रद्द झाले असून, त्यामुळे कोट्यवधींचा फटका पर्यटन व्यवसायाला बसला आहे. परिस्थिती पूर्वपदावर येण्यास बराच कालावधी जावा लागेल.
>
> **– सागर वाकचौरे,** प्रसन्ना हॉलिडेज



# स्वामी समर्थ पुण्यतिथी सप्ताहाची सांगता

## नऊ लाख सेवेकऱ्यांचे श्रीगुरुचरित्र पारायण

**नाशिक : प्रतिनिधी**

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवामार्ग प्रधान केंद्र दिंडोरी आणि त्र्यंबकेश्वर येथील समर्थ गुरुपीठ यांसह देश व विदेशातील हजारो केंद्रांवर स्वामी समर्थ पुण्यतिथी अखंड नामजप, यज्ञ सप्ताहाची सांगता स्वामी पुण्यतिथी दिनी करण्यात आली. यनिमित्ताने नाशिक जिल्ह्यात ६६ हजार तर देशभरात व जगभरात ९ लाखांपेक्षा अधिक आबालवृद्ध सेवेकऱ्यांनी श्रीगुरुचरित्र या पावन ग्रंथाचे पारायण केले.

काल भल्या पहाटेपासून दिंडोरी, त्र्यंबकेश्वरसह सर्व समर्थ केंद्रांवर सांगता सोहळ्याची लगबग दिसून येत होती. यज्ञविधी, आरती व इतर सेवा सकाळपासून संपन्न झाली. दिंडोरीत प. पू. अण्णासाहेब मोरे तर त्र्यंबकेश्वर गुरुपीठात चंद्रकांतदादा मोरे यांच्या हस्ते आरती व इतर सेवा संपन्न झाली.

गेल्या आठवडाभरात देश व देशाबाहेर लाखो आबालवृद्ध समर्थ सेवेकरी आणि भाविकांनी केंद्रात आणि आपापल्या घरी श्रीगुरुचरित्र, दुर्गासप्तशती, नवनाथ, भागवत, श्री स्वामी चरित्र सारामृत या पवित्र ग्रंथाची पारायणे केली.

दिंडोरी येथे उपस्थित सेवेकऱ्यांशी गुरुमाऊली प. पू. अण्णासाहेब मोरे यांनी हितगुज करताना देश व जगापुढे उभ्या असलेल्या भयानक संकटाबाबत चर्चा करून यातून भारतमातेचे रक्षण होण्यासाठी मोठ्या प्रमाणात सेवा रुजू करण्याबाबत आवाहन केले. दिंडोरीत स्वतः गुरुमाऊली तर त्र्यंबकेश्वर येथे चंद्रकांतदादा मोरे यांनी सपत्नीक यज्ञविधीत सहभाग घेतला. सर्व केंद्रांवर दर्शन व महाप्रसादाचा लाभ लाखो सेवेकऱ्यांनी घेतला.

# रुग्णालय कर्मचारी पतसंस्थेला १ कोटी ४७ लाखांचा नफा

**नाशिक : प्रतिनिधी**

जिल्हा रुग्णालय कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित नाशिक पतसंस्थेला सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात संस्थेला एकूण ४ कोटी २३ लाख इतका नफा झालेला असून, खर्च व तरतुदी करता मार्च २०२५ अखेर १ कोटी ४७ लाख रुपये निव्वळ नफा झाल्याची माहिती पतसंस्थेचे चेअरमन आनंद सपकाळ, व्हा. चेअरमन ज्योती वाघ, सचिव पंकज सूर्यवंशी, खजिनदार प्रवीण धेंड यांनी दिली.

यावेळी संस्थेच्या सन २०४३-२०२५ या आर्थिक वर्षात सांपत्तिक स्थितीचा आढावा घेण्यात आला. यात वसूल भागभांडवल रुपये १३. कोटी ७७ लाख, निधी ६ कोटी ११ लाख, ठेवी २९ कोटी ६९ लाख, संस्थेची गुतवणूक ६ कोटी ६५ लाख केलेली आहे. कर्ज वाटप ४४ कोटी १७ लाख इतके येणे बाकी आहे.

सभासदांच्या आर्थिक अडचणी लक्षात घेऊन संस्थेने कर्ज मर्यादा २० लाख इतकी ठेवली आहे. मयत सभासदांच्या वारसांना संस्थेच्या संस्थेच्या सभासद कल्याण निधीतून तात्काळ ३० हजार रुपये आर्थिक मदत केली जाते. चालू आर्थिक वर्षात ३० हजार इतकी मदत मयत सभासदांच्या वारसांना केली आहे. तसेच कर्जदार मयत सभासदांचे सभासद सहाय्यता निधीतून मंजूर कर्ज रकमेच्या ६० टक्के कर्ज माफ केले जाते. संस्थेने चालू आर्थिक वर्षात दोन मयत सभासदांचे १० लाख ३० हजार इतके कर्ज या निधीतून माफ केले. संस्थेच्या सभासदांमध्ये वाढ होत असून, संस्थेचे एकूण सभासद ९५० आहे. संस्थेचे थकबाकी प्रमाण ० टक्के आहे.

यावेळी संस्थेचे संचालक सर्व ज्ञानेश्वर माळोदे, अजित गायकवाड, सुनील गिते, प्रकाश राव, देवीदास सहाणे, भरत आव्हाड, पंकज वाघ, बाळू शिंद, सरजित डिंगीया, शुभांगी वाघ, बबिता परदेशी यांनी समाधान व्यक्त केले.

# मुंबई ते सहरसादरम्यान अमृत भारत एक्स्प्रेस

**नाशिकरोड : विशेष प्रतिनिधी**

मध्य रेल्वेकडून लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई ते सहरसा (बिहार) दरम्यान नवीन ‘अमृत भारत एक्स्प्रेस’ साप्ताहिक गाडी सुरू केली जात आहे. ही सेवा प्रवाशांसाठी २ मेपासून सुरू होणार आहे.



ट्रेन क्रमांक ११०१५ ही गाडी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून दर शुक्रवारी दुपारी १२ वाजता सुटेल आणि तिसऱ्या दिवशी पहाटे २ वाजता सहरसा येथे पोहोचेल. परतीच्या प्रवासासाठी ट्रेन क्रमांक ११०१६ सहरसा येथून दर रविवारी सकाळी ४.२० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी दुपारी ३.४५ वाजता एलटीटी मुंबई येथे पोहोचेल.

येथे थांबणार : ठाणे, कल्याण, नाशिकरोड, जळगाव, भुसावळ, इटारसी, जबलपूर, सतना, माणिकपूर, प्रयागराज छिवकी, मिर्झापूर, पं. दीनदयाल उपाध्याय जंक्शन, बक्सर, आरा, दानापूर, पाटलीपुत्र, सोनपूर, हाजीपूर जंक्शन, मुजफ्फरपूर, समस्तीपूर, हसनपूर रोड, सलौना आणि खगडिया जंक्शन येथे या गाडीला थांबे असतील. या गाडीत ८ शयनयान डबे, ११ सामान्य द्वितीय श्रेणी डबे, १ पँट्री कार आणि २ सामानासह गार्ड ब्रेक व्हॅन असेल.

आरक्षण : या गाडीच्या २ मेच्या पहिल्या फेरीसाठी आरक्षण २७ एप्रिल २०२५ पासून सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर तसेच www.irctc.co.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. तसेच अनारक्षित डब्यांसाठी यूटीएस ॲपद्वारे तिकीट बुक करता येईल.

# वसंत व्याख्यानमालेत यंदा जगभरातील १० विचारवंत

## महाराष्ट्र भूषण डॉ. अभय बंग उद्‌घाटनाचे पुष्प गुंफणार

**नाशिक : प्रतिनिधी**

**येत्या १ मेपासून नाशिकच्या गोदाघाटावर सुरू होणाऱ्या वसंत व्याख्यानमालेच्या १०२ व्या वर्षाच्या ज्ञानयज्ञामध्ये जगभरातील १० विचारवंत आपले विचार मांडणार आहेत. व्याख्यानमालेचे उद्‌घाटनाचे पुष्प महाराष्ट्र भूषण डॉ. अभय बंग हे ‘आरोग्याचे स्वराज्य’ या विषयावर गुंफणार आहेत.**

विविध फळांची जगभरात निर्यात करून शेतकरी बांधवांना स्वावलंबी बनविणारी सह्याद्री फार्म्स, मोहाडी आणि जागतिक बाजारपेठेत उज्ज्वल नाव मिळविणारा सपट ग्रुप यावर्षीच्या व्याख्यानमालेचे प्रायोजक व सहप्रायोजक आहेत.

प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही दि. १ ते ३१ मे रोजी दररोज सायं. ७.१५ वाजता देवमामलेदार यशवंत महाराज पटांगण, गोदाघाट, पंचवटी, नाशिक येथे हा ज्ञानयज्ञ आयोजित करण्यात आला आहे. या व्याख्यानमालेचा प्रारंभ नाशिक महापालिका आयुक्त/प्रशासक मनीषा खत्री यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महसूल आयुक्त प्रवीण गेडाम, पोलीस आयक्त संदीप कर्णिक, जिल्हाधिकारी जलज शर्मा, विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, आदिवासी विकास आयुक्त लीना बनसोड, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने, शर्मिष्ठा वालावलकर - घारगे, कार्यकारी अभियंता उदय पालवे, एच. ए. एल.चे महाव्यवस्थापक सुब्रत मंडल, सह्याद्री फार्म्सचे चेअरमन विलास शिंदे, सपट उद्योग समूहाचे चेअरमन निखिल जोशी उपस्थित राहणार आहेत.

व्याख्यानमालेत जगभरातील १० मान्यवर आपले विचार मांडणार आहेत. २ मे रोजी युवा शाहीर सूरज राऊळ, स्वेच्छानिवृत्त आयकर अधिकारी उज्ज्वलकुमार चव्हाण (३ मे - ये इडी इडी क्या है?), दि. ४ मे रोजी आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यावर परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. महसूल आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम व सहकारी अधिकारी त्यामध्ये सहभागी होणार आहेत. ५ मे रोजी शेतीतज्ञ सचिन व समीर अधिकारी (मोहाकडून मोहरानाकडे), ६ मे रोजी न्या. चकोर बाविस्कर (संताचे समकालिनत्व), ७ मे रोजी अमेरिकेतील आकाश पाटील (विचारांच्या क्षितिजापलीकडे : कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मानवी क्षमतांचा विस्तार), गुरुवार ८ मे रोजी शाहु पाटोळे (अन्नात कालविलेला धर्म आणि राजकारण), ९ मे रोजी वरुण सुखराज (नवभारत: जाणिवेची उणीव), दि. १० मे रोजी निरंजन राजाध्यक्ष (विकसित भारताच्या दिशेने वाटचाल : संधी आणि समस्या), रविवार दिनांक ११ मे रोजी उद्धव अहिरे ( उद्यमशीलतेची पेरणी : यशाचे पीक), १२ मे रोजी डॉ. मेधा ताडपत्रीकर( प्लास्टिक : वरदान आणि धोका) १३ मे रोजी शेफ विष्णू मनोहर (असे घडले विश्वविक्रम आणि मराठी पदार्थांचे जागतिकीकरण), १४ मे रोजी अभय भंडारी (शिवचरित्रातून आम्ही काय शिकलो), १५ मे रोजी प्रा. मनोज बोरगावकर (नदीचे स्वर आणि नाद), शुक्रवार दि. १६ रोजी पद्मभूषण डॉ. नंदकिशोर लाड (आत्मनिर्भर आरोग्य सेवा) १७ मे रोजी उन्मेष वाघ (वाढवण बंदर- एक कल्पवृक्ष), १८ मे रोजी माधव दाबके (पिरॅमिडच्या तळाशी नवोन्मेष आणि उद्योजकता निर्माण करा), सोमवार दि. १९ रोजी आनंदसागर शिराळकर जपान (एआय युगात भाषेचे भविष्य : आपण तंत्रज्ञानाला शिकविणार की तंत्रज्ञान आपल्याला), २० मे रोजी सुनील कुलकर्णी ( जपान आणि भारत उद्योजकांची अंतदृष्टी व नोकरीच्या संधी), २१ मे रोजी किरण पुरंदरे (जंगलातील ४०० दिवस) २२ मे रोजी डॉ. सुयश चव्हाण (प्रशासकीय सेवा परीक्षांची पूर्वतयारी आणि जागतिक स्तरावर भारतीय विद्यार्थ्यांना उपलब्ध संधी), २३ मे रोजी अझहर तंबुवाला (भारतीय फलोत्पादन आणि बाहेरील जग : एक दृष्टिकोन), २४ मे रोजी बिल्कीस मोर ( क्रीडा क्षेत्रातील वाटचाल: महिलांपुढील आव्हाने), २५ मे रोजी अमित वाईकर (प्रवासी भारतीयांचे सामाजिक नेतृत्व), दि.२६- इंद्रनील बंकापुरे, कोल्हापूर( मंदिरे कशी पाहावीत?), दि.२७ -श्रीनिवास ठाणेदार (प्रकट मुलाखत : सुरेश भटेवरा), दि.२८- अनिल पाटील (स्वातंत्र्यसूर्य सावरकर आणि नाशिकमधील शतकृत्य), दि. २९- डॉ. विजय जोशी (मजबूत व गुणवत्तापूर्ण रस्ते आणि महामार्गाची बांधणी), दि. ३० सुनील देवधर ( पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर), दि. ३१ व्याख्यानमालेचा समारोप झी मराठी प्रस्तुत उत्सव नात्यांचा - उत्सव झी मराठीचा या कार्यक्रमाने होणार आहे. या कार्यक्रमात झी मराठी वाहिनीवरील सिरिअलमधील कलाकार, गायक, नृत्यकलाकार व सेलिब्रिटी निवेदक सहभागी होणार आहेत. दररोज व्याख्यानानंतर नाशिकमधील विविध कलाकारांचे ग्रुप गाणी व नृत्यांचे सादरीकरण करणार आहेत.

### वसंत व्याख्यानमाला

सर्व कार्यक्रमांचे थेट प्रक्षेपण केबल टीव्ही तसेच समाजमाध्यमांवर करण्यात येणार आहेत. कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन व्याख्यानमालेच्या कार्यकारी मंडळाने केले आहे.




योजनांचे व्यवस्थापक आणि त्यांच्या कामगिरीचा आढावा पान ३


नाशिक आज
# गांवकरी



अपघाती मृत्यू अन् भरपाई पान ३

नाशिक, सोमवार, दि. २८ एप्रिल २०२५

## महत्त्वाचे ▶▶▶▶



### 'एका इंजिनिअरची गोष्ट' पुस्तकाचा प्रकाशन सोहळा

**नाशिक : प्रतिनिधी**

अत्यंत गरीब परिस्थितीतून वर आलेल्या विनजीत टेक्नॉलॉजीचे असो. व्हाइस प्रेसिडेंट विशाल अवचिते यांनी आपल्या सहजीवनावर आधारित लिहिलेल्या इंजिनिअरची गोष्ट या पुस्तकाचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या हस्ते सह्याद्री बंगला, मुंबई येथे झाले. विशाल अवचिते यांनी अत्यंत गरीब परिस्थितीतून शिक्षण घेऊन असो. व्हाइस प्रेसिडेंट पदापर्यंतचा प्रवास कसा पार केला याचे जिवंत चित्रण उभे केलेले स्वलिखित पुस्तक म्हणजेच इंजिनिअरची गोष्ट. अशिक्षित आई-वडिलांच्या पोटी झोपडपट्टीत जन्म घेतलेल्या एका तरुण युवकाला शिक्षणातून यशाची उंच शिखरे गाठताना त्याच्या आयुष्यात आलेले कठीण प्रसंग, त्यावर त्याने केलेली मात, मोलमजुरी करणाऱ्या वडिलांच्या कष्टाची जाण ठेवून आपले ध्येय कसे गाठले? याचे चित्रण या पुस्तकात त्यांनी मांडले आहे. विशाल अवचिते यांनी स्वजीवनावर आधारित लिहिलेल्या या पुस्तकातून युवकांना करिअरमध्ये मार्गदर्शन करण्यासाठी हे पुस्तक उपयोगी आणि प्रेरणादायी ठरेल, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी व्यक्त केले. या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याप्रसंगी नाशिकच्या आमदार देवयानी फरांदे तसेच मुंबईचे डीसीपी प्रशांत परदेशी, शिक्षण खात्यातील भूपेंद्र शुक्ला उपस्थित होते.

### जगदीश पवार यांचा सन्मान



**नाशिकरोड :** कोविड-१९ काळात नागरिकांच्या आरोग्य सुरक्षेसाठी सातत्याने कार्य करणाऱ्या माजी नगरसेवक जगदीश पवार यांचा डॉ. बी. आर. आंबेडकर इंटरनॅशनल अवॉर्डने गौरव करण्यात आला आहे. युनिव्हर्सिटी ऑफ टोलेसा, मेक्सिको या संस्थेने हा पुरस्कार प्रदान केला. नाशिक येथील रॉयल हेरिटेज हॉटेलमध्ये झालेल्या सोहळ्यात विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कट्टाबोम्मन आणि संचालक मंडळाचे अध्यक्ष डॉ. इलहम मर्रीकर यांच्या हस्ते पवार यांना सन्मानित करण्यात आले. जगदीश पवार हे गेली अडीच दशके सामाजिक कार्यात सक्रिय असून, बिटको हॉस्पिटलमध्ये त्यांनी हजारो रुग्णांना मदत केली आहे. कोविड काळातही त्यांनी नागरिकांना आरोग्य सुविधा मिळवून देण्यासाठी मोठा पुढाकार घेतला. त्यांच्या या कार्याची दखल घेत महाराष्ट्र शासनाने त्यांना 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार'ही दिला आहे. आता आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळालेल्या या पुरस्कारामुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

> समाजसेवेचा स्थायीभाव मनात बाळगून मी काम करतो. नागरिकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणे हेच माझे खरे समाधान आहे. सेवा देताना मिळणारा आनंद अमूल्य असतो. यासाठीच मी प्रामाणिकपणे सामाजिक कार्य करत आलो आहे. पुरस्कारासाठी युनिव्हर्सिटी ऑफ टोलेसाच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे मी आभार मानतो.
> – **जगदीश पवार,** माजी नगरसेवक

### रामराजमध्ये कार्यशाळा उत्साहात




**नाशिक :** रामराज ज्युनिअर कॉलेज आयोजित रेडिएशन तंत्रज्ञानाचे आणि भारतीय अणुऊर्जा कार्यक्रमाचे फायदेशीर परिणाम या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे यशस्वीरीत्या आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना रेडिएशन तंत्रज्ञान आणि भारतीय अणुऊर्जा कार्यक्रम संबंधित मौल्यवान अंतर्दृष्टी आणि प्रत्यक्ष अनुभव प्रदान करणे होते. कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. शशांक सैंदाणे यांच्या हस्ते करण्यात आले. ज्यांनी आजच्या जगात रेडिएशन टेक्नॉलॉजी आणि न्यूक्लिअर एनर्जी प्रोग्रामचे महत्त्व अधोरेखित केले. संस्थेच्या अध्यक्षा हर्षदा घायाळ यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. विद्यार्थ्यांना अशा शिक्षण संधींचा जास्तीत जास्त फायदा घेण्यास प्रोत्साहित केले. दिवसभर शशांक सैंदाणे, डॉ. चित्रा यांनी विषयाच्या विविध पैलूंवर लक्ष केंद्रित करणारे सत्र आयोजित केले. तसेच विद्यार्थ्यांशी सक्रियपणे संवाद साधला आणि व्यावहारिक प्रात्यक्षिकांमध्ये भाग घेतला. संस्थेचे संचालक प्रा. रामकृष्ण घायाळ यांनी अशा कार्यक्रमांमधून रामराज ज्युनिअर कॉलेज वर्गाबाहेरील समग्र शिक्षण देण्याच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंब पडते, असे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यशाळेचे प्रास्ताविक संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. नितीन पाटील यांनी केले. ज्यामध्ये आयोजक संघाच्या प्रयत्नांचे आणि विद्यार्थ्यांच्या उत्साही सहभागाचे कौतुक केले. कार्यक्रमाला विद्यार्थ्यांची लक्षणीय उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी आनंद गव्हाणकर व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे आभार प्रा. सागर गायकवाड यांनी मानले.

# मार्च महिन्यात ३४ हजार प्रवाशांची हवाई सफर

**नाशिक : प्रतिनिधी**

**नाशिक विमानतळ हे नागरिकांबरोबरच उद्योजक व व्यापारी वर्गासाठी उपयुक्त ठरले आहे. मार्चमध्ये ३४ हजार ३४९ प्रवाशांनी विमान सेवेचा लाभ घेतला. मागील वर्षी मार्च २०२४ मध्ये २२ हजार २६९ प्रवाशांनी विमान सेवेचा लाभ घेतला होता. मार्च महिन्यातील ही प्रवासी वाढ ५४ टक्के झाली आहे.**




यासह कार्गो सेवेतून माल वाहतुकीमध्ये प्रचंड वाढ झाली असून, कार्गो सेवेत शंभर पटीने वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

संपूर्ण वर्षाचा आढावा घेतल्यास २०२३-२४ मध्ये २ लाख ४२ हजार ३७२ प्रवाशांनी विमानसेवेचा लाभ घेतला. २०२४-२५ मध्ये ३ लाख ४१ हजार ११२ प्रवाशांनी विमानाची सेवेचा लाभ घेतला. वर्षभरातील ही वाढ ४० टक्क्यांची दिसून येत आहे. देशविदेशातही कार्गो सेवा ही सक्षम नाशिक विमानतळावरून कार्गो सेवेमध्येही कमालीची वाढ झाल्याचे दिसून येत आहे. मार्च २०२४ मध्ये १८८ मेट्रिक टन मालाची वाहतूक झाली होती. त्यात देशांतर्गत शून्य मेट्रिक टन होते तर आंतरराष्ट्रीय स्तरावर १८८ मेट्रिक टन माल वाहतूक करण्यात आली होती. हेच प्रमाण मार्च २०२५ मध्ये ६६२ मेट्रिक टनावर गेले आहे. त्यात देशांतर्गत १३.६ मेट्रिक टन तर आंतरराष्ट्रीय स्तरावर ६४९ मेट्रिक टन एवढे झाले आहे.

संपूर्ण वर्षाचा आढावा घेतल्यास २०२३-२४ मध्ये संपूर्ण वर्षात देश-विदेशात ४६३ मेट्रिक टन मालवाहतूक झाली तर हेच प्रमाण २०२४-२५ मध्ये ४ हजार २८० मेट्रिक टन एवढे झाले आहे.

> नाशिकची विमानसेवा गेल्या काही वर्षांत विकसित होत आहे. नाशिकमध्ये खूप क्षमता आहे. त्यामुळे मागील वर्षात झालेली प्रवासी वाढ व कार्गो सेवावाढ ही उत्साहवर्धक आहे. नाशिकमधून आंतरराष्ट्रीय कार्गो सेवा सुरू झालेली असल्यामुळेच कार्गोची आकडेवारी वेगाने वाढली आहे. **–मनीष रावल,** अध्यक्ष,एव्हिएशन समिती, निमा

# पांडवलेणीवर पिता-पुत्र अडकले

## तीन तासांच्या प्रयत्नांनंतर सुखरूप सुटका

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

**रविवारच्या सुट्टीचा आनंद लुटण्यासाठी पांडवलेणी डोंगरावर ट्रेकिंगसाठी गेलेले वडील आणि त्यांचा मुलगा अडकून पडल्याची घटना घडली. सुदैवाने तातडीने सुरू करण्यात आलेल्या रेस्क्यू ऑपरेशननंतर दोघांनाही सुखरूप खाली आणण्यात यश आले.**

इंदिरानगर परिसरातील रहिवासी असलेले उमेश वालझाडे आणि त्यांचा १४ वर्षीय मुलगा तेजस वालझाडे हे दोघेही रविवारी सकाळी पांडवलेणी डोंगरावर ट्रेकिंगसाठी गेले होते. ट्रेक पूर्ण करून खाली येताना योग्य मार्ग सापडत नसल्याने व काळोखामुळे दिशाभूल होऊन ते दोघे अडकले. घाबरलेल्या अवस्थेत त्यांनी इंदिरानगर पोलिसांशी संपर्क साधला. पोलिसांनी तत्काळ अग्निशमन विभागाला आणि स्थानिक गिर्यारोहक पथकाला याची माहिती दिली. सकाळी साडेनऊ वाजेपासून शोधमोहीम सुरू करण्यात आली. सिडको अग्निशमन विभागाचे लीडिंग फायरमन अर्शद पटेल, श्रीराम देशमुख, वाहनचालक मल्हारी आहेर, तेजस वाघ, पार्थ शिंदे, सुमित कोठे, मीयोद्दीन शेख यांच्यासह गिर्यारोहकांच्या पथकाने दोर व आवश्यक साहित्य वापरून या पिता-पुत्रांना सुरक्षित खाली उतरवले. सुमारे दोन ते तीन तास चाललेल्या या रेस्क्यू ऑपरेशनमध्ये अथक प्रयत्न करून ही सुटका करण्यात आली. घटनास्थळी उपस्थित असलेल्या नागरिकांनी व प्रशासनाने या कार्याबद्दल संबंधित पथकांचे कौतुक केले. डोंगरावर ट्रेकिंगसाठी जाणाऱ्यांनी योग्य तयारीसह जाण्याची गरज अधोरेखित करते. स्थानिक प्रशासनानेही ट्रेकर्ससाठी आवश्यक सूचना व मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे. यावेळी इंदिरानगर पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारीही सतर्क राहून मदतीसाठी तत्पर असल्याचे दिसून आले.



# हंसिका टिल्लूचे एनडीए परीक्षेत देदिप्यमान यश

**नाशिक : प्रतिनिधी**

येथील महाराष्ट्राच्या गर्ल्स सर्व्हिसेस प्रिपरेटरी इन्स्टिट्यूट जीएसपीआयच्या पहिल्या बॅचमधील ठाणे येथील हंसिका टिल्लू हिची राष्ट्रीय संरक्षण अकादमीच्या गुणवत्ता यादीत निवड झाली असून, या विद्यार्थिनीने राष्ट्रीय संरक्षण अकादमीमध्ये प्रवेश परीक्षा उत्तीर्ण करून देशात ३९वा आणि मुलींमध्ये ५वा क्रमांक पटकावला आहे.

या ऐतिहासिक कामगिरीमुळे गर्ल्स सर्व्हिसेस प्रिपरेटरी इन्स्टिट्यूट, नाशिक येथील विद्यार्थिनी हंसिका मोहन टिल्लू हिचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते मंत्रालय, मुंबई येथे सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्रातील मुलींना जास्तीत जास्त संख्येने संरक्षण सेवेमध्ये अधिकारी म्हणून जाता यावे यासाठी दादा भुसे यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्र शासनाद्वारे मुलींची सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था ही नाशिक येथे सुरू करण्यात आली. या संस्थेतील विद्यार्थिनी हंसिका टिल्लूचे हे देदिप्यमान यश संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब आहे. याप्रसंगी विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

# नवीन शैक्षणिक वर्षाला १५ जूनपासून प्रारंभ

## शाळांना उन्हाळी सुट्टी; १ मे रोजी निकाल

**नाशिक : प्रतिनिधी**

शैक्षणिक वर्षाची समाप्ती होऊन उन्हाळ्याच्या सुट्टीकडे सर्व विद्यार्थ्यांचे लक्ष लागून राहते. यंदाच्या वर्षी केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ अर्थात सीबीएसईच्या धर्तीवर राज्य मंडळाच्या शाळांनाही शैक्षणिक वर्षातील अभ्यासक्रम, अभ्यासाचे तास पूर्ण करण्यासाठी यंदा २५ एप्रिलपर्यंत वर्ग भरविण्याचा शासनाने निर्णय घेतला होता. त्यानुसार यंदा २५ एप्रिलपर्यंत वर्षात वर्ग भरले. दि. २६ पासून शाळांना उन्हाळी सुट्ट्या सुरू झाल्या आहेत. १ मे रोजी सर्व शाळांचे निकाल जाहीर होणार आहेत. १५ जूनपासून पुन्हा पुढील नवीन शैक्षणिक वर्षाचे वर्ग भरण्यास सुरुवात होणार आहे.



> गेल्या काही दिवसांपासून उन्हाचा पारा वाढला असून, उन्हामध्ये जास्त फिरू नये, असे आवाहन केले जात आहे. विद्यार्थ्यांनाही उन्हाळ्याच्या सुट्ट्या जाहीर झाल्याने पालकांनी आपल्या पाल्याची काळजी घ्यावी. विद्यार्थी दुपारच्या उन्हामध्ये फिरणार नाही, या दृष्टीने पालकांनी लक्ष ठेवावे. गेल्या काही दिवसांत वातावरणातील बदलाचा लहान मुलांच्या प्रकृतीवर परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. उन्हापासून बचाव करण्यासाठी विशेषत: लहान मुलांनी अधिक काळजी घेणे गरजेचे आहे.
> – **सायली काळे,** संचालिका, स्ट्रॉबेरी स्कूल

राज्यात नवीन शैक्षणिक धोरण पुढील वर्षापासून लागू होणार आहे. पहिलीचा अभ्यासक्रमही बदलणार आहे. २०२९ पर्यंत टप्प्याटप्प्याने ते लागू केले जाईल. यासाठी शैक्षणिक दिवस आणि तासिका पूर्ण करण्यासाठी यंदापासूनच अंमलबजावणी सुरू झाली. त्यामुळे १० एप्रिलपर्यंत सुट्या लागणाऱ्या स्टेट बोर्डाच्या सर्वच शाळा २५ एप्रिलपर्यंत सुरूच राहिल्या. २६ एप्रिलपासून उन्हाळी सुट्ट्या सुरू झाल्या असून, विद्यार्थ्यांनीही अखेरच्या दिवशी सुट्ट्या लागणार असल्याने आनंद व्यक्त केला.

### अशी घ्या काळजी

हायड्रेटेड राहा अर्थात उन्हाळ्याच्या दिवसांत भरपूर पाणी पिले पाहिजे. उन्हाळ्यात सूर्यप्रकाश जास्त असतो. त्यामुळे त्वचेला नुकसान होऊ शकते. म्हणून किमान सनस्क्रीन वापरावे. उष्माघात किंवा उष्णतेच्या थकव्याची लक्षणे दिसल्यास लगेच डॉक्टरांशी संपर्क साधा. उन्हाळ्यात पचायला सोपा आहार घ्या. जसे की फळे, भाज्या आणि दही. उन्हाळ्यात जास्त शारीरिक हालचाली केल्यास थकवा येऊ शकतो, त्यामुळे पुरेसा आराम आणि झोप घेणे आवश्यक आहे. मैदानी खेळ सकाळी लवकर किंवा दुपारच्या उशिरा खेळा. सुती आणि सैल कपडे परिधान करणे फायदेशीर ठरते. उन्हात फिरताना डोक्याला स्कार्फ किंवा टोपी नेहमी वापरली पाहिजे.

# जिल्हाधिकारी कार्यालयात आज सेवा हक्क दिन

**नाशिक : प्रतिनिधी**

'आपली सेवा-आमचे कर्तव्य' असे सांगणाऱ्या लोकसेवा हक्क कायद्याच्या अंमलबजावणीस सोमवारी (दि.२८) दहा वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्ताने २८ एप्रिल हा दिवस सेवा हक्क दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयात आज विविध कार्यक्रम करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा प्रशासनातर्फे देण्यात आली.

लोकसेवा हक्क कायद्यांतर्गत नाशिक विभागातील पाचही जिल्ह्यांत १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत विविध लोकसेवांसाठी एकूण ५५ लाख ४८ हजार ४८५ अर्ज प्राप्त झाले. ५१ लाख ३७ हजार ४७४ अर्ज निकाली काढण्यात आले. त्यापैकी ५० लाख ६८ हजार १३३ अर्ज निश्चित केलेल्या कालमर्यादेत निकाली काढण्यात आले. सेवांसाठी प्राप्त होणाऱ्या अर्जांची संख्या बघता नाशिक विभाग दुसऱ्या क्रमांकावर आहे, अशी माहिती लोकसेवा हक्क आयोगाच्या नाशिक विभागाच्या आयुक्त चित्रा कुलकर्णी यांनी दिली.

नागरिकांना दैनंदिन जीवनात विविध दाखल्यांची आवश्यकता असते. कधी पाल्याच्या शालेय, महाविद्यालयीन प्रवेशासाठी उत्पन्न, अधिवास, नॉन क्रिमिलेअर, राष्ट्रीयत्व, शेतकरी, विवाह नोंदणी, दिव्यांग दाखला, जन्म- मृत्यू नोंद दाखल्यासह विविध दाखल्यांची आवश्यकता असते. त्यासाठी नागरिकांना विविध शासकीय कार्यालयांमध्ये जावे लागते.

त्यात बराच कालावधी जातो, या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागरिकांना आवश्यक सेवा ऑनलाइन आणि विहित केलेल्या कालावधीत उपलब्ध व्हाव्यात म्हणून सन २०१५ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम लागू केला. या अधिनियमाची अंमलबजावणी २८ एप्रिल २०१५ पासून सुरू झाली. या कायद्यांतर्गत 'आपले सरकार' पोर्टलवर आतापर्यंत ३८ विभागांच्या ९६९ सेवा ऑनलाइन उपलब्ध झाल्या आहेत.

### २८ एप्रिलपासून सेवा पंधरवडा

२८ एप्रिल ते १२ मे २०२५ या कालावधीत सेवा पंधरवडा राबविण्यात येणार आहे. या कालावधीत प्रलंबित सर्व अर्जांचा मोहीम स्वरूपात निपटारा करणे अपेक्षित आहे.

# परशुराम प्रतिष्ठानतर्फे आज नाशकात शोभायात्रा

**नाशिक : प्रतिनिधी**

परशुराम प्रतिष्ठानतर्फे भगवान श्री परशुराम यांच्या जयंतीनिमित्त वैशाख शुद्ध प्रतिपदा, म्हणजेच सोमवार, दि. २८ रोजी श्रीमंत बाजीराव पेशवे या विषयावर मोहन शेटे इतिहास संशोधक यांचे जाहीर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. हे व्याख्यान संध्याकाळी ६ वाजता अखिल मध्यवर्ती ब्राह्मण संस्था, पी.एन.टी. कॉलनी, नाशिक येथे होणार आहे. दुसऱ्या दिवशी, म्हणजेच वैशाख शुद्ध द्वितीया, मंगळवार दि. २९ रोजी भगवान श्री परशुरामांची शोभायात्रा भद्रकाली मंदिर, नाशिक येथून सायंकाळी ५ वाजेपासून सुरू होणार आहे. या शोभायात्रेची सांगता श्री काळाराम मंदिरात श्रीराम-श्री परशुराम भेटीने होणार आहे.

या उपक्रमाचे हे १४ वे वर्ष असून, 'परशुराम प्रतिष्ठान, नाशिक' संस्थेच्या माध्यमातून प्रतिवर्षी गडकोट किल्ल्यांची स्वच्छता, वेदाध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप, व्याख्यानमालेद्वारे बौद्धिक व मौलिक व्याख्याने, तसेच विविध क्षेत्रांत नेत्रदीपक यश मिळवलेल्या ऋषीतुल्य यशस्वितांचा सन्मान, असे अनेक सामाजिक, शैक्षणिक व लोकहितार्थ उपक्रम राबवले जातात. नाशिककरांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन परशुराम प्रतिष्ठान, नाशिकतर्फे करण्यात आले आहे.

# लाडक्या बहिणींसाठी पावणेदोन लाख साड्या दाखल

## जिल्हाभरात होणार १७ हजार २०८ साड्यांचे वाटप

**नाशिक : प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील लाडक्या बहिणींना डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त साडी वाटप करण्याचे नियोजन करण्यात आले होते. मात्र, साड्या उशिराने पोहोचल्याने १४ एप्रिलनंतर या साड्यांचे वाटप सुरू करण्यात आले आहे. आतापर्यंत १० तालुक्यांत १७ हजार २०८ साड्यांचे वाटप पूर्ण झाले आहे. पंधरा तालुक्यांतील एक लाख ७६ हजार ९२४ लाडक्या बहिणींना साड्या वाटप करण्यासाठी पुरवठा विभागाकडे साड्या दाखल झाल्या आहेत.**

जिल्ह्यात अंत्योदय योजनेतील सुमारे १ लाख ७६ हजार ९२४ पात्र महिला शिधापत्रिकाधारकांना साड्या वाटप करण्याचे नियोजन शासनाकडून करण्यात आले आहे. त्यानुसार प्रतिकुटुंब एक साडी देण्यात येणार आहे. लाडक्या बहिणींना सणानिमित्त साडीचोळी वाटप करण्याचा रिवाज महायुती सरकारकडून सुरू करण्यात आला आहे. त्यानुसार आंबेडकर जयंतीनिमित्त जिल्ह्यातील या लाडक्या बहिणींना साडीवाटप केले जाणार आहे. जिल्ह्यातील बागलाण, चांदवड, दिंडोरी, नाशिक पुरवठा विभाग हद्द, मालेगाव, नांदगाव, निफाड, पेठ, सुरगाणा, त्र्यंबकेश्वर या दहा तालुक्यांत साड्यांचे काही प्रमाणात वाटप सुरू करण्यात आले आहे. पुढील महिनाभर साड्यांचे वाटप सुरू राहणार आहे. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या आदेशानुसार राज्यातील अंत्योदय शिधापत्रिकाधारक कुटुंबांना दरवर्षी प्रतिकुटुंब एक साडी मोफत वितरित करण्याबाबतच्या कॅप्टिव्ह मार्केट योजनेस मान्यता देण्यात आली आहे. योजनेसाठी महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाची नोडल संस्था म्हणून नेमणूक करण्यात आली असून, महामंडळाने सार्वजनिक वितरण व्यवस्था यंत्रणेकडील गोदामापर्यंत साड्यांचा पुरवठा केल्यानंतर तेथून अंत्योदय शिधापत्रिकाधारक कुटुंबापर्यंत साडी वाटप करण्याची व त्यावर देखरेख करण्याची जबाबदारी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाची राहणार आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत अंत्योदय योजनेच्या जिल्ह्यातील वय २१ ते ६५ वयोगटातील सुमारे १ लाख ७६ हजार ९२४ पात्र महिलांना आंबेडकर जयंतीनिमित्त साडी भेट देण्यात येणार आहे.



| दहा तालुक्यांतील अंत्योदय लाभार्थी | |
|---|---|
| बागलाण | ४२७४ |
| चांदवड | ५३६ |
| दिंडोरी | ७४७८ |
| नाशिक | ४३०८ |
| मालेगाव | २८ |
| नांदगाव | १५४ |
| निफाड | १५४ |
| पेठ | ३१ |
| सुरगाणा | १०२ |
| त्र्यंबकेश्वर | ०३ |

अग्रलेख

# पाकिस्तान्यांवर संकट

सहा वर्षापूर्वी दहशतवाद्यांनी पुलवामा येथे केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या ताफ्यावर हल्ला केला होता. त्यावेळी ४० जवान शहीद झाले होते. या हल्ल्यानंतर प्रत्युत्तर म्हणून भारताने पाकिस्तानातील दहशतवादी संघटनांच्या तळांवर हल्ले केले. ही कारवाई 'सर्जिकल स्ट्राईक' म्हणून ओळखली गेली. त्यावेळी हल्ले करताना सामान्य नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही, याची दक्षता घेण्यात आली होती. तसेच पाकिस्तानी लष्करालाही डिवचण्यात आले नव्हते. पुलवामानंतर पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २६ जण ठार झाले. या हल्ल्याचा जगभर निषेध झाला. जगाने भारताविषयी सहानुभूती दर्शविल्याने पाकिस्तान 'वेगळा' पडला आहे. पहलगाममधील हल्ल्याला उत्तर म्हणून भारताने राजनैतिक निर्णय घेतल्याचा परिणाम सामान्य पाकिस्तानातील सामान्य नागरिकांवर होऊ लागला आहे. इतकेच नव्हे, तर भारताकडून केव्हाही हल्ला होण्याची शक्यता असल्याने पाकिस्तान सरकार आणि लष्कर सावध झाले आहे. भारताच्या राजनैतिक निर्णयांना पाकिस्ताननेही प्रत्युत्तर दिले आहे. भारताने सिंधू पाणी कराराला स्थगिती दिली, तर पाकिस्तानने सिमला शांतता कराराला स्थगिती दिली. भारताने पाकिस्तान नागरिकांना देश सोडण्यास सांगितले, तर पाकिस्ताननेही भारतीय नागरिकांना देश सोडण्यास सांगितले. थोडक्यात, 'जशास तसे' वागण्याची भूमिका घेण्यात आली आहे. भारत-पाकिस्तान व्यापार थंडावला असल्याचा परिणाम दोन्ही देशांच्या लोकांवर होत असला, तरी त्याची तीव्रता पाकिस्तानात अधिक आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारत अशी भूमिका घेऊन पाकिस्तान आणि त्या देशाच्या नागरिकांची कोंडी करेल, याचा विचारही कोणी केला नसेल. पाकिस्तानी नागरिकांनीही केला नसेल. पण, आता भारताने घेतलेल्या भूमिकेमुळे पाकिस्तानी नागरिकांचे हाल होण्यास सुरूवात झाली आहे. यातून दहशतवादी हल्ल्यांचे परिणाम थेट जेव्हा सामान्य नागरिकांना सोसावे लागतात तेव्हा त्यांची दहशतवादाच्या विरोधात मानसिकता तयार होत असते. पहलगाममध्ये पाकिस्तान सरकारच्या मदतीने हल्ला झाला नसता, तर आज ही वेळ आली नसती, असे त्या देशातील नागरिकांना म्हणणे भाग पडले आहे. दुसरीकडे पाकिस्तान सरकारची चांगलीच धावपळ उडत आहे. सिंधू पाणी करार स्थगित करण्यात आल्याची झळ बसू लागली आहे. करार स्थगित करण्यात आल्यानंतर पाकिस्तानने याला 'जलयुध्द' म्हटले आहे, तर भारताने पाकिस्तानविरुध्द 'जल दहशतवाद' पुकारला असल्याचेही त्या देशातील सरकार म्हणत आहे. काहीही असले, पाकिस्तानला चांगलाच धडा शिकविण्याचा निर्धार भारत सरकारने केल्याचे दिसून येत आहे. करार स्थगित करण्यात आल्यानंतर भारताने पाकव्याप्त काश्मीरमधील झेलम नदीत पाणी सोडल्याने पूर आला आहे. या पुराने सरकार आणि झेलमच्या काठावर असलेल्या लोकांची चांगलीच धावपळ उडाली आहे. भारताने शनिवारी झेलम नदीच्या पाणी पातळीत अचानक वाढ केली आणि यामुळे पाकव्याप्त काश्मीरमध्ये दहशत निर्माण झाली. भारताने कोणतीही पूर्वसूचना न देता उरी धरणातून पाणी सोडल्यानंतर आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली. लोकांना सुरक्षित स्थळी पळून जावे लागले. पाकव्याप्त काश्मीरची राजधानी मुजफ्फराबाद आणि चकोटी भागात स्थानिक प्रशासनाकडून लाऊडस्पीकरवर उन नदीची पाणी पातळी झपाट्याने वाढल्याचा इशारा द्यावा लागला. लोकांना आपली घरे सोडून जावे लागले आणि घरे रिकामी करावी लागली. जनावरे आणि पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. सिंधू करार स्थगितीचे परिणाम लगेच दिसून येणार नसले, तरी येत्या काही दिवसांत ते दिसून येतील. भारत आणि पाकिस्तान यांच्यात सिंधू करारावर १९ सप्टेंबर १९६० रोजी स्वाक्षरी झाली होती. या करारानुसार पाकिस्तानला सिंधू, झेलम आणि चिनाब या नद्यांचे पाणी मिळते. ते तेथील शेतीसाठी अत्यंत महत्वाचे आहे. सिंधू आणि तिच्या उपनद्यांचे ८० टक्के पाणी मिळत असल्यामुळे हा करार त्या देशासाठी अत्यंत फायद्याचा आहे. पंजाब आणि सिंध हे तुलनेने प्रगत प्रांत असून, सिंचनासाठी आणि पिण्याच्या पाण्यासाठी येथील जनता याच पाण्यावर अवलंबून आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार पाकिस्तानला कृषी क्षेत्रातून २३ टक्के उत्पन्न मिळते आणि देशातील ६८ टक्के लोकांचा उदरनिर्वाह याच क्षेत्रावर अवलंबून आहे. भारताने पाणी थांबविले किंवा कमी केले, तर त्याचा थेट परिणाम पाकिस्तानच्या एवढ्या जनतेवर होणार आहे. त्यांच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या कृषी क्षेत्राला जी त्यांच्या त्याला अभूतपूर्व फटका असेल. पाणी मिळालेच नाही किंवा कमी मिळाले तर शेतीचे उत्पादन घटणार हे स्पष्ट आहे. अगोदरच महागाईने बेजार झालेल्या आणि कर्जबाजारी झालेल्या पाकिस्तानला आपली भूक भागवणे जिकरीचे होणार आहे. पाकिस्तानची सध्याची आर्थिक स्थिती फार चांगली नाही. विविध देशांच्या मदतीने हा देश आपला डोलारा कसाबसा सांभाळत आहे. बेरोजगारीची समस्या तेथेही आहे. राजकीय अस्थैर्य आहे. इम्रान खान या माजी पंतप्रधानांच्या अटकेनंतर तेथे सरकार आणि विरोधक शत्रू असल्यासारखेच वावरताना दिसत आहेत. दहशतवादाला पायबंद घालण्यासाठी भारताने केवळ राजनैतिक उपाय योजले आहेत. सर्जिकल स्ट्राईक आणि लष्करी कारवाईचे पर्याय खुले आहेत. नेहमीच युध्दाची भाषा करणाऱ्या पाकिस्तानला युध्द कदापि, परवडणार नाही, हे तेथील सरकार आणि राजकीय नेते जाणून आहेत. यदाकदाचित युध्द झालेच, तर आंतरराष्ट्रीय पातळीवर पाकिस्तानच्या मदतीला चीन सोडून कोणी येण्याची अजिबात शक्यता नाही. भारताकडून कधीही आणि कोणतीही कारवाई होण्याची शक्यता पाकिस्तानने गृहीत धरली आहेच. पण, पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानकडून भारतावर लष्करी आगळीक होण्याची शक्यता फारच कमी आहे. पाकिस्तानने लष्करी कारवाई केली, तर जगभरातून त्याचा निषेधच होईल. पाकिस्तानात जशी राजकीय अस्थिरता आहे तशी भारतात नाही. सर्वपक्षीय बैठकीत सर्व विरोधकांनी भारत सरकारला दहशतवादाविरोधात कारवाई करण्यास एकमुखी पाठिंबा दिला आहे. देशहित लक्षात घेऊन भारतातील सर्वच पक्ष सरकारच्या पाठीशी उभे राहिलेले आहेत. तशी ती परंपरा आहे. पाकिस्तानात लष्कर सरकारचे ऐकेलच याची काही हमी नसते. पाकिस्तानचे लष्कर जबाबदारी न घेता केवळ अधिकार गाजवण्यातच धन्यता मानते. लष्कराला सत्ता ताब्यात घेण्यात जास्त रस असतो. अशा परिस्थितीत त्या देशाची स्थिती आज नाजूक आहे. दहशतवादाला पाठिंबा दिल्याने पाकिस्तानी नागरिकांसमोर जगण्यामरण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. यातून तेथील सरकार काही बोध घेणार आहे की नाही? हाच प्रश्न असला, तरी दहशतवादाच्या विरोधात उभे राहण्याची वेळ तेथील नागरिकांवरही आली आहे.

# आतंकवादी हल्ल्यानंतर आपण बोध घेतो का?

पहलगाम येथील आतंकवादी हल्ल्यानंतर देशभरातील जनता पेटून उठली असून, आतंकवादाविरोधी नरमाईची भूमिका आता पुरे, आतंकवादाच्या उच्चाटनासाठी आतंकवादाची जन्मभूमी असलेल्या पाकिस्तानला कायमचा धडा शिकवावा, अशी मागणी एकमुखाने केली जात आहे. या हल्ल्याचा देशाच्या कानाकोपऱ्यातून निषेध केला जात असून, या घटनेवरून राजकारणही तापले आहे. या सर्वांचा परिणाम सत्तेवर असलेल्या सरकारवर झाला असून, या घटनेनंतर माननीय पंतप्रधानांनीही या हल्ल्यास जबाबदार असलेल्या कोणालाही सोडणार नसल्याचे सांगितले आहे. काही ठोस निर्णयही घेण्यात आले असून, भारतात आलेल्या पाकिस्तानी नागरिकांना देश सोडून जाण्याचा आदेश केंद्र सरकारने दिला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सर्व राज्यांना याविषयीचे निर्देश दिले आहेत.

यानुसार कार्यवाही करताना महाराष्ट्रात पाकिस्तानी नागरिकांची यादी तयार करण्यात आली आहे. पाकिस्तानी नागरिकांना तत्परतेने देश सोडून निघून जाण्यास सांगण्यात आले आहे. अंतर्गत सुरक्षा यंत्रणाही त्यासाठी कामाला लागली असून, देशासह राज्यात पाकिस्तानी नागरिकांचा शोध घेत असताना धक्कादायक वास्तव समोर आले आहे.

गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी एका वृत्तवाहिनीला माहिती देताना म्हटले आहे की, महाराष्ट्रातील ४८ शहरांमध्ये तब्बल ५ हजार २३ पाकिस्तानी नागरिक आहेत. ज्यांच्यापैकी केवळ ५१ जणांकडेच वैध कागदपत्रे आढळली आहेत. याचा अर्थ ४ हजार ९७२ पाकिस्तानी महाराष्ट्रात अवैधरीत्या वास्तव्य करीत आहेत. त्याहून धक्कादायक प्रकार म्हणजे यांपैकी १०७ पाकिस्तानी गायब आहेत. पोलिसांनी जागोजागी शोध घेऊनही ते सापडलेले नाहीत. ही केवळ अधिकृत माहिती असून, प्रत्यक्ष आकडा याहून भयावह असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

अधिकृत आकडेवारीचा जरी विचार केला तरी १०७ ही आकडेवारी कमी नाही. हे १०७ पाकिस्तानी राज्यात कोणकोणत्या ठिकाणी विखुरले आहेत? त्यांना कोणी आश्रय दिला आहे? येणाऱ्या काळात राज्यात मोठी आतंकवादी कारवाई करण्याची सिद्धता तर ते करत नाहीत ना याविषयी कोणतीच माहिती सरकारकडे आज उपलब्ध नाही. योगेश कदम म्हणाले, "व्हिसा कालावधी संपलेल्या पाकिस्तानी नागरिकांशी भारतीय यंत्रणा संपर्क साधून त्यांना पुन्हा त्यांच्या मायदेशी पाठवणार आहे; पण त्यांच्याशी कोणताही संपर्क होत नाही. सध्या 'सार्क व्हिसा' आणि 'शॉर्टटाइम व्हिसा' यांवर आलेल्या पाकिस्तानी नागरिकांना २८ एप्रिलपर्यंत भारत सोडण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. वैद्यकीय उपचारांसाठी आलेल्या नागरिकांना आणखी २ दिवस वाढवून देण्यात आले आहेत. त्यांना ३० एप्रिलपर्यंत भारत सोडावा लागणार आहे.



जगाच्या पाठीवरील लहान लहान देशांमध्येही व्हिसाचा कालावधी संपताच तेथील पोलीस बाहेरून आलेल्या नागरिकांचा शोध घेत त्यांच्यापर्यंत पोहोचतात. व्हिसाशिवाय देशात राहणे हा गंभीर अपराध असून, अशा बाहेरील नागरिकांना ते अक्षरशः गुन्हेगाराप्रमाणे वागणूक देतात. राज्याच्या गृहमंत्र्यांनी दिलेल्या वरील माहितीवरून भारतातील ही यंत्रणा किती कुचकामी आहे याची कल्पना येते.

देशाच्या स्वातंत्र्यानंतर पाकिस्तान हे भारताचे नेहमीच पहिल्या क्रमांकाचे शत्रूराष्ट्र राहिले

**जगन घाणेकर**
**९६६४५५९७८०**

आहे. आजतागायत भारतात जे आतंकवादी हल्ले झाले. त्यातील बहुतांश पाकपुरस्कृत होते हे सर्वांनाच ज्ञात आहे. असे असताना शत्रूराष्ट्रातील थोडेथोडके नव्हे तर सुमारे पाच हजार नागरिक भारतात अपुऱ्या कागदपत्रांविना येतातच कसे? हा आकडा केवळ महाराष्ट्रात वास्तव्य करणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांचा आहे. देशभरातील ही आकडेवारी याहून कितीतरी भयावह असू शकते. ज्यांचा व्हिसा कालावधी संपला आहे, अशांशी संपर्क होत नसल्याचे गृहराज्यमंत्री सांगत आहेत. मग अशांशी पोलीस यंत्रणा संपर्क तरी कशी करणार आणि त्यांना शोधून मायदेशी कशी पाठवणार?

आजतागायत देशात कितीतरी आतंकवादी हल्ले झाले. या हल्ल्यात हजारो निरापराध नागरिकांचे बळी गेले तर हजारो निष्पाप नागरिक कायमचे जायबंदी झाले. कित्येकांचे संसार उद्ध्वस्त झाले, कित्येकांच्या मनावर या आतंकवादी हल्ल्यांचे भयंकर परिणाम कायमस्वरूपी कोरले गेले. देशाच्या मालमत्तेची अब्जावधी रुपयांची हानी झाली. पहलगाम येथे नुकताच झालेला आतंकवादी हल्ला भारताच्या अंतर्गत सुरक्षा व्यवस्थेला आव्हान देणारा होता. केवळ हिंदू आहेत म्हणून २६ निरापराध हिंदूंची गोळ्या घालून हत्या करण्यात आली. आतंकवादाला धर्म नसतो हे नॅरेटिव्ह आजतागायत लोकांच्या मनावर बिंबवले होते; मात्र या हल्ल्यानंतर या खोट्या नॅरेटिव्हचा पर्दाफाश झाला आहे.

पुलवामा हल्ल्यानंतर केंद्र सरकारने जी कठोर भूमिका घेतली होती, त्यानंतर यापुढे असे हल्ले होणार नाहीत, असा भाबडा विश्वास जनतेमध्ये निर्माण झाला होता; मात्र या विश्वासाला पहलगाम हल्ल्याने तडा गेला आहे. राज्याच्या गृहराज्यमंत्र्यांनी दिलेल्या उपरोक्त माहितीवरून पुलवामा हल्ल्यानंतरही भारताने धडा घेतलाच नसल्याचे दिसून येते. पहलगाम हल्ल्याच्या निमित्ताने देशभरात पाकिस्तानी नागरिकांचा शोध सुरू झाला आणि भयावह माहिती समोर आली. हा हल्ला झाला नसता. सुरक्षा यंत्रणांनी पाकिस्तानी नागरिकांचा शोध कदाचित घेतलाही नसता. किमान आतातरी सुरक्षा यंत्रणा सजग झाली आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात त्यादृष्टीने सरकार उपाययोजना करेलसुद्धा; मात्र सध्याची स्थिती पाहता राज्याची सुरक्षा व्यवस्था रामभरोसे आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

# माझी बुद्धिमत्ता : माझी मालमत्ता!

जसे सोने, दागिने, मालमत्ता ही जशी संपत्ती असते, त्याचप्रमाणे स्वतःची बुद्धिमत्ता हीदेखील संपत्ती म्हणून ओळखली जाते. त्या संपत्तीचेही संरक्षण, संवर्धन आणि उपयोजन नीटपणे केले पाहिजे. जागतिक बौद्धिक संपदा दिवस दरवर्षी २६ एप्रिल रोजी पेटंट, कॉपीराइट आणि ट्रेडमार्कबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी साजरा केला जातो.

जागतिक बौद्धिक संपदा संघटना- डब्ल्यूआईपीओद्वारे सन २००० साली या दिवसाची स्थापना करण्यात आली. जागतिक बौद्धिक संपदा दिवस आम्हाला कल्पकता आणि सर्जनशीलता साजरे करण्यास मदत करतो, ज्यामुळे आम्हाला आमच्या जगासाठी निर्माते आणि शोधकांनी केलेले योगदान माहिती होतात. या दिनानिमित्त जगभरात अनेक कार्यक्रम आयोजित केले जातात. याकडे वेगवेगळ्या प्रकारे पाहिले जाते. कारण लोकांमध्ये भिन्न बौद्धिक गुण असतात, जे त्यांच्यासाठी महत्त्वाचे असतात. हे कार्यक्रम सर्व प्रकारचे मूळ कार्य प्रदर्शित करतात, जे पुढील पिढीला विचार करण्यास आणि तयार करण्यास प्रेरित करतात. सर्जनशीलता ही अशी शक्ती आहे, जी समाजाच्या आधुनिकीकरण आणि विकासाकडे नेणारी आहे. नवकल्पनांमुळे आपले जीवन सोपे आणि अधिक आरामदायक बनते.

बौद्धिक संपदा दिनानिमित्त वाङ्मयचौर्याच्या इतिहासाविषयी काही गोष्टी जाणून घेऊया. वाङ्मयचौर्य म्हणजेच प्लॅजेरिझम होय. प्लॅजेरिझम हा शब्द प्रथमतः पहिल्या शतकामध्ये आलेला आढळतो. मूळ लॅटिन असणारा प्लेजिअरिअस हा शब्द आहे. याचा अर्थ अपहरणकर्ता असा होतो. एखाद्याच्या सृजनात्मक कामाचे अपहरण करणे म्हणजे प्लॅजेरिझम होय. प्लेजिअम म्हणजे चोरी करणे. इंडो-युरोपियन भाषांमध्ये प्लेजचा अर्थ जाळे किंवा सापळा असा होतो. एखाद्याला नकळतपणे जाळ्यात पकडले जाते. या अर्थाने प्लेजिअरिअस हे परिष्कृत रूप बनले गेले आणि तसे करण्याची वहिवाट म्हणून प्लेजिअरिझम ही संज्ञा आली असावी. ग्रीक, लॅटिननंतर १६०१ साली बेन जॉन्सन या नाटककार-समीक्षकाने साहित्यचोराला उद्देशून प्लेजिअरी हा शब्द उपयोगात आणला. इंग्रजीमध्ये प्लेजिअरिझम ही संज्ञा सन १६२०च्या दरम्यान स्वीकारण्यात आली. सॅम्यूएल जॉन्सनने त्याच्या सन १७५५ साली प्रकाशित झालेल्या शब्दकोशात प्लेजिअरीच्या अ थीफ इन लिटरेचर, वन हू स्टील्स दी थॉट्स ऑर रॉइटिंग्ज ऑफ अनादर, दी क्राइम ऑफ लिटररी थीफ्ट अशा व्याख्या दिल्या आहेत. ऑक्सफर्ड शब्दकोशात लॅटिन प्लेजिअरिअस हा शब्द सतराव्या शतकाच्या पूर्वार्धात आल्याचे म्हटले आहे.

बौद्धिक संपदा म्हणजे काय? तर बौद्धिक संपदा- आईपी मनाच्या निर्मितीचा संदर्भ देते, जसे की आविष्कार, साहित्यिक आणि कलात्मक कामे, रचना आणि वाणिज्यमध्ये वापरलेली

**कृष्णकुमार निकोडे**
**७७७५०४१०८६**

चिन्हे, नावे आणि प्रतिमा आईपी कायद्यामध्ये संरक्षित आहेत. उदाहरणार्थ, पेटंट, कॉपीराइट आणि ट्रेडमार्क, जे लोकांना त्यांनी जे काही शोध लावले किंवा तयार केले त्यापासून मान्यता किंवा आर्थिक लाभ मिळवण्यास सक्षम करते. नवोन्मेषकांचे हित आणि व्यापक सार्वजनिक हित यांच्यातील योग्य संतुलन साधून, सर्जनशीलता आणि नावीन्यपूर्णता वाढू शकेल अशा वातावरणाला प्रोत्साहन देण्याचे आईपी शासनाचे उद्दिष्ट आहे. जागतिक बौद्धिक संपदा संघटना ही जागतिक बौद्धिक संपदा दिन स्थापन करण्यासाठी जबाबदार असलेली संस्था आहे. संस्था बौद्धिक संपदा धोरण, सेवा आणि सहकार्यासाठी जागतिक मंच म्हणून काम करते. डब्ल्यूआईपीओ ही १९३ सदस्य राष्ट्रांसह स्व-वित्तपुरवठा करणारी संयुक्त राष्ट्रांची संस्था आहे. नॅशनल अल्जेरियन इंडस्ट्रियल प्रॉपर्टी इन्स्टिट्यूट- आईएनएपीआईच्या महासंचालकांनी जागतिक बौद्धिक संपदा दिवसाची स्थापना सुरू केली. हा दिवस कॉपीराइट, ट्रेडमार्क आणि पेटंटबद्दल जागरूकता निर्माण करतो. हे कायदे आणि नोंदणी आहेत जे निर्माते आणि नवोदितांच्या मूळ कार्याचे संरक्षण करतात. यामध्ये लेखक, कलाकार, शोधक आणि ब्रँड यांचा समावेश असू शकतो, जे निर्मात्यांना त्यांच्या कामाचे अधिकार आहेत, याची खात्री करण्यात मदत करतात. बौद्धिक संपदा नियम अधिक विकासास प्रोत्साहन देतात. मूळ कामाची पायरसी रोखण्यासाठी, निर्मात्यांना त्यांच्या आविष्कारांची पूर्ण मालकी असावी, या कल्पनेला चालना देण्यासाठी बौद्धिक संपदा नियम असणे महत्त्वाचे आहे. बौद्धिक मालमत्तेची चोरी युनायटेड स्टेट्समध्ये दरवर्षी सुमारे २२५ अब्ज ते ६०० अब्ज खर्च करते. हे नियम निर्माते आणि देशाचे आर्थिक नुकसान होण्यापासून संरक्षण करण्यात मदत करतात.

# पैशापेक्षा माणसे महत्त्वाची

आजकाल समाजात एक वेगळेच वातावरण निर्माण झाले आहे. लोक पैशासाठी व संपत्तीसाठी माणुसकीला लाथाडून झटपट श्रीमंत होण्याचे स्वप्न पाहत आहेत. म्हणूनच की काय? हल्ली समाजात व गावात झटपट श्रीमंत होण्याची स्पर्धा सुरू झाली आहे. कारण आजकालची बहुतांश माणसे पैशाच्या मागे बेभानपणे धावताना दिसत आहेत. सारखा पैसा पैसा करून स्वतःला दुःखाच्या खाईत

**बुद्धभूषण कांबळे**
**७४९८७१५६६१**

लोटत आहेत. भरपूर पैसा व संपत्तीच्या हव्यासापायी सख्ख्या भावाचा पक्का वैरी बनून काटा काढत आहेत.

स्वतःच्या आईवडिलांना पैशाच्या मोहापायी घराबाहेर काढून वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवत आहेत. म्हणजे त्यांना पैशापुढे आपले आईवडील, आपली माणसे, जवळचा मित्रपरिवार, नातेवाईक व समाजबांधव यांचे काहीही देणे-घेणे राहिलेले नाही. त्यांना फक्त पैसा आणि पैसाच सर्वस्व वाटत आहे. पैशापुढे त्यांना सर्व गोष्टी तुच्छ वाटत आहेत. आणि पैसा म्हणजे त्यांना सर्वांत जवळचा व प्रिय वाटत आहे. म्हणून ते अहोरात्र पैशाच्या मागे धावताना दिसतात. पैशासाठी व संपत्तीसाठी माणुसकीला लाथाडून जवळची माणसे दूर करतात. आणि पैशापुढे लोटांगण घालून पैशाला सर्वस्व मानतात. पण इथे पैशापेक्षा माणसे व माणुसकी फार महत्त्वाची असते. हे आपल्याला कधी कळणार आहे? आयुष्यात गेलेला पैसा व संपत्ती कधीही मिळवता येईल. पण आयुष्यातून एकदा गेलेला माणूस परत कधीच मिळवता येत नाही. म्हणून इथे माणसाला व माणुसकीला फार महत्त्व आहे. म्हणून प्रत्येकाने माणूस व माणुसकी जपणे फार गरजेचे आहे. कारण आजकाल बहुतांश लोकांना पैशाच्या अति-मोहापायी आपल्यातील माणुसकी रसातळाला जाऊन लोप पावत आहे, हे पण कळत नाही. फक्त पैसा मिळवून झटपट श्रीमंत होणे हेच त्यांचे जीवन ध्येय बनले आहे. म्हणूनच या नादात माणुसकी लयाला जाऊन फक्त नावालाच शिल्लक राहिली आहे. कारण पैशाच्या व संपत्तीच्या हव्यासापोटी सख्खे भाऊ पक्के वैरी बनून कोर्ट कचेरीच्या पायऱ्या चढत आहेत. आजही मानवतावादी महापुरुषांना लोकांच्या मनामध्ये आदराचे अढळ स्थान आहे. म्हणून आपणही या महापुरुषांचा आदर्श घेऊन मानवतावादी जीवन जगावे. आणि पैशापेक्षा माणुसकीला महत्त्व देऊन समाजात मानवता रुजवावी.

# रस्ते अपघातात दररोज ४६ मृत्यू; चिंताजनक बाब

चालू वर्षाच्या तीन महिन्यांत राज्यात रस्ते अपघातात दररोज ४६ मृत्यू होत आहेत, ही बातमी नुकतीच वाचली. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा चार टक्क्यांची वाढ झालेली आहे. विशेष म्हणजे, सर्वाधिक मृत्यू हे वेगात वाहन चालविल्यामुळे होत आहेत. याबरोबरच राज्यात अपघातात जखमींमध्ये सुमारे ८ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. सर्वाधिक अपघात हे वाहतूक नियमांचे भंग केल्यामुळे झालेले आहेत. अतिवेग हे त्यातील एक महत्त्वाचे कारण आहे. घाटातील उतारावर गाडी चालक वाहन बंद करून नेतात. अनेकदा ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नातसुद्धा मोठ्या प्रमाणावर अपघातास आमंत्रण दिल्यासारखे आहे. अलीकडे मोबाइल चालवत वाहन चालविणारांचे प्रमाण खूपच जास्त होत चालले आहे तसेच टायरमध्ये हवेचा दाब योग्य प्रमाणात नसणे हेसुद्धा अपघाताला एक कारण ठरू शकते. एकूणच हे अपघात कमी करण्यासाठी वाहनचालकांनी प्रयत्न करण्याची जरुरी आहे. दिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढतच आहे. अशा वेळी नियमांचे पालन करणे ही आवश्यक बाब आहे. वेगावर नियंत्रण ही सुद्धा आवश्यक बाब आहे. सरकारनेसुद्धा यावर कडक कायदे केले पाहिजेत व मोठ्या प्रमाणात दंड आकारणी केली पाहिजे. तरच या अपघाताला आळा बसेल

**- शांताराम वाघ, पुणे**

## प्रशासकीय आस्थापनांत दोन लाख रिक्त पदे?

देशात सुशिक्षित बेरोजगारांची संख्या वाढत आहे, तशीच ती महाराष्ट्रातही वाढत आहे. यावर उपाय म्हणून राज्य शासनाने कौशल्य विकास विभागामार्फत प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे जाहीर केले. राज्यात सुशिक्षित आणि उच्चविद्याभूषित अशा २९,२९,६४१ तरुण रोजगारीच्या संधीसाठी नोंदणी केली. जळगाव, नागपूर, संभाजीनगर, यवतमाळ जिल्ह्यांतून प्रत्येकी दीड लाखांहून अधिक तरुण तर बुलढाणा, पुणे, नाशिक, अमरावती या प्रत्येक जिल्ह्यांतून एक लाख ते दीड लाखादरम्यान तरुणांनी रोजगारासाठी नावे नोंदविली होती. राज्याच्या आर्थिक पाहणी विभाग आणि सर्वंकोश माहिती

**जनमनाचे प्रतिध्वनी**

कोशातून राज्याच्या विविध आस्थापनांमध्ये सुमारे २ लाख ४५ हजारांहून अधिक पदे रिक्त असल्याची माहिती समोर आली आहे. राज्य सरकारच्या कार्यालयांत कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे जनहिताची कामे रखडली जात आहेत, एकाच कामासाठी लोकांना सरकारी कार्यालयांत अनेकवेळा फेऱ्या माराव्या लागतात तरीही कामे पूर्ण होत नाहीत. सरकारनेच रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याचे जाहीर केले होते. मग अर्ज केलेल्या उमेदवारांपैकी पात्र ठरलेल्या उमेदवारांना प्रशासकीय सेवांमध्ये रुजू करून का घेतले जात नाही, हा प्रश्न आहे.

**- स्नेहा राज, गोरेगाव**

## वाढते तापमान जीवसृष्टीला धोका

हिमनद्या वितळत असून, वाढता कचरा व वाढते तापमान यामुळे दुर्मिळ वनस्पती नष्ट होत आहेत. तेव्हा यासंदर्भात या ठिकाणी योग्य उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. अनेक ठिकाणी जमीन खचत असताना व दरडी कोसळण्याचे प्रकार वाढताना निसर्गाचे व पर्यावरणाचे संरक्षण महत्त्वाचे आहे. हिमाचल प्रदेश, उत्तराखंड भागात अनेक शहरांत जमीन खचण्याचे प्रकार पर्यावरण धोक्यात आल्याचे संकेत देत आहेत. **- प्रफुल्लचंद्र काळे**

# तळमळ लागली म्हणजे संत भेटतो



विचारधन

असंताची आवड नाहीशी होईल तेव्हाच संत हवासा वाटेल. विषय आपल्याला त्रास देतात, पण ते सोडावे कसे हे समजत नाही. जंगलात सापडलेल्या माणसाप्रमाणे आपले झाले आहे. आपली वाट चुकली आहे असे ज्याला वाटेल तोच जंगलातून बाहेर पडण्याची वाट विचारतो. 'आता वय फार झाले, काळाच्या स्वाधीन होण्याची वेळ आली, रामा तूच आता तार, अशी तळमळ लागली तरच संतसहवास लाभेल. सत्संगत हवी असे आपण म्हणतो खरे, पण मागतो मात्र 'असत'; मग सत्संगत कशी मिळेल? स्वत:ला कसे विसरावे हे कळण्याकरिताच संताला शरण जावे. विस्मरण म्हणजे भगवंताचे स्मरण. वडील दूर आहेत, त्यांचे पत्र नाही, म्हणून काळजी करतो; पण जन्मापासून भगवंत दूर आहे, त्याची तळमळ का लागू नये? आपण नामस्मरण करतो, पण ज्याचे नाम घेतो तो कोण, असा विचार करतो का? विषय सोडल्याशिवाय राम कसा भेटणार? रामही हवा आणि विषयही हवा, हे जुळणार कसे? मला जोपर्यंत चिमटा घेतलेला कळतो तोपर्यंत कर्ममार्गानेच जाणे जरूर आहे. कर्ममार्ग सांभाळताना, 'कर्ता मी नव्हे' ही भावना सांभाळणे जरूर आहे. जो खरा अनुभवी आहे तो बोलणारच नाही, आणि बोललाच तर तो अगदी थोडे बोलेल; तो उत्तम होय. संत जे काही बोलतील ते जगाच्या कल्याणाकरिताच असते. संत नि:स्वार्थी असतात. ते तळमळीने सांगतात. त्यावर श्रद्धा ठेवली पाहिजे. संतांच्या सांगण्याचा खरा अर्थ आचरणानेच कळेल.

गांवकरी® ('गांवकरी प्रकाशन'चे व्यापारचिन्ह) गांवकरी प्रकाशन
संस्थापक संपादक : स्व. द.शं. तथा दादासाहेब पोतनीस
संपादक, मुद्रक, प्रकाशक : वंदन अ. पोतनीस
मुख्य कार्यालय :'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक-४२२००१. फोन : २३०५०८०, २३०५०८१, २३०५०८२, २५९४५४६
विभागीय कार्यालये :
सिन्नर : हिरालाल टॉवर्स, बसस्टँडजवळ. ०२५५१-२२२५७८.
मालेगाव : पांजरापोळ शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवाजी पुतळा. २५५४-२३४२००
दिंडोरी : गाळा नं. २५, मार्केट कमिटीजवळ, निळवंडी रोड. ०२५५७-२२२५५५.
'गांवकरी प्रकाशन'साठी 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक येथे मुद्रित व प्रकाशित.
e-mail Id :-
1. gavmaha123@gmail.com
2. advtgvk@rediffmail.com
RNI REG. No.1934/57

बाजार - कंपन्या - मनोरंजन



## द बॉडी शॉप इंडियाने किमतीत धोरणात्मक घट केली

**मुंबई :** द बॉडी शॉप इंडियाने भारतातील त्यांच्या १२ सर्वांत लोकप्रिय उत्पादन फॉर्मेट्समध्ये किमतीत धोरणात्मक घट केली आहे. नवीन, अधिक लक्षवेधक एण्ट्री पॉइण्ट्सवर सुरू होणाऱ्या किमतींसह हा उपक्रम द बॉडी शॉपच्या विश्वामध्ये अधिकाधिक ग्राहकांचे स्वागत करण्यासाठी डिझाइन करण्यात आला आहे. नवीन धोरणामधून भारतातील ग्राहकांना आनंदित करण्यासोबत त्यांच्या प्राधान्यक्रमांना प्रतिसाद देण्याप्रती आणि ब्युटी क्षेत्रात अग्रस्थानी राहण्याप्रती ब्रँडची कटिबद्धता दिसून येते. या लाँचला पाठिंबा देण्यासाठी द बॉडी शॉप इंडियाने आपली 'मोअर लव्ह फॉर लेस' मोहीम सुरू केली आहे, जी नवीन किमतीसंदर्भात सर्व वयोगटांमधील ग्राहकांचे प्रेम, आनंद आणि उत्साहाला प्रकाशझोतात आणते. डिजिटल फर्स्ट दृष्टिकोनासह मुख्य थीम 'मोअर लव्ह फॉर लेस'चे सर्जनशील दिग्दर्शनासह शूटिंग करण्यात आले आहे, ज्यामधून भारतातील ग्राहकांची विविधता दिसून येते. ही मोहिम ग्राहकांच्या अविरत आनंदाला साजरे करते. या मोहिमेमधून ग्राहकांच्या परिवर्तनाचा अवलंब करण्याच्या, ट्रेण्ड्सचे अनुकरण करण्याच्या, साठा करण्याच्या, मोठ्या प्रमाणात गिफ्ट करण्याच्या आणि त्यांना आवडणाऱ्या प्रथांचा पुन्हा शोध घेण्याच्या पद्धतींना निदर्शनास आणते. कथानक भावनिकदृष्ट्या संलग्न आहे, जेथे सर्व वयोगटांमधील नायक कथानकामध्ये सामील होतात. आकर्षक दरांमध्ये तेच संपन्न घटक आणि विश्वसनीय सूत्रीकरण देत द बॉडी शॉप दाखवत आहे की ते काळजी घेतात. या धोरणात्मक परिवर्तनासह द बॉडी शॉप उत्पादनांना अर्थपूर्णपणे उपलब्ध करून देत आहेत, ज्यावर ग्राहकांचा प्रेम व विश्वास आहे. हे हंगामी किंवा प्रतिक्रियात्मक परिवर्तन नाही, तर त्यामधून ओम्नी-चॅनेल स्तरावर द बॉडी शॉपचा दीर्घकालीन दृष्टिकोन दिसून येतो. प्रवेशासंदर्भातील मर्यादा कमी करण्यासह नैतिक सोर्सिंग, दर्जात्मक बेंचमार्क्स व ब्रँड तत्त्व कायम राखत द बॉडी शॉप भारतातील डायनॅमिक व स्पर्धात्मक ब्युटी क्षेत्रात शाश्वत विकास आणि निष्ठेसाठी प्रबळ पाया रचत आहे.

## 'माझी प्रारतना'चं हृदयस्पर्शी ट्रेलर प्रदर्शित



**मुंबई :** मराठी चित्रपटसृष्टीत एक नवीन आणि हृदयस्पर्शी प्रेमकथा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. पद्मराज राजगोपाल नायर दिग्दर्शित माझी प्रारतना हा सिनेमा सध्या खूप चर्चेत आहे आणि आज या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित करण्यात आला असून, रसिक प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. प्रेम म्हणजे केवळ भावना नाही, तर जगण्याची एक जाणीव आहे आणि ही जाणीव सादर करणारा हा उत्कृष्ट ट्रेलर आहे. ट्रेलरमध्ये आपण पाहू शकतो की, प्रेम जेव्हा अडचणींवर मात करत टिकतं, तेव्हाच त्याची खरी ताकद समोर येते. अशाच प्रेमाच्या विविध पैलूंना स्पर्श करणारा हा ट्रेलर आहे ज्यात सुंदर चित्रीकरण, उत्कृष्ट अभिनय, मधुर संगीत आणि इमोशन्स आपण पाहू शकतो. चित्रपटाचा ट्रेलर पाहिल्यानंतर कथेबाबतची उत्कंठा आणखीनच वाढली आहे. कथेमधील रहस्य आणि कहाणी नक्की कशी असणार आहे हे येत्या ९ मे रोजी समजेलच. 'माझी प्रारतना' हा चित्रपट ब्रिटिश काळातील ग्रामीण महाराष्ट्राच्या पार्श्वभूमीवर आधारित आहे. ही एक संगीतप्रधान कथा असून, प्रेम, विश्वासघात आणि जगण्याच्या जिद्दीचा अद्भुत प्रवास मांडते. चित्रपटात पद्मराज राजगोपाल नायर आणि अनुषा अडेप प्रमुख भूमिकेत आहेत, तसेच मराठीतील अनेक दिग्गज कलाकारही यात सहभागी आहेत. एसआरएम फिल्म स्कूल प्रस्तुत माझी प्रारतना या चित्रपटाचं लेखन आणि दिग्दर्शन पद्मराज राजगोपाल नायर यांनी केलं आहे, पद्मराज नायर फिल्म्स यांची निर्मिती असून, संगीत विश्वजित सी.टी. यांनी दिले आहे. माझी प्रारतना हा सिनेमा ९ मे २०२५ पासून जवळच्या चित्रपटगृहांत प्रदर्शित होणार आहे.

## सरगम थिएटर्सतर्फे बॉलिवूड ड्यूएट्स



**नाशिक : प्रतिनिधी**

जुन्या, नव्या हिंदी चित्रपटसृष्टीतील युगुल गीतांवर रसिकांनी काल ताल धरला. उत्तरोत्तर रंगलेल्या २५ गाण्यांनी उपस्थित श्रोत्यांनी उत्स्फूर्तपणे दाद दिली. सरगम म्युझिक अकॅडमीच्या रौप्यमहोत्सवी वर्षानंतर सरगम थिएटर्सतर्फे काल 'अल्टिमेट बॉलिवूड ड्यूएट्स' अर्थात हिंदी चित्रपटसृष्टीतील अविस्मरणीय युगुलगीतांची मैफल आयोजित करण्यात आली. रविवारी ( दि.२७ ) सायंकाळी ६ वाजता प.सा. नाट्यगृहात ही विनामूल्य मैफल झाली. गायक, संगीत संयोजक नंदकुमार देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहभागी गायक, वादकांनी गाण्यांची सुरेल सफर घडवली. तू जो मेरे सूर मे... या गाण्याने मैफलीचा प्रारंभ झाला. वो जब याद आये..., तेरे बिना जिंदगी से..., अजहून आये बालमा..., या व इतर गाण्यांना टाळ्यांचा प्रतिसाद मिळाला. सुरुवातीला वृंदा लवाटे, उमेश गायकवाड, कमलाकर जोशी, प्रशांत जुन्नरे, रवींद्र जोशी आदी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. संचालक नंदकुमार देशपांडे यांनी स्वागत केले. घन:श्याम जाधव, सुरेंद्र जालिहालकर, अजय पाटील, संतोष कराळे, अमित गुरव तसेच गायिका अपर्णा माडीवाले, दीपाली पाटे, प्राजक्ता गायधनी, भाग्यश्री गायधनी, मयूरी मुर्डेश्वर यांनी लोकप्रिय युगुलगीते सादर केली. त्यांना वाद्यसंगीताची साथसंगत प्रशांत महाले, अनोष आढाव, अभिजित शर्मा, फारुख पिरजादे, गौरव तांबे, बाबा सोनवणे या कलाकारांनी करुन मैफलीचा आनंद द्विगुणित केला. दिनेश गोविल यांनी निवेदनाद्वारे बॉलिवूडच्या सांगीतिक इतिहासाला उजाळा दिला. पवन वंजारी यांनी उत्तम ध्वनीसंयोजन केले. नाशिककर रसिक श्रोत्यांनी उपस्थित राहून कलाकारांना प्रोत्साहन दिले.

# योजनांचे व्यवस्थापक आणि त्यांच्या कामगिरीचा आढावा

**परदेशात योजनांचे व्यवस्थापक यांचे स्तोम माजवले जाते. भारतात थोड्याफार प्रमाणात यांची सुरुवात झालेली आहे. असे करणे योग्य की अयोग्य यावर वादविवाद होऊ शकतात. फंड कामगिरी व्यवस्थापक कसा आहे. त्यावर ठरवायचे, की शेअर्सची निवड, शेअर्सची विक्री यासंबंधीची पूर्ण प्रक्रिया व्यवस्थापनाने विकसित केलेली आहे आणि त्यानुसार तो फंड चालावा अशी अपेक्षा असते.**




शेअर बाजार समालोचन

प्रमोद पुराणिक

९८२२०७८८२९

फंड मॅनेजर, फंड व्यवस्थापक खूप चांगला असला, त्याचे व्यवस्थापन कौशल्य खूप चांगले असले संपूर्ण व्यवहार आखून दिलेल्या चौकटीनुसार होत असले, तरीसुद्धा कामगिरीत फरक हा पडणारच. फरक का पडतो तर बाजारात अशा काही घटना घडतात की, एखादी चांगली कंपनी बाजारात विकली जाते. तर वर्षानुवर्षे चांगली कामगिरी दाखवणारी कंपनी काही कालावधीमध्ये इतकी मागे पडते की पोर्टफोलिओ चांगला असूनसुध्दा त्याचा उपयोग होत नाही.

काही कंपन्यांच्याबाबत विलगीकरणाचे निर्णय घेतले जातात. तर काही कंपन्या एकत्रिकरण करण्यासाठी योजना आखतात. एखाद्या कंपनीचा काही कालखंड असा असतो की त्याकाळात भांडवली खर्च सुरू असतो परंतु त्या भांडवली खर्चामुळे विक्री आणि नफ्यात वाढ व्हावी त्यासाठी काही कालावधी द्यावा लागतो. अशावेळेस कंपनी चांगली आहे. कंपनीला भवितव्य चांगले आहे परंतु तरीसुद्धा शेअर्स चालत नाहीत असे घडते.

योजनांनी कामगिरीची तुलना करण्यासाठी काही निर्देशांक विचारात घेतलेले असतात. या निर्देशांकातले होणारे बदल हे सुध्दा कधी कधी एखादया फंडाला त्रासदायक ठरतात. उदाहरणार्थ- निफ्टी इंडेक्स या इन्डेक्समध्ये झोमॅटो आणि जिओ फायनान्सेस सर्व्हिसेस यांचा समावेश झाला आणि ब्रिटानिया, बी.पी.सी.एल., या दोन कंपन्यांची हकालपट्टी झाली. बाजारात काही फंड्स निर्देशांकाची कार्बन कॉपी असतात. त्यामुळे त्यांना आपल्या गुंतवणुकीत बदल करावे लागतात

योजनेमध्ये एक रक्कमी गुंतवणुक असावी की नियमित गुंतवणुक पद्धती या पद्धतीचा वापर करावा. याबाबतसुद्धा खुप वादळ निर्माण झाले होते. ते आता बरेचसे शांत झाले आहे.

गुंतवणुकदारांनी आपल्याकडे असलेल्या योजनांची संख्या कमी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सुरुवातीच्या काळात गुंतवणूकदारांची एकाच योजनेत मोठी गुंतवणूक करण्याची मानसिकता नसते. जोखीम कमी व्हावी म्हणून गुंतवणुकीची विभागणी केली जाते. परंतु हळूहळू यात बदल होऊ लागला आहे. पूर्वी असे व्हायचे की ५० हजार रुपये किंवा त्यापेक्षा जास्त गुंतवणुक असली तर पॅन कार्ड देण्याची तयारी नसायची म्हणुन प्रत्येक योजनेत एकूण ४९ हजार रुपये अशी गुंतवणूक केली जायची. जेव्हा प्रत्येक गुंतवणुकीला पॅनकार्ड देणे सक्तीचे झाले ती सक्ती किती चांगली होती, याचा अनुभव आता गुंतवणूकदारांना मिळतो आहे म्हणून जे जे बदल होतात त्या त्या बदलांना जाणे हे योग्य ठरते.

रोकड चालणार नाही धनादेशच पाहिजे. तोसुद्धा दुसऱ्या व्यक्तींचा चालणार नाही हे बदल चांगले ठरले.

गुंतवणूकदाराने कोणता पर्याय निवडला आहे हे फार महत्त्वाचे ठरते. लाभांश पर्याय घेणारा आपली कमी करतो. गुंतवणूक जोखीम कमी होईल.

### लेकुरे उदंड जाहली

आपल्या नाशिकचे नाटककार स्व. प्रा. वसंत कानेटकर यांनी या नावाने एक नाटक रंगभूमीवर आणले होते. यात थोडा बदल करून उदंड झाल्या म्युच्युअल फंड योजना असे लिहावे लागेल. प्रत्येक म्युच्युअल फंडाला असे वाटते की आपल्याकडे सर्व प्रकारच्या योजना असाव्यात.

अमेरिकेतल्या म्युच्युअल फंडाचा थोडासा अभ्यास करण्याची संधी मिळाल्यामुळे त्यावर आधारित हा लेख प्रसिद्ध करीत आहोत.

**आश्चर्य वाटेल; पण अमेरिकेतसुद्धा लाभांशाचे गुंतवणूकदारांना आकर्षण आहे.**

**१) लाभांश उत्पन्न फंडस - या योजनेत नियमित लाभांश मिळतो. योजनांकडे व्यवस्थापनासाठी असलेली मालमत्तासुद्धा मोठ्या प्रमाणावर आहे.**

**२) लाभांश उत्पन्नवृद्धी फंड - लाभांश नियमित मिळावा ही अपेक्षा तर आहेच पण या उत्पन्नात वाढ सुद्धा व्हावी या उद्देशाने आलेल्या योजना आहेत.**

**३) दोन्ही उद्देश एकत्र ठेवून त्यात समतोल साधा यासाठी प्रयत्न करणारे फंड्स आहेत. त्यांचा या तिसऱ्या गटात समावेश होतो.**

व्हॅनगार्ड या फंडाकडे ७ डिव्हीडंड फंड्स आहेत. फ्रँकलिनने तर भारतात फक्त एकच डिव्हिडंड थील्ड फंड आणला. अमेरिकेतल्या फंडाची नावे वाचता वाचता दमछाक होते उदाहरणार्थ -फॅंकलिन यु.एस. लो. व्होलॅटिला हाय डिव्हिडंड इंडेक्स इ.टी.एफ. फ्रँकलिन राईजिंग डिव्हिडंडस् फंड क्लास ए फिडीलिटी म्युच्युअल फंडाचा डिव्हिडंड ग्रोथ फंड आहे.

रिअल इस्टेट इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (आर.इ.आय.टी.) यांना तर सक्ती आहे की, त्यांनी दरवर्षी कमावलेल्या उत्पन्नातून ९० टक्के उत्पन्न हे लाभांश म्हणून वाटप करायलाच हवे. अर्थात यातसुध्दा पळवाटा ठेवलेल्या आहेत.

बाजार जेव्हा कोसळतो त्यावेळेस वेळच्या वेळी लाभांश जर घेतला असेल तर कमी फटका बसतो असा अनुभव आहे.

## डीएस ग्रुपचे १०,००० कोटींच्या महसुलाचे लक्षणीय यश

**मुंबई :**

धरमपाल सत्यपाल ग्रुप (डीएस ग्रूप) या आघाडीच्या एफएमसीजी बहुद्योग समूहाने आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये तब्बल १०,००० कोटी रु. महसुलाचा लक्षणीय टप्पा पार करत भारतातील आघाडीच्या १५ एफएमसीजी कंपन्यांच्या यादीत मानाचे स्थान मिळवले आहे. हा टप्पा गाठण्यात समूहातील एफअ‍ॅण्डबी विभागाचा मोठा वाटा आहे. या विभागाने एकूण महसुलाच्या ४२ टक्के वाटा उचलला आहे. तर, माऊथ फ्रेशनर विभाग ३८ टक्के, हॉस्पिटॅलिटी विभाग ३ टक्के आणि तंबाखू आणि इतर व्यवसायांचा वाटा १० टक्क्यांहून कमी आहे. ऑरगॅनिक पद्धतीने झालेल्या प्रगतीसह या समुहाने मागील तीन वर्षांत १६ टक्के सीएजीआरसह वाढीचा आलेख सातत्याने चढा ठेवला आहे. शिवाय, यातून बाजारपेठेतील नेतृत्वस्थान आणि वृद्धीशी असलेली बांधिलकी पुन्हा अधोरेखित झाली आहे. मागील तीन वर्षांत फूड अ‍ॅण्ड ब्रेव्हरेज विभागाने १९ टक्के सीएजीआर नोंदवला आहे.

ग्राहकांना आनंददायी अनुभव देण्याची या समूहाची बांधिलकी अढळ आहे, हेच या सातत्यपूर्ण बाजारपेठीय यशातून डीएस ग्रूपने दाखवून दिले आहे. चव आणि गंधांचे सखोल ज्ञान, ग्राहकांच्या बदलत्या गरजांना नीट समजून घेणे आणि दमदार वितरण जाळे हा या बांधिलकीचा पाया आहे. सर्व उद्योगांमध्ये १५० हून अधिक सुपर स्टॉकिस्ट, ५००० हून अधिक वितरकांच्या माध्यमातून देशभरातील १५ लाख रिटेल दुकानांपर्यंत थेट आणि ३५ लाख दुकानांपर्यंत विविध माध्यमातून हा समुह पोहोचतो. डीएस ग्रूपने ग्राहकांच्या बदलत्या वर्तनाला नीट समजून घेत आधुनिक व्यवसाय, क्विक कॉमर्ससह ई-कॉमर्समधील बदलत्या ट्रेंड्सचा अभ्यास केला आणि त्याचा सुयोग्य वापरही केला. आर्टिफिशिअल इंटेलिजन्स, ऑटोमेशन आणि इतर भविष्यवेधी तंत्रज्ञानावर सातत्याने भर दिल्याने या समुहाला उद्योगक्षेत्रात आपले स्थान बळकट करतानाच ग्राहकांसाठी अधिक मूल्यनिर्मिती करणेही शक्य झाले.

डीएस ग्रुपचे उपाध्यक्ष श्री. राजीव कुमार म्हणाले, १०,००० कोटी महसुलाचा टप्पा पार करणे ही निव्वळ आर्थिक यशापलिकडील बाब आहे. भारताच्या प्रगतिशील यशोगाथेतील एक लक्षणीय सहभागी म्हणून आमची महत्त्वाची भूमिका यातून अधोरेखित होत आहे.

## NGMA मुंबईत 'नभ : स्पर्श'चे उद्घाटन

### १५० भारतीय महिला प्रिंटमेकर्सच्या कलाकृतींचा उत्सव

**मुंबई :**

नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट (NGMA), मिनिस्ट्री ऑफ कल्चर, भारत सरकार, यांच्या सहयोगाने 'नभ: स्पर्श - इंडियन वुमन प्रिंटमेकर्स' या प्रदर्शनाचा मुंबईतील आवृत्तीचा उद्घाटन सोहळा २५ एप्रिल २०२५ रोजी पार पडला. या प्रदर्शनात देशभरातून आणि विविध पिढ्यांमधील १५० महिला कलाकारांच्या प्रिंटमेकिंग कलाकृती प्रदर्शित करण्यात आल्या आहेत.



लिथोग्राफ, एचिंग, अ‍ॅक्वाटिंट, एन्ग्रेव्हिंग, स्क्रीन प्रिंट्स आदी तंत्रांचा समावेश असलेले हे प्रदर्शन, महिलांच्या प्रतिभेची विविधता आणि प्रिंटमेकिंगमधील त्यांच्या योगदानाचे व्यापक दर्शन घडवते. प्रदर्शनाचे उद्घाटन उद्योजिका आणि जेएसडब्ल्यू फाउंडेशनच्या अध्यक्षा संगीता जिंदाल यांच्या हस्ते झाले. यावेळी एनजीएमएचे महासंचालक डॉ. संजीव किशोर गौतम आणि एनजीएमएच्या संचालिका निधी चौधरी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या इतर मान्यवरांमध्ये लॉरेंट वेरगैन, फेरोझा गोदरेज, डॉ. सरयू दोषी, ब्रिंदा मिलर, श्रुती दास, असद लालजी, नैना कनोडिया, संजुक्ता अरुण, रुक्मिणी दहानुकर यांचा समावेश होता.

हे प्रदर्शन एनजीएमएच्या वतीने श्रुती दास - उपक्युरेटर यांच्या सहकार्याने सादर करण्यात आले आहे. 'नभ : स्पर्श' भारतीय प्रिंटमेकिंगच्या प्रवासाची कथा महिला कलाकारांच्या दृष्टिकोनातून मांडते. कलात्मक दर्जा, नवकल्पना आणि व्यक्तिशक्ती यांची झलक देणारे हे प्रदर्शन प्रेक्षकांना या कलाकारांच्या वैयक्तिक अनुभवांच्या आणि सर्जनशील वाटचालीच्या जवळ घेऊन जाते.

## रिझर्व्ह बँकेने वर्षभरात केली ५७.५ टन सोन्याची खरेदी

**नवी दिल्ली :**

भारतीय रिझर्व्ह बँकेने आत्तापर्यंत २०२४-२५ या आर्थिक वर्षात एकूण ५७.५ टन सोने खरेदी केले आहे. ज्यामुळं देशातील एकूण सोन्याचा साठा ८७९.६ टन झाला आहे. ही खरेदी गेल्या सात वर्षांतील दुसरी सर्वांत मोठी वार्षिक खरेदी मानली जात आहे. सोन्याकडे नेहमीच सुरक्षित गुंतवणूक म्हणून पाहिले जाते, म्हणजेच अडचणीच्या वेळी उपयोगी पडणारी गोष्ट म्हणजे सोने. सर्वसामान्यांसोबतच आता रिझर्व्ह बँकही सोन्याचा साठा वाढवत आहे. आपल्या परकीय चलनाच्या साठ्यामध्ये विविधता आणून जोखीमांपासून सुरक्षित ठेव म्हणून आरबीआय मोठ्या प्रमाणात सोन्याची खरेदी करत आहे. जागतिक आर्थिक अनिश्चितता आणि डॉलरची स्थिती लक्षात घेऊन आरबीआयने ही खरेदी केली आहे. अमेरिकन डॉलरची अस्थिरता आणि पाश्चात्य अर्थव्यवस्थांच्या दबावामुळे जगभरातील अनेक केंद्रीय बँका त्यांच्या साठ्यातील सोन्याचा वाटा वाढवत आहेत. भारतही या दिशेने वाटचाल करत आहे, जेणेकरून आपला साठा मजबूत आणि संतुलित होईल.

**२०२१-२२ मध्ये ६६ टन सोन्याची खरेदी**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (ठइख) द्वारे आतापर्यंतची सर्वाधिक सोन्याची खरेदी २०२१-२२ या आर्थिक वर्षात केली गेली, जेव्हा एकूण ६६ टन सोन्याचा साठ्यात समावेश करण्यात आला. यानंतर २०२२-२३ मध्ये ३५ टन आणि २०२३-२४ मध्ये २७ टन सोन्याची खरेदी झाली. २०२४-२५ या आर्थिक वर्षातही सोने खरेदीने वेग घेतला आहे.

जागतिक स्तरावर वाढती अनिश्चितता आणि डॉलरची अस्थिरता हे या ट्रेंडमागील प्रमुख कारण मानले जात आहे. भारताच्या परकीय चलनाच्या साठ्यात विविधता आणण्यासाठी आणि जागतिक धोक्यांपासून संरक्षण करण्यासाठी आरबीआयची ही रणनीती महत्त्वाची मानली जाते.

## सोनं पुढच्या वर्षी दीड लाखाचा टप्पा पार करणार? ब्रोकरेज फर्म्सचा अंदाज

**मुंबई :** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या या आक्रमक राजकारणाचे परिणाम शेअर बाजार आणि सोन्याच्या दरावर दिसून आले. जगभरातील शेअर बाजार गडगडले, तर सोन्याच्या दरात मोठी वाढ झाली. अक्षय्य तृतीयेअगोदर सोन्याचे दर १ लाखांपर्यंत जाऊन आले आहेत. येत्या काळात सोन्याच्या दरात वाढ होण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. जेपी मॉर्गन बँकेच्या अंदाजानुसार २०२६ पर्यंत आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याचे दर ४००० डॉलर प्रति औंसवर जाऊ शकतात. मनी कंट्रोलच्या रिपोर्टनुसार सोन्याचे दर ४००० डॉलर प्रति औंस पर्यंत पोहोचतील तर २०२६ पर्यंत सोन्याचा दर ५००० डॉलर प्रति औंस होऊ शकतो. या अंदाजानुसार सोन्याचे दर या वर्षीच १३५००० रुपयांचा टप्पा ओलांडतील. तर, २०२६ मध्ये १० ग्रॅम सोन्याचा दर १५३००० रुपये असू शकतो.

# अपघाती मृत्यू अन् भरपाई

**मोटार व्हेईकल कायद्यानुसार एखाद्या व्यक्तीचा अपघाती मृत्यू झाल्यास आणि त्या व्यक्तीने आयकर विवरणपत्र भरलेले असल्यास, त्याच्या वार्षिक उत्पन्नाच्या अंदाजे १० पट नुकसानभरपाई त्याच्या कुटुंबाला मिळू शकते.**

(पूर्वार्ध)

**यातील महत्त्वाचे मुद्दे :**

अपघातातील मृत व्यक्तीने अपघाताच्या ३ वर्ष आधीपर्यंतचे आयटीआर भरलेले असावे. तसेच सदर अर्ज ६ महिन्यांच्या आत करण्याची अट घालून दिलेली आहे. नुकसानभरपाईचे मूल्य ठरवताना आयकर विवरणपत्रकात वर नमूद उत्पन्नाच्या १० पट रक्कम (या साठी आयटीआर एक अधिकृत उत्पन्नाचा पुरावा म्हणून ग्राह्य धरला जातो).

आयकर विवरणपत्रकात उत्पन्न जास्त दाखवल्यास त्यास फायदा, तर कमी दाखवल्यास नुकसान होऊ शकते.

उदा. जर एखाद्या व्यक्तीचे आयटीआरवर वार्षिक उत्पन्न रु.५ लाख दाखवलेले असेल, तर त्याच्या कुटुंबाला रु.५० लाखांपर्यंत नुकसानभरपाई मिळू शकते. ही प्रथा मोटार व्हेईकल कायदा, १९८८ अंतर्गत कोर्टाच्या निर्णयानुसार आहे आणि वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये कोर्टाचे निकष त्यास लागू होतात.

**अधिकृत कायदेशीर संदर्भ किंवा प्रक्रिया :**

मोटार वाहन कायदा, १९८८ अंतर्गत कलम १६६ नुसार, कोणत्याही वाहन अपघातात मृत्यू झाल्यास, मृत व्यक्तीच्या वारसांना (कुटुंबियांना) न्यायालयात नुकसानभरपाईसाठी अर्ज करता येतो.

कायदेशीर महत्त्व : आयकर विवरणपत्राचा आयटीआर उपयोग

अपघातात मृत व्यक्तीचे उत्पन्न सिद्ध करण्यासाठी सर्वात अधिकृत आणि कोर्ट-मान्य दस्तऐवज म्हणजे त्याचे आयटीआर. कोर्ट नुकसानभरपाई ठरवताना त्याच्या आयटीआरमधील वार्षिक उत्पन्न बघते आणि त्यावरून पुढे मल्टीप्लायर मेथड वापरून हिशेब करते.




**नुकसानभरपाईचा हिशेब -**

मृत व्यक्तीचे वार्षिक उत्पन्न रु.५ लाख (आयटीआरवर दाखवलेले) त्याचे वय ४० असेल तर मल्टीप्लायर १५ असू शकेल.

**म्हणजे नुकसानभरपाई = रु.५००००० ÷ १५ = रु.७५०००००/**

नितीन डोंगरे

कर सल्लागार

९११२१२३२६५

यातून काही प्रमाणात खर्च वगळला जातो मृत पावलेल्या व्यक्तीचे आयटीआर नसेल तर? जरच आयटीआर दाखल नसेल, तर उत्पन्नाचा पुरावा इतर दस्तऐवजावर (उदा. बँक स्टेटमेंट, पगारपत्रिका, खात्रीशीर पुरावे) द्यावा लागतो. पण आयटीआर असल्यास नुकसानभरपाईची रक्कम ठरवताना जास्त विश्वासार्हता मिळते आणि अनेकदा अधिक रक्कम मंजूर होते.

**अर्ज कोण करू शकतो?**

मृत व्यक्तीची पत्नी/पती, मुले, आई-वडील किंवा मयत व्यक्तीवर अवलंबित कुटुंब सदस्य

**अर्जाची मुदत :** अपघाताच्या ६ महिन्यांच्या आत दावा करणे आवश्यक.

**कोठे अर्ज करायचा?**

मोटार वाहन दावा ट्रायब्यूनल कोर्टमध्ये.

**कायद्यातील तरतुदी :**

मोटार वाहन अधिनियम १९८८ अंतर्गत अपघाती मृत्यू किंवा गंभीर दुखापतीच्या प्रकरणात नुकसानभरपाईची तरतूद आहे. कोर्ट किंवा मोटार अपघात दावा न्यायाधिकरणाकडून नुकसानभरपाईचा आदेश दिला जातो.

**आयकर विवरण पत्रकाचा उपयोग :**

जर मृत व्यक्तीने अपघात होण्यापूर्वी आयकर विवरणपत्र भरलेले असेल, तर त्याच्या वारसदारांना मृत व्यक्तीच्या वार्षिक उत्पन्नाच्या दहा पट रकमेची नुकसानभरपाई मिळू शकते. **(क्रमशः)**

# सण आखाजीचा, उत्सव गौराईचा !

**'विविधतेत एकता' हे भारत देशाचे एक विशेष वैशिष्ट्य. सामाजिक, सांस्कृतिक, भौगोलिक, धार्मिक विविधतेने नटलेले हे महान राष्ट्र! भारतातील विविध प्रांत, राज्य हे अनेक सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक विचार अंगीकारून गुण्यागोविंदाने एकत्र नांदतात. जसे भारत देशात विविधता आहे, तशीच विविध राज्य किंवा प्रांतातही अनेक बाबतीत विविधता आढळते.**

भारतातील अनेक राज्यांपैकीच महाराष्ट्र हे एक महान असेच राष्ट्र. विविध सांस्कृतिक परंपरेने नटलेले राज्य अशी महाराष्ट्राची पूर्वापार ओळख चालत आलेली आहे. महाराष्ट्रात बोलली जाणारी मराठी भाषा आणि दर बारा मैलावर बोलली जाणारी बोलीभाषा व त्या प्रदेशातील संस्कृती यावरून महाराष्ट्रात विविध विभाग किंवा प्रांत पडलेले दिसून येतात. जसे की खानदेश, बागलाण, विदर्भ, दख्खन, मराठवाडा, कोकण, माणदेश इत्यादी. या सर्व विभागांत आपापली अशी सांस्कृतिक परंपरा आहे. विविध पारंपरिक सण, उत्सव यांनी ती नटलेली आहे. हे सर्व विभाग, प्रांत आजही आपला सांस्कृतिक वारसा जोपासून तो टिकविण्यासाठी तसेच त्याचे संवर्धन करण्यासाठी प्रयत्न करताना दिसून येते. आधुनिकतेच्या नावाखाली सुशिक्षित वर्गातील मुली व महिला यांचे सणासुदीकडे होणारे दुर्लक्ष यामुळे या परंपरा कालबाह्य होतील की काय, अशी स्थिती निर्माण झालेली दिसून येत असली तरी ग्रामीण भागातील बहुतांशी वर्ग जुन्या सांस्कृतिक परंपरा जोपासण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत. त्यात खानदेश परंपरेतील सण, उत्सव आजही मनाला भुरळ घालतात.

पौराणिक कथेनुसार अक्षय तृतीयेच्या दिवशी भगवान कुबेर यांना स्वर्गातील संपत्तीचे रक्षक म्हणून देवांकडून नेमले गेले. आणि म्हणून अक्षय तृतीयेच्या दिवशी सोने खरेदी करून भगवान कुबेराची पूजा केली जाते. आणि घरात समृद्धी आणि ऐश्वर्य येते, अशी भाविकांची श्रद्धा आहे. अक्षय तृतीया हा दिवस विष्णूचा सहावा अवतार परशुराम यांचा जन्मदिवस मानला जातो. वैशाख शुद्ध तृतीयेला त्रेता योगाचा आरंभ झाला. त्याचप्रमाणे चार युगांपैकी सुरुवातही याच दिवशी झाली म्हणूनही हा अतिशय शुभ दिन मानला जातो.



आपल्या संस्कृतीत मुहूर्ताला अनन्यसाधारण महत्त्व आहे. योग्य मुहूर्तावर सुरू केलेल्या कार्यात हमखास यश मिळते अशी घट्ट समजूत आहे. म्हणूनच साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त म्हणून अक्षय तृतीयेला महत्त्व आहे. मुहूर्त न बघताही या दिवशी नवीन वस्तू, वास्तू, वाहन, व्यवसाय आरंभ, शुभ कार्य केल्यास हमखास यश मिळते असे मानतात. अक्षय्य याचा अर्थ कधीही क्षय न होणारा नाश न पावणारा असा आहे. म्हणूनच या दिवशी खरेदी व शुभकार्याचा आरंभ केल्यास उत्तरोत्तर प्रगती होत जाते.

खानदेशातील अनेक सणांपैकी अक्षय तृतीया हा सण खानदेशात तसेच कसमादे पट्ट्यातील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात अधिकाधिक उत्साहाने साजरा करण्यात येतो. अक्षय तृतीया या सणाला आखाजी असेही म्हणतात. आखाजी सणाच्या पंधरा दिवस आधी चैत्र पौर्णिमेला घरोघरी पारंपरिक पद्धतीने गौराईची स्थापना करून

**उत्सव**

**संजय धनगर**

९६३७३२५१६०

या सणाची सुरुवात होते. गौराई म्हणजे एकप्रकारे पार्वतीच रूप आहे. गौराईचे वैशिष्ट्ये म्हणजे लाकडापासून गौराई बनवली जाते. पूर्वी गौराई बनवण्यासाठी चंदनाचे लाकूड वापरले जाई; परंतु अलीकडे दिवसेंदिवस चंदनाचे लाकूड दुर्मिळ झाल्याने त्याऐवजी मिळेल त्या लाकडापासून सुताराकडून गौराई बनवण्याचे काम आजही ग्रामीण भागात होत असते. एक फूट लांबीच्या दोन लाकडांवर अश्वाचे चित्र कोरून ते आडव्या लाकडाने एकत्र जोडले जाते. खालच्या बाजूला सपाट फळी लावून त्या फळीवर महादेवाची पिंड कोरलेली फळी पाळणा म्हणून लावली जाते. घरोघरी गौराईची स्थापना करण्यापूर्वी गौराईला पाण्याने अंघोळ घातली जाते. अश्व आकाराच्या गौराईला चंदनाच्या गंधाने सजवून विविध फळबिया, शेंगा, मुरमुरे, लाह्या यांच्या माळा घालून सजवतात. ज्या ठिकाणी गौराईची स्थापना करायची असते, त्या ठिकाणी कलश ठेवत आंब्याची नवी पालवी फुटलेली डहाळीच्या सहाय्याने सजावट करतात. गौराईची स्थापना झाल्यावर झाडांना झोके बांधले जातात. माहेरवाशीण महिला जेवढे महत्त्व दीपावलीला देतात किंबहुना त्याहूनही अधिक महत्त्व अक्षय तृतीयेला देऊन झोके खात ओव्या व गीते म्हणत आनंदोत्सव साजरा करतात. आखाजी म्हणजे विसावाचा किंवा आनंदाचा क्षण, सासरमधील कामाच्या तगादातून माहेरी येऊन आराम करण्याचा व आनंदाचा दिवस महिलावर्ग आजही मानतात. सासुरवाशिणी तसेच माहेरी आलेल्या नवविवाहित तरुण महिला गौराईची, आखाजीची गाणी म्हणत झोके घेतात.

**चैत्र वैशाखनं उन्ह वं माय ।**
**खडक तापूनी झाले लालं वं माय ।**
**वाळू तापली बालंबाल वं माय ।**
**आईच्या पायी आले फोड वं माय ।**
**आईची बेगडी वाव्हणं वं माय ।**


चैत्र आणि वैशाख महिन्यात रखरखत्या उन्हात येणारा हा अक्षय तृतीयेचा सण, नदीतील खडक तापून लाल होतात. वाळू खूप तापलेली असते. अशा उन्हात चालताना जणू आईच्या पायाला फोड येतात.

**आथानी कैरी, तथानी कैरी,**
**कैरी झोका खाय वं ।**
**कैरी तुटणी, खडक फुटना ।**
**झुई झुई पाणी व्हाय वं ।**
**झुई झुई पाणी व्हाय तठे ।**
**रतन धोबी धोय वं ।**
**रतन धोबी धोय तठे ।**
**कसाना बजार वं ।**
**रतन धोबी धोय तठे ।**
**साखळ्यासना बजार वं ।**
**माय माले साखळ्या ली ठेवजो ।**
**बंधूना हातमा दी धाडजो ।**

अशी पारंपरिक गाणी म्हणून माहेरवाशीण वं सासुरवाशीण मुली व महिला झोके घेण्याचा आनंद घेत सण साजरे करतात. अक्षय तृतीयेच्या दिवशी गौराईला सार, भात, कुरड्या, आंबा आणि पुरणपोळीचा नैवेद्य ठेवला जातो. या दिवशी गौराई वित्सर्जन अर्थात गौराई उठवली जाते. आजही ग्रामीण भागात या सणाच्या दृष्टीने सामाजिक महत्त्व आहे, ते म्हणजे सरदार बारा बलुतेदार यांचे कामाचे नवीन वर्ष अक्षय तृतीयेला सुरू होते. तेथून पुढे वर्षभर ठरल्याप्रमाणे मालकाकडे काम करावे लागते.

असा हा अक्षय तृतीया एक अनोखा, खानदेश परंपरेतील एक आगळावेगळा सण आजच्या आधुनिक काळातही जोपासला जातो.

# चरित्राचा विषय असणारे मधुअण्णा झेंडे



मधुअण्णा गेल्याचे वृत्त सकाळी सकाळी वाचण्यात आले आणि अण्णांच्या कडू-गोड आठवणी मनात अपरिहार्यपणे यायला लागल्या. माझे १९७३ /७४ पासून सार्वजनिक वाचनालय नाशिकचे संबंध. तेथे अण्णांचा परिचय झाला होता. माझे नुकतेच लग्न झाल्यावर आम्ही उभयता मेहेर कॉर्नरला सामंत दुकानासमोर एक-दोन मजली हॉटेल होते. तेथे आम्ही वरच्या मजल्यावर गेलो. अण्णा आणि त्यांची मित्रमंडळी खाली बसली होती. अण्णांनी आम्हाला पाहिले. वर आमचे कॉफी पान झाले. आम्ही पैसे द्यायला खाली काउंटरला आलो. काउंटरवरील व्यक्तीने सांगितले की अण्णांनी पैसे दिले आहेत. ही १९८६ ची आठवण मी नव्हे तर आम्ही उभयता विसरू शकणार नाही. अशाप्रकारे वागून अण्णांनी आयुष्यात अनेक व्यक्तींच्या मनात चांगल्या अर्थाने घर केले असावे. मराठी शाळेत इयत्ता सातवीपर्यंत अण्णांचे शिक्षण झाले होते. रोजंदारी मुकादम, शिपाई, कारकून, सचिवांचे स्वागत अधिकारी आणि नाशिक महापालिकेत १९७६ ते १९९४

**आदरांजली**

**मिलिंद चिंधडे**

पर्यंत जनसंपर्क अधिकारी अशी विविध कामे अण्णांनी केली. शालेय जीवनापासून त्यांनी लेखनाला सुरुवात केली. त्या काळात गाजलेले कुस्तीगीर व सिनेकलावंत लक्ष्मणराव ठाकरे यांचे छोटेखानी चरित्र त्यांनी लिहिले. नंतर दीपस्तंभ या नावाने नाशिक जिल्ह्यातील काही मान्यवरांची माहिती त्यांनी संपादित केली. नाशिकच्या जुन्या काळातील जडणघडणीचा चौकांचा इतिहास हे त्यांचे पुस्तक नाशिकचा एक महत्त्वाचा संदर्भ ग्रंथ म्हणून गणला जाईल. पुस्तक मित्रमंडळाचे मी जेव्हा काम करत होतो तेव्हा अण्णांचे या पुस्तकावरती व्याख्यान ठेवले होते. माझ्या पुस्तकांच्या सहवासात या पुस्तकात हे व्याख्यान समाविष्ट आहे. गुण गाईन आवडी हे त्यांचे तिसरे पुस्तक आत्मकथनपर आहे. ते पुस्तक त्यांनी मला २०२३ मध्ये भेट दिले. अखिल भारतीय नाट्य परिषदेचा जीवनगौरव पुरस्कार, कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून राष्ट्रपती रौप्यपदक व सन्मानपत्र त्यांना मिळाले होते. सार्वजनिक वाचनालय नाशिक, वसंत व्याख्यानमाला नाशिक, लोक रंजन नाट्य संस्था या त्यांनी काम केलेल्या आणखी काही संस्था. त्याकाळी त्यांनी मेळा देखील काढला होता. ते उत्तम कुस्तीपटू होते. अनेक कार्यक्रमांचे नियोजन आणि सूत्रसंचालन ते करीत असत. उत्तम वक्ता आणि समालोचक म्हणून ते काळाच्या ओघात नावारूपाला आले.

अण्णांचा सात नोव्हेंबर हा जन्मदिवस आणि नाशिक नगरपालिकेचे महानगरपालिकेत रूपांतर होणारा दिवस एकच आला. सार्वजनिक वाचनालयाच्या गंगापूर रोड शाखेची सुरुवातदेखील अण्णांच्या मदतीने झाली. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या नावाने असलेल्या तरण तलावाचे पहिले व्यवस्थापक अण्णा होते. अण्णा कायम गोड बोलायचे. जसे काही त्यांच्या जिभेवर खडीसाखरेचा खडा आहे असे वाटावे. हा गुण सार्वजनिक क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी अण्णांपासून नक्कीच घ्यायला पाहिजे.

त्यांच्याकडे नाशिकमधील अनेक जुन्या व्यक्तींच्या आठवणी होत्या. त्या आठवणी ते खुमासदारपणे सांगायचे. अण्णांनी दैनिक देशदूतमध्ये नगरसेवकाची ओळख हे सदर लिहिले होते. साहित्य सुधारक ही पदवी परीक्षा देखील त्या काळात त्यांनी दिली. पुणे विद्यापीठातून हिंदी वृत्तपत्र विद्या प्रमाणपत्र परीक्षा पण ते उत्तीर्ण झाले होते. कालिदास कलामंदिराच्या निर्मितीत ते प्रथम व्यवस्थापक होते. त्यांच्या काळात घडलेले अभिमानास्पद काम म्हणजे चित्रपटमहर्षी दादासाहेब फाळके स्मारक आणि तथागत भगवान बुद्ध स्मारक हे सांगता येतील.

अण्णांचे व्यक्तिमत्त्व हे खऱ्या अर्थाने अष्टपैलू होते. महानगरपालिकेत तळागाळाच्या कर्मचाऱ्यापासून ते वरील वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत त्यांचा कसा संपर्क होता ते मी त्यांच्या बरोबर माझ्या एका कामाकरिता गेलो होतो तेव्हा पाहिले. कोणी त्यांच्याकडे काही काम घेऊन गेले तर ते स्वतःचेच आहे, असे समजून करणारे व्यक्तिमत्त्व आताच्या काळात तसे दुर्मिळच आहे. अण्णांनी लिहिलेल्या तीन पुस्तकांच्या माध्यमातून अण्णा आपल्यामध्ये नक्की शिल्लक राहतील. अशा हरहुन्नरी व्यक्तिमत्त्वाला भावपूर्ण श्रद्धांजली.

# दोन भावांची जगावेगळी मागणी

**आई हे एक नाव असतं,**
**घरातल्या घरात गजबजलेलं**
**एक गाव असतं...**

मरणासन्न अवस्थेत असलेल्या म्हाताऱ्या व्यक्तींना विचारलं की, काय राहून गेलं? तर त्यांचं उत्तर असतं, आयुष्याच्या शेवटी जगायचं मात्र राहून गेलं. मला एक कॉन्ट्रॅक्टर मित्र भेटले, ते मला म्हणाले, मी पाच कोटी रुपये देतो, माझ्या मुलीला लहान करून द्या. मी त्यांना म्हटलं मला तुमचा प्रश्न नाही कळला.

ते म्हटले मी कॉन्ट्रॅक्टर होतो. पहाटे उठून मी सायकलवर साइडवर जायचो, माझी एकुलती एक मुलगी तेव्हा झोपलेली असायची. रात्री यायचो तेव्हाही झोपलेली, शनिवारी, रविवारी तिला सुटी असायची पण मी साइडवर असायचो. आता ती लग्न होऊन अमेरिकेत राहायला गेली. मी वयामुळे व्यवसाय सोडून दिला, कधीतरी मी अमेरिकेत जातो, ती येते पाया पडते, दर्शन घेते पण फॉर्मॅलिटीसारखं!!! विचारते कसे आहेत बाबा? मी काहीच उत्तर देत नाही. सर्व असून काहीच करता येत नाही. मी आता ३५ वर्षांच्या मुलीला खांद्यावर घेऊ शकत नाही. ज्या वेळेला अंगावर खांद्यावर घ्यायचं होतं, खेळवायचं होतं, त्यावेळी मी काही करू शकलो नाही. नुसती पळपळ पैशाच्या मागे धावलो. ती वेळ निघून गेली. प्रत्येक गोष्टीची एक वेळ असते, ती निघून गेली होती. मग मागे काहीच शिल्लक राहत नाही. जोपर्यंत आपले आई-वडील आहेत तोपर्यंत आपण भक्कम असतो, त्यांचा आधार असतो, कसलीच भीती नसते.

एका दवाखान्यात एक नर्स होती ब्राइन लियर, तिने शेवटचे क्षण मोजणाऱ्या रुग्णाची मुलाखत घेतली. त्यांना विचारलं, काय राहून गेले असे वाटते? त्यांचं एक कॉमन उत्तर आले की, पैसा जास्त कमावणं ही गरज नव्हती. मशीनसारखा धावत राहिलो, जे माझे जवळचे होते, माझे कुटुंब होते त्यांना प्रेम द्यायचं राहून गेलं. एका कवीची एक कविता आहे, आयुष्याच्या शेवटी एक लक्षात आलं, आयुष्य नुसतंच वाहून गेलं. मला जगायचं, मला जगायचं, म्हणताना माझं आयुष्यच जगण्याचं राहून गेलं!!! आईचं पण काय वेगळं असत. पण तिचा आधार, सपोर्ट मात्र खूप महत्त्वाचा असतो. तुला जे चांगलं



वाटेल ते कर, आई-वडिलांचे नाव घालवू नकोस, मी आहे तुझ्या पाठीशी. स्वामी समर्थ म्हणतात की, भिऊ नकोस मी आहे तुझ्या पाठीशी, पण लोक त्याचा गैरअर्थ काढतात. क्वार्टर पिऊन गाडी चालव, मी आहे तुझ्या पाठीशी, असे काही लोक अर्थ काढतात, असे नाही होत कधी. मी दिलेलं ज्ञान तुझ्या पाठीशी आहे ते वापर आणि सुखी हो असा त्याचा अर्थ आहे.

आई-वडिलांचा मुलांना इतका सपोर्ट पाहिजे की, मुलांचा त्यामुळे कॉन्फिडन्स वाढला पाहिजे, पण मुलांनी त्यांचं ऐकलं तर पाहिजे. ज्या घरात आई-वडील जिवंत आहेत ते घर सुखी म्हटलं जातं. मुलांनी आता आई-वडिलांचे पालक झाले पाहिजेत. तुम्ही लहान होता तेव्हा ते तुमचे पालक होते. आता तुम्ही पालक व्हा, ती तुमची आत्ता मुलं आहेत असे समजा. आई नावाची वाटते सर्वांनाच नवलाई, पंढरीचा विठोबाही स्वतःला म्हणे विठा+आई.

**के. के. अहिरे**

९९६०६०३१८२

आईची माया असली की, माणूस खचून जात नाही. आयुष्यात मिळालेले क्षण हे आनंदाने जगा, कारण नशीब कधी रागावेल हे कधी समजणार नाही. आपण ज्यांच्यामुळे हे जीवन अनुभवलं त्या आई-वडिलांना कधीच दुःख देऊ नका. आपण लहान होतो तेव्हा त्यांनी आपल्याला मुलासारखं जगवलं. आता तुम्ही आई-वडील व्हा आणि त्यांना मुलं समजा. चुकतील वय झालं, चूक शोधत बसू नका. आई होती म्हणून मी सुगंध सारा वाटीत गेलो, कधीच दरवळलो नाही, ऋतू नाही असा कोणता, ज्यात मी होरपळलो नाही. केला सामना वादळाशी, त्यांच्यापासून पळलो नाही, सामोरा गेलो संकटांना, त्यांना पाहून वाळलो नाही. कधी ना सोडली कास सत्याची, खोट्यात कधी मळलो नाही, रुसून राहिले माझ्या अगदी जवळचेच, मी कुणाला कळलोच नाही.

आई असते साठा सुखाचा,
आई असते देव पृथ्वीवरचा.
आई असते मायेची ओढ,
तिच्याविना घर ना लागे गोड!

आईचं देव असणं, आईचं माणूस असणं, देवापासून आपल्या खूप जवळ असणं, हे सारंच आपल्या सर्वांसाठी खरं असतं. प्रत्येकाकडे देव जाऊ शकत नाही म्हणून त्याने आईचे पात्र निवडलं. कालच माझा मित्र संजय पाटील यांच्या आईच्या ७५ वीच्या अमृत महोत्सवाला गेलो होतो, आई-वडिलांना त्याने इतके सुखी ठेवलं की, ते बघून सर्वांना आई-वडील जास्तीत जास्त दिवस असावेत, असे तिथल्या आईच्या कविता गाणाऱ्या कवींनी याची जाणीव करून दिली. आई-वडील असतील तर त्यांना मुलासारखे जपले पाहिजे. मुलं हीच त्यांची संपत्ती असते. वायदे करतो हजारो, ते पाळणारे शोधतो, अशी परिस्थिती आजची आहे.

मुलं मोठी झाली, सून घरात आली की, आई-वडील परके वाटू लागतात. त्यामुळे आनंद आश्रमांची संख्या खूप वाढू लागली. काही आई-वडिलांनी म्हातारपणात आपल्या जुन्या सवयी, करमत नाही अशा गोष्टी सोडून दिल्या पाहिजेत. नातवामध्ये रमले पाहिजे. वयामुळे जास्त फिरायला जाणं, बाहेरगावी जाणे टाळले पाहिजे. आपली औषधे वेळेवर घेतली पाहिजे. त्रास होत असेल तर इतरांना तत्काळ सांगितले पाहिजे.

नुकताच सातारा न्यायालयात एक हृदयस्पर्शी खटला आला होता. त्याचे विशेष म्हणजे आई-वडिलांची सेवा करण्यासाठी मोठा भाऊ मला संधीच देत नाही. त्यासाठी लहान भावाने न्यायालयात मोठ्या भावाविरोधात दावा ठोकला होता. माझाही आई-वडिलांना सांभाळण्याचा अधिकार आहे. माझा मोठा भाऊ, आई-वडिलांकडून संपत्ती, पैसे, जमीन ई कोणत्याही लोभाची अपेक्षा न करता दैनंदिन स्वखर्चाने उत्तमप्रकारे त्यांची सेवा करत आहे. इथून पुढे ती सेवा करण्याचा अधिकार मला मिळाला पाहिजे असे त्याचे म्हणणे होते. असे खटले न्यायालयात कधी येतील असे वाटायला लागले. आई-वडिलांना सांभाळण्यासाठी दोन्ही भाऊ कोर्टात भांडत आहेत. ही आजच्या काळातील मोठी घटना म्हणावी लागेल. जिथे आई-वडिलांना वृद्धाश्रमात ठेवणारा एक मोठा समाज एकीकडे वावरत असताना असे दोन भाऊ जगावेगळेच मागणी करताना दिसून येते. तेव्हा डोळ्यात नक्कीच आनंदाश्रू वाहू लागतात.

# महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाची दशकपूर्ती!



**राज्यातील नागरिकांना पारदर्शक, गतिमान व कालबद्ध पद्धतीने लोकसेवा देता याव्यात यासाठी शासनाने 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५' लागू केला आहे. यामुळे शासकीय आणि निमशासकीय कार्यालयांमध्ये नागरिकांची कामे वेळेत पूर्ण करण्याची जबाबदारी निश्चित झाली आहे. हा अधिनियम २८ एप्रिल २०१५ रोजी अमलात आला असून, राज्यात हा दिवस सेवा हक्क दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीस दहा वर्षे पूर्ण होत असून, त्यानिमित्त हा विशेष लेख.**

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ हा कायदा राज्यातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे. या कायद्याची व्याप्ती संपूर्ण राज्यभर आहे. हा अधिनियम संबंधित कायद्यातील तरतुदीनुसार पात्र असलेल्या व्यक्ती व लोकसेवा देणारी सार्वजनिक प्राधिकरणे यांना लागू होतो. तसेच, या अधिनियमांतर्गत अधिसूचित केलेल्या सर्व सेवांसाठी हा कायदा लागू आहे. या कायद्याचा मुख्य उद्देश हा पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम आणि वेळेत लोकसेवा पुरवणे आहे. यासोबतच, लोकसेवा देणाऱ्या सार्वजनिक प्राधिकरणांमध्ये पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढवणे हे देखील या कायद्याचे उद्दिष्ट आहे. एखाद्या व्यक्तीची पात्रता संबंधित कायद्यातील तरतुदीनुसार ठरविली जाते. विशेष म्हणजे, या कायद्यानुसार सार्वजनिक सेवा मिळवण्यासाठी कोणताही पात्र व्यक्ती अर्ज करू शकते. परदेशात राहणारी एखादी व्यक्ती कोणत्याही अधिसूचित सेवेसाठी पात्र असेल, तर तीदेखील या कायद्यानुसार सेवा प्राप्त करू शकते. गेल्या दहा वर्षांत १८ कोटींपेक्षा अधिक अर्जदारांनी या अधिनियमानुसार अधिसूचित सेवा मिळविल्या आहेत. आपले सरकार पोर्टल यांसारख्या उपक्रमांनी नागरिकांच्या दैनंदिन व्यवहारात सुलभता आणली आहे. सर्व विभागांच्या मिळून १००० पेक्षा जास्त सेवा अधिसूचित असून, त्यापैकी त्यापैकी ५८३ सेवा आपले सरकार पोर्टलवर ऑनलाइन उपलब्ध आहेत. एकूण १ कोटीपेक्षा अधिक नागरिकांनी आपले सरकार पोर्टलवर रजिस्ट्रेशन केलेले आहे. सेवेचा अधिकार म्हणजे सार्वजनिक प्राधिकरणाने ठरवून दिलेल्या वेळेत लोकसेवा मिळवण्याचा हक्क. सार्वजनिक प्राधिकरणात शासनाचे विभाग, विविध सरकारी संस्था, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था आणि शासनाकडून आर्थिक सहाय्य मिळणाऱ्या अशासकीय संस्था यांचा समावेश होतो. प्रत्येक सेवेसाठी कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. या कायद्याची आणि नियमांची प्रत 'आपले सरकार' पोर्टल किंवा 'आरटीएस महाराष्ट्र' मोबाइल ॲपवरून विनामूल्य डाउनलोड करता येते.

**सार्वजनिक प्राधिकरणांची भूमिका :**

या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सार्वजनिक प्राधिकरणांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. अधिसूचित सेवा आणि त्यासंबंधीची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवणे हे सार्वजनिक प्राधिकरणाचे कर्तव्य आहे. यासाठी राजपत्रात अधिसूचना प्रकाशित करण्यात येते. सार्वजनिक प्राधिकरणाने पुरविलेल्या लोकसेवांची यादी, त्यासाठी लागणारा वेळ, विहित शुल्क, पदनिर्देशित अधिकारी आणि अपील प्राधिकाऱ्यांचे तपशील कार्यालयाच्या सूचनाफलकावर आणि त्यांच्या वेबसाइटवर किंवा पोर्टलवर दर्शविण्यात येतात. ही माहिती प्रदर्शित केली नाही तर मुख्य आयुक्त किंवा संबंधित आयुक्त स्वतः दखल घेऊन कारवाई करू शकतात. लोकसेवा मिळवण्यासाठी आवश्यक असणारी विविध प्रमाणपत्रे, कागदपत्रे आणि प्रतिज्ञापत्रे कमी करण्यावर या कायद्यात भर देण्यात आला आहे.

**अर्ज कुठे करावा?**

लोकसेवा मिळवण्यासाठी अर्जदारास पदनिर्देशित अधिकाऱ्याकडे, प्रत्यक्ष कार्यालयात जाऊन किंवा 'आपले सरकार सेवा पोर्टल'वरून ऑनलाइन अर्ज करता येतो. प्रत्येक विशिष्ट सेवेसाठी अर्ज करण्याचा नमुना वेगळा असतो. अर्जाचा नमुना आणि आवश्यक कागदपत्रांची यादी संबंधित कार्यालयात, 'आपले सरकार सेवा केंद्रां'मध्ये आणि संबंधित विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असते.

**ऑनलाइन अर्ज सुविधा :**

'आपले सरकार सेवा पोर्टल' (https://aaplesarkar.mahaonline.gov.in) हे विविध विभागांच्या लोकसेवांसाठी ऑनलाइन अर्ज करण्यासाठी एक सामान्य व्यासपीठ आहे. जे नागरिक स्वतःहून अर्ज करू शकत नाहीत, त्यांच्यासाठी राज्यभरात ३२००० हून अधिक 'आपले सरकार सेवा केंद्रे' कार्यरत आहेत. याव्यतिरिक्त, 'आरटीएस महाराष्ट्र' नावाचे मोबाइल ॲपदेखील वापरकर्त्यांसाठी मराठी आणि इंग्रजी भाषेत उपलब्ध आहे. प्रत्येक ऑनलाइन अर्जाला एक विशिष्ट ओळख क्रमांक (युनिक आयडेंटिफिकेशन नंबर - UIN) मिळतो, ज्यामुळे अर्जाच्या प्रगतीचा मागोवा घेणे सोपे होते. जर एखाद्या पात्र व्यक्तीला विहित वेळेत सेवा मिळाली नाही किंवा तिचा अर्ज फेटाळला गेला, तर ती व्यक्ती प्रथम अपील प्राधिकरणाकडे अपील करू शकते. प्रथम अपील अर्ज सेवा नाकारल्याच्या किंवा विहित कालमर्यादा संपल्याच्या दिवसापासून ३० दिवसांच्या आत दाखल करता येतो. मात्र, जर अर्जदाराकडे वेळेत अपील न करण्याचे योग्य कारण असेल तर प्रथम अपील प्राधिकरण विलंब माफ करून ९० दिवसांत अपील स्वीकारू शकते. अपील सुनावणीची नोटीस अर्जदाराला प्रत्यक्ष, नोंदणीकृत पोस्टाने, ईमेलद्वारे, एसएमएसद्वारे किंवा मोबाइल ॲपद्वारे दिली जाते.

**आपले सरकार सेवा केंद्रांबाबत माहिती**

'आपले सरकार सेवा केंद्रे' ही नागरिकांना सार्वजनिक सेवा मिळविण्यासाठी मदत करतात. ही केंद्रे तहसील, ग्रामपंचायती, नगरपालिका आणि काही खासगी ठिकाणीही उपलब्ध आहेत. ही केंद्रे आपले सरकार पोर्टलवर उपलब्ध असलेल्या सर्व विभागांच्या सेवा पुरवतात.

**लोकसेवेत कसूर झाल्यास कारवाई**

या अधिनियमात लोकसेवा पुरविण्यात किंवा अपिलांवर निर्णय घेण्यात अधिकाऱ्यांकडून कसूर झाल्यास दंडात्मक कारवाईची स्पष्ट तरतूद आहे.

**पदनिर्देशित अधिकाऱ्यावरील दंड :**

जर पदनिर्देशित अधिकाऱ्याने विहित वेळेत योग्य कारणाशिवाय लोकसेवा दिली नाही तर त्याच्यावर कमीत कमी ५०० ते कमाल ५,००० पर्यंत दंड आकारला जाऊ शकतो. प्रथम अपील प्राधिकारी सुनावणीनंतर हा दंड लावू शकतात. वारंवार लोकसेवा देण्यात दिरंगाई झाल्यास किंवा अपील प्राधिकाऱ्याच्या निर्देशांचे पालन न केल्यास, संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाईदेखील केली जाऊ शकते.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ हा नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करणारा आणि शासकीय कामांमध्ये पारदर्शकता आणणारा एक महत्त्वाचा कायदा आहे. या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सार्वजनिक प्राधिकरणांनी आपली भूमिका योग्य प्रकारे निभावणे आवश्यक आहे. नागरिकांनी देखील आपल्या हक्कांबाबत जागरूक राहून या कायद्याचा योग्य वापर केल्यास त्यांना वेळेत आणि पारदर्शकपणे लोकसेवा मिळू शकेल.

**- माहिती व जनसंपर्क**
**महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई**